12-12-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A.1
SGB/ D/ MMP/ 11:00

**<u>सभापतीस्थानी माननीय उप सभापती</u>**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत, त्यामुळे सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करावी, अशी मी विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण सभागृहामध्ये वेळेवर उपस्थित झालेला आहात. परंतु सत्ताधाऱ्यांना त्याचे महत्व दिसून येत नाही. कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक तहकूब करावी.

**उप सभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.00 ते 11.10 पर्यंत स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: पुणे महानगर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या नावाने स्पेशल परपज व्हेईकल स्थापन करण्याचा निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी न होणे

**मु.शी.**: पुणे महानगर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या नावाने स्पेशल परपज व्हेईकल स्थापन करण्याचा निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी न होणे या संबंधी श्री.मोहन जोशी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य शासनाने 30 सप्टेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये पुणे महानगर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, ( पीएमएमआरसीएल ) या नावाने स्पेशल परपज व्हेईकल स्थापन करण्याचा निर्णय घेऊन देखील त्यांची अंमलबजावणी अद्याप झाली नसणे, यामुळे पुणे मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी केंद्र शासन व रेल्वे प्रशासनाशी आवश्यक तो पत्रव्यवहार करणे आणि केंद्राकडून त्यांच्या हिश्याचा निधी मिळविणे शक्य होत नसणे, परिणामी प्रकल्पाची किंमत वाढण्याची निर्माण झालेली शक्यता, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्यावतीने सुचविण्यात आल्याप्रमाणे पुणे मेट्रो प्रकल्पाचे काम वेळापत्रकाप्रमाणे एप्रिल, 2014 ला प्रत्यक्ष सुरु करण्याची आवश्यकता, पुणे एसआरए नियमावलीबाबत ऑगस्ट 2013 च्या अखेरपर्यंत अंतिम निर्णय घेण्याचे सभागृहात आश्वासन देऊनही या संदर्भात राज्य शासनाकडून अध्यादेश काढण्यास झालेली दिरंगाई, तसेच शासनाने पुणे शहराच्या झालर क्षेत्रातील टेकड्यांवरील बांधकामांच्या बाबत अंतिम निर्णय घेण्याची व सन 1987 च्या विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेल्या एच.सी.एम.टी.आर.(हायकॅपॅसिटी ट्रान्सीट सह) रस्त्याचे काम भूसंपादनात सवलती इत्यादी देऊन मार्गी लावण्याची, रिंग रोड आणि रिंग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी...

रेल्वेची प्रक्रिया गतिमान करण्याची आवश्यकता, त्याचबरोबर पुणे शहरातील सार्वजनिक वाहतूक सक्षमीकरणाकरिता मनपाच्या अर्थसंकल्पाच्या पाच टक्के रक्कम पीएमपीएल करिता राखून ठेवण्याची आवश्यकता, तसेच, पीएमपीएलचा कारभार सुधारण्याकरिता त्यावर आयएएस अधिकारी नेमण्याची आवश्यकता, या सर्व बाबींकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहर हे महाराष्ट्रात वेगाने वाढत असलेले दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. पुणे शहर आय.टी., एज्युकेशन हब म्हणून ओळखले जाते. पुणे शहराचे वेगाने नागरीकरण होत आहे. पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम असावी या दृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांनी चांगला निर्णय घेतला आहे. पुणे शहरामध्ये मेट्रो रेल्वे सुरू करण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली. ही घोषणा होऊन सहा महिने झालेले आहेत. लेखी उत्तरामध्ये राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे असे नमूद केले आहे. सन 2014 मध्ये मेट्रो रेल्वेच्या कामाला सुरूवात झाली पाहिजे व 2019 पर्यंत काम संपले पाहिजे आणि पुण्यात मेट्रो रेल्वे धावली पाहिजे अशा प्रकारचा आपण आराखडा आखलेला आहे. त्या दृष्टीने शासनाने लवकरात लवकर प्रयत्न करावेत व सन 2014 पासून मेट्रोच्या कामाला कशा प्रकारे सुरूवात करण्यात येणार आहे या संबंधीचे उत्तर शासनाकडून येणे अपेक्षित आहे.

दुसरे असे की, पुण्यातील 45 टक्के लोकसंख्या झोडपट्टीमध्ये राहते. पुणे शहरातील एसआरएची नियमावली देखील अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. सदर नियमावली शासनाने लवकरात लवकर जाहीर करावी. पुणे महानगरपलिकेच्या 1987 च्या डी.पी.मध्ये एचएमटीसीआर 35 कि.मी.चा रोड होता. हा रिंग रोड फक्त सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठीच आहे. या रस्त्याच्या कामासाठी वेगाने भूसंपादन होणे आवश्यक होते. ते अजून झालेले नाही. सदर भूसंपादनाची कारवाई आता जिल्हाधिकाऱ्यांकडे गेलेली आहे. यात येणारी जी शासकीय जागा आहे ती पुणे महानगरपलिकेला देण्यासंबंधीचे आदेश शासन जिल्हाधिकाऱ्यांना देणार आहे काय ? पुणे महानगरपालिकेला काही खाजगी भूसंपादन करावयाचे आहे. त्यासाठी कमीतकमी 500 ते 600 कोटी रूपये लागणार आहेत. एवढी मोठी रक्कम आज महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. आपण जागा मालकांना टीडीआर, एफएसआय देतो. महानगरपलिका जागा ताब्यात घेताना त्वरित कारवाई करते. ज्या नागरिकाची जागा गेलेली असते, तो जेव्हा टीडीआर किंवा एफएसआय मागायला जातो तेव्हा त्याला दोन ते तीन वर्षे टीडीआर व एफएसआय मिळत नाही. तेव्हा या साठी वन विंडो सिस्टीम करून लोकांना लवकरात लवकर ही सुविधा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी....

उपलब्ध करून दिली तर खाजगी मालक देखील आपली जागा महानगरपालिकेला देतील. अशा प्रकारे मी दोन तीन गोष्टी लक्षवेधी सूचनेमध्ये मांडलेल्या आहेत.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुण्यातील पीएमपीलए. ही कंपनी शासनाने स्थापन केली आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अतिशय महत्त्वाची आहे. आज महानगरपलिकेचे जे बजेट आहे त्या मध्ये दरवर्षी 5 टक्के रक्कम ही पीएमपीएल कंपनीसाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. सदर तरतूद पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे. या पीएमपीएल कंपनीचे श्री.जोशी नावाचे कार्यकारी संचालक आहेत. ते भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी आहेत. परंतु, कौटुंबिक अडचणीमुळे ते सातत्याने गैरहजर असतात. आज येथे सक्षम अधिकाऱ्याची गरज आहे. श्री.श्रीकर परदेशी यांच्याकडे नेहमी पदभार देण्यात येतो. माझी आपल्याला विनंती आहे की, श्री.श्रीकर परदेशी किंवा त्यांच्या सारखा एखादा चांगला अधिकारी पीएमपीएलसाठी द्यावा जेणे करून पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मदत होईल. माझ्या या महत्त्वाच्या लक्षवेधी सूचनेवर शासनाकडून सकारात्मक उत्तर मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी पाच विषय एकत्र करुन ही लक्षवेधी सूचना या ठिकाणी उपस्थित केलेली आहे. 29 ऑक्टोबर, 2013 रोजी महाराष्ट्र शासनाने पिंपरी चिंचवड ते स्वारगेट तसेच वनास ते रामवाडी या मेट्रो रेल्वे प्रकल्पाला मान्यता दिली असून त्यासंदर्भात जी.आर.सुध्दा काढण्यात आलेला आहे. पुणे महानगर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड या नावाने स्पेशल परपज व्हेईकल स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. यासंदर्भातील डीपीआर केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला असून त्याला दोन महिन्यात मान्यता मिळेल असे अपेक्षित आहे. डीपीआरला मान्यता मिळाल्यानंतर जी एसपीव्ही करावयाची आहे त्यामध्ये केंद्र शासनाचे 5 प्रतिनिधी लागणार असून 5 प्रतिनिधी मिळाल्यानंतर मेट्रो रेलच्या संदर्भात शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्यावर अंमलबजावणी करणे सोईस्कर होणार आहे. या प्रकल्पाचे कोऑर्डीनेशन करण्यासाठी सक्षम अधिकारी आहेत काय अशी सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विचारणा केली असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त आणि पुणे महानगरपालिकेचे आयुक्त या दोघांची या ठिकाणी जोपर्यंत एसपीव्ही होत नाही तोपर्यंत समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. मेट्रोचा जीआर निघून वनास ते रामवाडी आणि पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या दोन प्रकल्पाच्या संदर्भात जीआर काढून हे दोन प्रकल्प शासनाने मान्य केलेले आहेत. हे दोन्ही प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे. जीआरमध्ये या प्रकल्पाचे दर पत्रक सुध्दा नमूद करण्यात आलेले आहे. हा प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन कार्यवाही करीत आहे.

एसआरएच्या बाबतीत कलम 37 अन्वये नियमावलीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे अशी विचारणा सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी केली आहे. पुण्याच्या एसआरएमध्ये 45 टक्के लोक राहतात असाही सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. यासंदर्भातील नस्ती 21/6/2012 रोजी मंत्रालयाला लागलेल्या आगीमध्ये जळाल्यामुळे ही नस्ती पुन्हा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. पुण्यामध्ये एसआरएचे धोरण चांगल्या प्रकारे राबविले जाईल तसेच एसआरएच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या मनात जी काही शंका आहे ती सुध्दा दूर होऊ शकेल.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत......

सभापती महोदय वाढीव हद्दीच्या संदर्भात बायोडायव्हर्सीटी पार्कच्या संदर्भात 13 हजार हरकती व सूचना आलेल्या आहेत. यातील जवळपास 250 ते 300 हरकती व सूचना अद्यापि प्रलंबित आहेत. हे काम येत्या मार्च महिन्यापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून हा प्रकल्प सुध्दा लवकरच पूर्णत्वास जाणार आहे.

सभापती महोदय, या रस्त्याची लांबी 26 कि.मी. असून 35 फूट रुंदी आहे. या रस्त्याचे क्षेत्रफळ सुमारे 40 चौरस मीटर आहे. यामध्ये जो भूसंपादनाचा प्रश्न आहे त्यासंदर्भात या ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांनी समन्वयाने केवळ 6 टक्के जमीन महानगरपालिकेच्या ताब्यात दिली असून उर्वरित जमीन अद्यापि ताब्यात येणे बाकी आहे. खाजगी जमीन आणि शासनाची जमीन यामध्ये तात्काळ बायफरकेशन करुन शासनाची जमीन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्याची कार्यवाही आम्ही लवकरात लवकर करणार आहोत. परंतु जी जमीन समन्वयाने घ्यावयाची आहे त्यामध्ये थोडा विलंब होत असल्यामुळे या प्रकल्पाला विलंब झालेला आहे. या प्रकल्पातील लँड कॉस्टींगचे मूल्यमापन केले तर ते जवळपास 550 कोटीच्या आसपास जाते. या प्रकल्पामध्ये अशा प्रकारचे प्रश्न निर्माण झाल्यामुळे या प्रकल्पाला वेळ लागतो आहे.

सभापती महोदय, पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या महसुली तुटीच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. सर्व खर्च जाऊन जो काही नफा राहतो त्यातील 5 टक्के निधी पुणे महानगर परिवहन मंडळाला द्यावा अशा प्रकारची मागणी परिवहन मंडळाने केलेली असून यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे आला असून हा प्रस्ताव तपासण्याचे काम शासन स्तरावर सुरु आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी श्री. आर.एन.जोशी हे पूर्ण वेळ अधिकारी म्हणून कार्यरत असून ते त्या ठिकाणी चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत. मेट्रो, एसआरए,रिंग रेल्वे प्रकल्प पूर्णत्वास गेल्यानंतर ते लवकरात लवकर सुरु करण्यात येतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. माझी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे, त्यांनी केंद्रीय मंत्री श्री.कमलनाथ यांना प्रत्यक्ष भेटून पुणे शहरातील मेट्रो प्रकल्प लवकर सुरु करण्याबाबत पावले उचलावीत. दुसरे म्हणजे पीएमपीसाठी पाच टक्के रक्कम राखून ठेवण्यात यावी. आज पुणे शहरात वाहनांची प्रचंड प्रमाणात कोंडी होत आहे. पुण्यातील लोकांचे जिणे असह्य झालेले आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय दिल्लीमध्ये आपले वजन खर्ची करुन पुणे शहरातील मेट्रो लवकर धावण्यासाठी मदत करतील काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, पुणे हे राज्यातील अत्यंत वेगाने वाढत जाणारे शहर आहे. पिंपरी-चिंचवड आणि शेजारच्या हिंजवडी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वसाहती निर्माण झालेल्या आहेत. पुणे येथे एक विमानतळ करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. पुणे शहरासाठी मेट्रो अत्यावश्यक आहे. मास ट्रान्झीट व्यवस्था करण्यासाठी दिनांक 28 ऑक्टोबर 2013 रोजी मंत्रिमंडळाने या प्रकल्पाला मान्यता देऊन तो केंद्र सरकारकडे पाठविला आहे. या प्रकल्पामध्ये केंद्र सरकारचे 20 टक्के भागभांडवल, राज्य सरकारचे 20 टक्के भागभांडवल आणि दोन्ही महानगपालिकांचे 10 टक्के भागभांडवल असे फायनान्शिअल स्ट्रक्चर आहे. या प्रकल्पास केंद्र सरकारची मान्यता मिळत नाही तोपर्यंत आपणास जॉईन्ट व्हेन्चर कंपनी स्थापन करता येणार नाही. या जॉईन्ट व्हेन्चर कंपनीमध्ये राज्य शासनाचे सहा संचालक असतील आणि त्यांची नावे सरकारने निश्चित केली आहेत. विविध विभागाचे सचिव संचालक म्हणून काम पाहतील. प्रधान सचिव, नगर विकास, प्रधान सचिव, वित्त, प्रधान सचिव, नगर विकास (2), प्रधान सचिव उद्योग, पुणे महानगरपालिका आयुक्त आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त हे महाराष्ट्र राज्याच्या वतीने संचालक असतील. केंद्र सरकार त्यांचे पाच वरिष्ठ अधिकारी या संचालक मंडळावर नामनिर्देशित करणार आहेत. केंद्र शासनाचा तत्वत: निर्णय झाल्यास त्यांचे अधिकारी येतील आणि ही जॉईन्ट व्हेंचर कंपनी स्थापन होईल. त्यानंतर कामाला वेगाने सुरुवात होईल. मी स्वत: पुण्यातील आणि नागपूरमधील मेट्रो प्रकल्पाबाबत केंद्रातील मंत्री महोदयांना भेटून विनंती केलेली आहे. हे दोन्ही प्रकल्प करण्याबाबत त्यांनी मला तत्वत: मान्यता दिलेली आहे. परंतु अजून त्यास

..2..

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता मिळालेली नाही. सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्यानुसार मी पुन्हा केंद्रीय मंत्री महोदयांना भेटून हा प्रकल्प लवकर सुरु करण्याबाबत प्रयत्न करीन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा स्थानिक बस व्यवस्थेबाबत उपस्थित केलेला आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळ सध्या महसुली तुटीत चालले आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे आपण अनेक सवलती देतो. सवलती देणे आवश्यक आहे. विद्यार्थी, अपंग आणि ज्येष्ठ नागरिकांना सवलती दिल्या जातात. अशाप्रकारे सवलती दिल्यामुळे पुणे परिवहन महामंडळावर आर्थिक बोजा पडतो त्यामुळे आर्थिक तूट निर्माण होते. तेव्हा असा एक प्रस्ताव पुढे आला होतो की, दोन्ही महानगरपालिकांनी दरवर्षी निधीची पाच टक्के तरतूद करावी. याबाबत निर्देश देता येईल का याबाबत आमचा अभ्यास सुरु आहे. राज्य परिवहन महामंडळ, बेस्ट किंवा राज्याची इतर परिवहन महामंडळे असतील, ज्या ज्या विभागांनी प्रवासाच्या सवलती दिलेल्या आहेत त्या त्या विभागाने आपल्या बजेटमध्ये सवलतीची तरतूद केली पाहिजे अशी आमची भूमिका आहे. एस.टी.च्या बाबतीत आम्ही ती भूमिका घेत आहोत. या सर्व महामंडळाच्या बाबतीत ती भूमिका घ्यावी लागेल. कारण ही सर्व व्यापारी महामंडळे आहेत. एका विशिष्ट वर्गाला अनुदान देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला किंवा एखाद्या संस्थेने घेतला तर त्या त्या विभागाने आपल्या बजेटमधून तो निधी दिला पहिजे. हा निधी तीन महिने आधी दिला पाहिजे अशी तरतूद आम्ही करीत आहोत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SJB/ D/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 11:25

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

मला वाटते या विषयी आर्थिक तरतूद व्यवस्थित झाल्यानंतर निश्चितपणे हे परिवहन महामंडळ चांगल्याप्रकारे चालू शकेल. केंद्र सरकारच्या जेएनएनयुआरएम योजनेतून सुध्दा काही बसेस देण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतला आहे. त्या संदर्भातील प्रशासकीय व्यवस्था करण्यासाठी आणखी सक्षम व्यवस्था निर्माण केली पाहिजे या बाबत शासनाकडून विचार करण्यात येईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहनदादा जोशी यांनी अत्यंत महत्त्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. मेट्रो, एसआरए, पीएमपीएल आणि रिंग रोड या चार बाबींवर या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून प्रकाश टाकण्यात आलेला आहे. मी एसआरएच्या बाबतीत विचारु इच्छिते की, कलम 154 अन्वयेच्या डायरेक्टीव्हज् खाली एसआरएची नियमावली तयार करण्याचे काम सुरु आहे. अंतिम नियमावलीच्या बाबतीत हरकती व सूचनांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यासाठी केवळ अंतिम मान्यता मिळणे बाकी आहे. सरकारने बीडीपी सोडून बाकीचा डेव्हलपमेंट प्लॅन मान्य केला होता. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, प्रस्तावित नियमावलीतील एखाद्या बाबीसंदर्भात अडचण असेल तर ती बाब बाजूला ठेवून उरलेली एसआरएची नियमावली त्वरित मान्य करण्यात येईल काय ? एस.सी.एम.टी.आर. (हायकॅपॅसिटी ट्रान्सीटसह) प्रकल्पाचा रस्ता आखण्यासाठी भूसंपादन त्वरित करणार काय, तसेच एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट मागविण्यासाठी राज्य सरकार महानगरपालिकेला तातडीने आदेश देणार काय, एस.सी.एम.टी.आर. च्या अलाईनमेंटमध्ये अनेक बांधकामे बाधित होतात. त्या बांधकामांच्या बाबतीत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री.उदय सामंत : महोदय, एसआरएच्या बाबतीत सांगू इच्छितो की, काही अडचणींमुळे हे धोरण थोडे फार प्रलंबित राहिले आहे. या विषयीची फाईल मंत्रालय इमारतीला लागलेल्या आगीमध्ये जळाली होती. या विषयीची फाईल विभागाने नव्याने तयार केली आहे. दोन महिन्यांत एसआरएचे धोरण अंतिम होऊन तो प्रकल्प पूर्णत्वास जाण्यास मदत होईल. रिंग रोड च्या बाबतीत सांगू इच्छितो की, एचसीएमटीआर या प्रकल्पासाठी 8 लाख 40 हजार चौ.मी. जमिनीचे भूसंपादन करावयाचे आहे. त्यापैकी केवळ 6 टक्के जमीन म्हणजेच 59 हजार 839.22 चौ.मी. एवढीच जमीन समन्वयाने महानगरपालिकेच्या ताब्यात आली आहे. शासनाची आणि खाजगी जमीन किती आहे याचे बायफरकेशन करुन शासनाची जागा लवकरात लवकर ताब्यात घेण्याचे निर्देश

श्री.उदय सामंत....

महापालिकेला देण्यात येतील. तसेच लवकरात लवकर समन्वय साधून ती जागा महापालिकेकडे घेण्यात येईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : महोदय, मी पुन्हा विचारु इच्छिते की, अलाईनमेंटमध्ये जी बांधकामे बाधित होतात त्या बांधकामांबाबत शासनाची भूमिका काय राहणार आहे ?

श्री.उदय सामंत : महोदय, मी अगोदर सांगितले की, केवळ 6 टक्के जमिनीच्या बाबतीत निर्णय होऊ शकलेला आहे. त्यामध्ये शासनाची जमीन किती आहे, बाधित लोक किती आहेत आणि बाधित बांधकाम किती आहे याची कोणतीही आकडेवारी समोर आलेली नाही. या संदर्भातील आकडेवारी ज्यावेळी समोर येईल व भूसंपादनास प्रत्यक्ष सुरुवात होईल त्यावेळी या विषयावर बोलणे उचित होईल.

ॲड.जयदेव गायकवाड : महोदय, पुण्यातील मेट्रो प्रकल्प हा मोठा प्रकल्प असून तो केव्हा पूर्ण होईल या बाबत पुणेकरांना शंका आहे. या प्रकल्पाबाबत उलटसुलट चर्चा होत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाच्या निमित्ताने विरोधकांनी आंदोलने, निदर्शने केल्यानंतर सरकार जागे होते आणि त्यानंतर निर्णय घेते. वस्त्रोद्योग मंत्रालयाने निर्णय घेतल्यानंतर आंबेडकरी जनतेचे आणि राज्यातील सर्व जनतेचे समाधान झाले. परंतु त्यासाठी अगोदर निदर्शने वा आंदोलने करावी लागली. मेट्रो प्रकल्पाच्या बाबतीत अशा प्रकारची आंदोलने करण्याची वेळ येऊ नये असे मला वाटते.

महोदय, दुसरा गंभीर प्रश्न हा पुण्यातील वाहतुकीचा आहे. पुण्यामध्ये वाहतुकीची समस्या लोकांना सहन करावी लागत आहे. वाहतुकीच्या समस्येला पर्याय म्हणून वनास ते रामवाडी नदीतून जाणाऱ्या रस्त्याच्या बाबतीत कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी असलेल्या जमिनीच्या बाबतीत नुकसान भरपाई देण्याबाबतचा सरकारचा निर्णय प्रलंबित आहे. या निमित्ताने मी विचारतो की, त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत सरकार कधी निर्णय घेणार आहे ?

नंतर श्री.कांबळे....

ॲड. जयदेव गायकवाड ....

सदर बाबतीत निर्णय झाला तर तेथील बरीचशी वाहतूक दुसरीकडून वळविली जाऊ शकते. मला पुढील प्रश्न एसआरएच्या संदर्भात विचारायचा आहे. पुण्यामध्ये जवळपास 560 झोपडपट्ट्या आहेत.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाशी तो विषय निगडीत नाही.

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पुण्यातील 40 टक्के लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. 560 झोपडपट्ट्या असून देखील फक्त 12 ठिकाणी एसआरएची कामे सुरू आहेत. नियमावलीमुळे सर्व कामे ठप्प आहेत. नियमावली बनविण्यास सरकार किती वेळ घेणार आहे ? रिंगरोडच्या संदर्भातील भूसंपादनाचे पैसे असतानाही भूसंपादन होत नाही, याची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हा प्रकल्प कधी पूर्ण होणार आहे, असे विचारले आहे. हा दोन फेजमधील प्रकल्प आहे. दोन्ही प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. पहिल्या पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट प्रकल्पाचा पूर्णत्वाचा अपेक्षित दिनांक 31.03.2019 आहे. दुसऱ्या वनाज ते रामवाडी प्रकल्पाचा पूर्णत्वाचा अपेक्षित दिनांक 31.03.2018 आहे. मी एसआरएच्या बाबतीत सुरूवातीलाच सांगितले आहे. फेब्रुवारी महिन्यापर्यंत एसआरएची सुधारित पॉलिसी जाहीर होईल आणि लवकरच ते काम सुरू होईल. दुसरा प्रश्न मेट्रो रेलच्या बाबतीतील आहे. ती माहिती आज उपलब्ध नाही. रिंग रेल्वेच्या बाबत जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर मी सुरूवातीलाच दिले आहे. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच हे प्रकल्प पूर्ण होऊ शकतात.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मेट्रो रेलच्या संदर्भात माझा प्रश्न आहे.

**उप सभापती** : मी या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेस अर्धा तास दिलेला आहे. यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक 2 चर्चेला घेण्यात येईल. मी आपली लक्षवेधी सूचना पुकारली आहे. आपण आपल्या लक्षवेधी सूचनेवर बोलावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण असे करू नये. मला या लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारायचा आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आपण लक्षवेधी सूचना मांडत नसाल तर मी पुढील लक्षवेधी सूचना पुकारतो. लक्षवेधी सूचना क्रमांक-3 .... सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. लक्षवेधी सूचना क्रमांक-4 सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी लक्षवेधी सूचना मांडावी.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना एक प्रश्न विचारू द्यावा.

**उप सभापती** : प्रत्येक वेळी आपण सन्माननीय सदस्यांना संधी देतो. त्यांनी समंजसपणे इतर सन्माननीय सदस्यांचा विचार केला पाहिजे. हे कधीच होणार नाही का, आम्ही फक्त त्यांचेच ऐकायचे का, आणि बाकीच्या सन्माननीय सदस्यांवर अन्याय करायचा का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पुण्याच्या विषयाच्या संदर्भात विरोधी बाकावरील सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यास संधी दिली पाहिजे. महिलांना आरक्षण देण्याची भूमिका पवार साहेब घेतात आणि तुम्ही येथे त्यांना प्रश्नही विचारू देत नाही.

**उप सभापती** : मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, आपण माझी आणि त्यांची तुलना कुठे करता ? ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री स्वत: या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सभागृहात उपस्थित आहेत, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. मला या संदर्भात 2 प्रश्न विचारायचे आहेत. पुण्याच्या वाहतुकीच्या संदर्भात सन 1987 पासूनचे विषय प्रलंबित आहेत. पुणे मनपामध्ये श्री. बोनाला नावाचे अधिकारी आहेत. ते कायम अतिशय फडतूस उत्तरे देतात. गेली 2 वर्षे वाहतुकीच्या प्रश्नावर आमदारांची बैठक ठरविली जाते. मात्र, ती प्रत्येक वेळा पोस्टपोन होते. माननीय मुख्यमंत्री व माननीय राज्यमंत्री हे एकत्र मिळून पीएमपीएलच्या प्रश्नाच्या संदर्भात, पुण्याच्या वाहतुकीच्या संदर्भात पुढील 15 दिवसांत बैठक घेऊन प्रलंबित प्रश्नांबाबत न्याय मिळण्याच्या दृष्टीने पावले उचलतील का ? जेणेकरून, सभागृहाचा वेळ वाया घालविण्याचा प्रश्न येणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांवर पुणेकरांचा जिव्हाळा आहे. कारण त्यांच्या नावाने एका रिक्षा चालकाने रिक्षाचे परमिट घेतले होते. माननीय मुख्यमंत्र्यांची तशी रिक्षा नाही ना ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, अधिवेशन संपल्यानंतर पुण्यातील सन्माननीय सदस्यांना देखील मुंबईला येणे सोईस्कर होईल, हे पाहून त्या बैठकीचे आयोजन केले जाईल. माननीय मुख्यमंत्री साहेबांच्या नावाने परमिट घेतल्याबाबत सांगितले आहे. मी सांगू इच्छितो की, त्या संबंधित आरटीओला निलंबित करण्यात आले आहे. ..3

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : केंद्र शासन, राज्य शासन आणि महापालिका यांच्यातील समन्वयाअभावी नागपूर येथे जेएनएनयू अंतर्गत सुरू असलेल्या विकास प्रकल्पांना खीळ बसणे.

**मु.शी.** : केंद्र शासन, राज्य शासन आणि महापालिका यांच्यातील समन्वयाअभावी नागपूर येथे जेएनएनयू अंतर्गत सुरू असलेल्या विकास प्रकल्पांना खीळ बसणे यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"केंद्र शासन, राज्य शासन आणि महापालिका यांच्यातील समन्वयाअभावी नागपूर येथे जेएनएनयू अंतर्गत सुरु असलेल्या विकास प्रकल्पांना बसत असलेली खीळ, यामुळे या प्रकल्पांच्या प्रस्तावित किंमतीत वाढ होऊन 300 कोटींच्या घरात जाणे, एलबीटी अंमलबजावणीतील समस्यांमुळे महापालिकेची तिजोरी रिक्त असणे, यामुळे प्रकल्पाच्या पूर्णत्वावरच प्रश्न निर्माण होणे, रामझुला, गोरेवाडा, मिहान आदि अनेक जुन्या योजना अपूर्णावस्थेत असणे, रेल्वे स्थानकांजवळील उड्डाणपुलाची क्षमता धोक्यात आल्याने सुरु केलेले रामझुला तयार करण्याचे काम दोन वर्षात पूर्ण होण्याचे अपेक्षित असतांना 11 वर्षे झाले तरी काम अपूर्णच असणे, गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालय 8 वर्षापासून रखडणे, पेंच प्रकल्पापासून नागपूर शहरापर्यंत जलवाहिनी टाकण्याचे काम गेल्या 10 वर्षापासून प्रलंबित असणे, मेट्रो रिजनची घोषणा होऊन तीन वर्षे झाली तरी हा प्रकल्प अपूर्ण असणे, परिणामी विदर्भात विशेषत: नागपूरातील विकासाची कामे रखडल्याने सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..4



**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विदर्भातील नागपूरात अधिवेशन सुरू आहे. 5 वर्षे सातत्याने मी हा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे. मला या संदर्भात आपल्याला 4 प्रश्न विचारायचे आहेत. आपण मुद्रांक शुल्क माफीची अधिसूचना काढणार होता, जेणेकरून विदर्भातील मिहान प्रकल्पात उद्योग येतील आणि त्यांना मुद्रांक माफी दिली जाईल. आपण ती अधिसूचना काढली आहे का ?

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

निवेदनामध्ये रोजगार निर्मितीचा उल्लेख केलेला आहे. प्रत्यक्ष 90 व अप्रत्यक्ष 1400 रोजगारांची निर्मिती झाल्याचे उत्तरात नमूद केलेले आहे. रोजगार निर्मितीमध्ये वाढ कशा प्रकारे वाढेल असे अपेक्षित आहे, एनएमआरडीए व एनएमसी यांच्या समन्वयाच्या ज्या अडचणी आहेत त्याबाबत काही अडचणी नाहीत असे नमूद केलेले आहे. पण प्रारुप विकास आराखडा प्रसिध्द करण्यासाठी अडचणी येत आहेत असेही निवेदनात म्हटलेले आहे. हा प्रारुप विकास आराखडा केव्हा प्रसिध्द केला जाणार आहे, काही शेतकऱ्यांना अद्याप मोबदला न मिळाल्यामुळे त्यांचे दावे कोर्टात प्रलंबित आहेत त्याबाबत सरकारने कोणती कार्यवाही केलेली आहे ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, नागपूर येथे हे अधिवेशन होत असताना सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी 5-6 प्रश्न उपस्थित केलेले आहेत. यामध्ये मिहान प्रकल्पाचा विषय आहे. जेएनएनयुआरएम अंतर्गत नागपूरमध्ये काही प्रकल्पांची कामे सुरु आहेत, त्याची माहिती तसेच मुद्रांक शुल्काबाबतही प्रश्न विचारलेला आहे. जेएनएनयुआरएम अंतर्गत नागपूरमध्ये एकूण 19 प्रकल्पांची कामे सुरु असून त्यापैकी 10 कामे पूर्णत्वाकडे गेलेली आहेत व 9 कामे प्रगतीपथावर आहेत. या प्रकल्पांच्या किंमतीमध्ये 300 कोटी रुपयांची वाढ झाल्याचा उल्लेखही त्यांनी केलेला आहे. ज्यावेळी जेएनएनयुआरएम अंतर्गत हा प्रकल्प मंजूर झाला होता त्याचे प्रत्यक्षात काम सुरु करण्यासाठी वाढीव दराच्या निविदा आल्यामुळे तो फरक दिसत आहे. मिहान प्रकल्प सुरु आहे. तेथील उद्योजकांना मुद्रांक शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला आहे का असे त्यांनी विचारलेले आहे. शासनाने तसा निर्णय घेतलेला नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विदर्भ ॲडव्हान्टेज या सेमीनारचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी देखील मिहान प्रकल्पामध्ये गुंतवणूक करण्याबाबत उद्योजकांना विशेष आवाहन करण्यात आलेले आहे असे उत्तर दिलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे मिहान प्रकल्पामध्ये एकही उद्योजकाने उद्योग सुरु केलेला नाही किंवा येण्याच्या मन:स्थितीमध्ये नाही. या प्रकल्पात किती उद्योग सुरु झाले आहेत व भविष्यात करारनामा करुन किती उद्योग सुरु होणार आहेत ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर चौथ्या क्रमांकावर या विषयाची लक्षवेधी सूचना आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्यावेळी प्रश्न विचारावेत. हा विषय उद्योग विभागाशी संबंधित असल्यामुळे माननीय राज्यमंत्री उत्तर देऊ शकणार नाहीत.

श्रीमती शोभा फडणवीस : या लक्षवेधीमध्ये विदर्भ ॲडव्हान्टेजसंबंधीचा विषय आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना मी सांगू इच्छितो की, या विषयाची क्रमांक 4 वर लक्षवेधी सूचना आहे. त्यावेळी मंत्री महोदयांनी उत्तर देण्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे त्या लक्षवेधी सूचनेच्या वेळी आपण प्रश्न विचारावेत.

------

**पृ.शी.**: केंद्र शासनाने प्लाझ्मासाठी दिलेल्या पॅकेजचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान

**मु.शी.**: केंद्र शासनाने प्लाझ्मासाठी दिलेल्या पॅकेजचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान यासंबंधी श्री.किरण पावसकर, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : ॲडव्हान्टेज विदर्भ या कार्यक्रमासंबंधी उद्योजकांमध्ये पसरलेले संभ्रमाचे वातावरण

**मु. शी.** : ॲडव्हान्टेज विदर्भ या कार्यक्रमासंबंधी उद्योजकांमध्ये पसरलेले संभ्रमाचे वातावरण यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 25 व 26 फेब्रुवारी, 2013 रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नागपूर येथे आयोजित केलेल्या "ॲडव्हान्टेज विदर्भ" या कार्यक्रमांत राज्यातील औद्योगिकदृष्ट्या मागास भागामध्ये औद्योगिक वाढीला चालना देण्यासाठी किमान 10 हजार कोटी रूपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा करण्यात येणे, परंतु दिनांक 15 ऑक्टोबर, 2013 पर्यंत या मागास भागात 1 कोटी रुपयांचीही गुंतवणूक न होणे, या धोरणान्वये विदर्भातील नागपूर व अमरावती या दोन जिल्ह्यातील बुटीबोरी, देवरी, धामणगांव येथे प्लँट स्टील प्रॉडक्टस् ॲण्ड ईआरडब्ल्यू पाईप्स मॅन्युफॅक्चरींग, सिमलेस पाईप मॅन्युफॅक्चरींग, टेक्सटाईल मॅन्युफॅक्चरींग, फुड प्रोसेसिंग मॅन्युफॅक्चरींग, डेनिम मॅन्युफॅक्चरींगचे उत्पादनासाठी मे.भूषण स्टील, मे.शौर्य सिमलेस टयूब, मे.ॲव्हगॉल, मे.इनोव्हेटीव्ह टेक्सटाईल, मे.वीएचएम इंडस्ट्रीज, मे.शाम इंडोफॅब, मे.रेमन्ड युसीओ डेनिम, मे.विदर्भ सोया मिल्क, मे.निरभाई टेक्सटाईल, मे.ॲकीटेक्स फॅब्रिक्स या कंपनीसमवेत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने करार करुनही प्रत्यक्षात कोणतीही हालचाल न होणे, या कंपन्यांपैकी अनेक कंपन्यांना ॲडव्हांटेज विदर्भ कार्यक्रमाची घोषणा होऊन 8 महिन्यांचा कालावधी उलटूनही वाटप केलेली जमीन न मिळाल्यामुळे त्यांना तेथे उत्पादन सुरू करता न येणे, तसेच या उद्योगांकरिता शासनाकडून कोणकोणत्या सवलती देण्यात येणार आहेत यासंबंधी कोणतीही माहिती देण्यात न आल्यामुळे उद्योजकांमध्ये पसरलेले संभ्रमाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करावयाची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ( उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील इतर भागाच्या तुलनेत विदर्भात गुंतवणूक न झाल्यामुळे या भागाचा विकास झालेला नाही. त्यामुळे स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचा पुरस्कार होत असतो. हा सर्व भाग मागास राहणे, विकासाचे प्रकल्प न येणे, महाराष्ट्रातील सरासरी दरडोई उत्पन्न 95,339 रुपये आहे. पण विदर्भातील दरडोई उत्पन्न 55 हजार रुपयांनी कमी आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे या भागाचा औद्योगिक विकास व्हावा म्हणून दिनांक 25 व 26 फेब्रुवारी, 2013 रोजी एमआयडीसीने ॲडव्हान्टेज विदर्भ सेमीनार आयोजित केले होते. या परिषदेमध्ये 14,838 कोटी रुपयांचे करार करण्यात आले आहेत. पण प्रत्यक्षात गेल्या वर्षभरामध्ये यातील किती उद्योग सुरु झाले आहेत किंवा प्रगती झाली आहे ? राज्यातील विदर्भामध्ये खनिज संपत्तीचा वाटा दोन तृतीयांश आहे. त्यापैकी 29 टक्के वाटा केवळ चंद्रपूर जिल्ह्याचा आहे. या भागात भरघोस कापूस पिकत असतानाही फक्त 30 टक्के कापसावर प्रक्रिया केली जाते.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

विदर्भामध्ये मोठया प्रमाणावर कापूस होत असताना कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग विदर्भामध्ये वाढविण्याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. 4335 हेक्टर जमिनीवर वसलेल्या मिहान प्रकल्पांतर्गत गेल्या वर्षभरात किती नवीन उद्योग सुरु झाले आहेत ? या ठिकाणी प्रकल्प येत नसतील तर हा पांढरा हत्ती किती दिवस पोसायचा अशा प्रकारची चर्चा विदर्भातील जनता करीत आहे. अमरावतीमध्ये 2800 हेक्टर जमिनीवर केमिकल झोन उभारण्यात आल्यानंतर त्याठिकाणी किती उद्योग सुरु झाले आहेत ? या संदर्भात मी तारांकित प्रश्न देखील विचारलेला होता. त्या प्रश्नाला माननीय उद्योगमंत्र्यांनी "5 वर्षांनी गुंतवणूक येईल" असे उत्तर दिलेले आहे.

सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ॲडव्हाण्टेज विदर्भाची घोषणा केल्यानंतरच्या सहा महिन्यामध्ये किती उद्योग कार्यान्वित झालेले आहेत ? विदर्भामध्ये उद्योग यावेत असे वाटत असेल तर विदर्भामध्ये उद्योगासाठी लागणा-या वीज, रस्ते, पाणी यासारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. विजेला क्रॉस सबसिडी देऊन महाग वीज घेतली जाते. तेव्हा ही क्रॉस सबसिडी रद्द करुन स्वस्त वीज देण्याची मंत्री महोदयांची योजना आहे काय ? नाही तर खोटे कृषिपंप दाखवून वीज खाते वीज लाटत आहे. परिणामी उद्योगासाठी वीज महाग होते आणि उद्योग येत नाहीत अशा प्रकारची चर्चा होत आहे. तेव्हा ही क्रॉस सबसिडी रद्द करण्याची भूमिका मंत्री महोदय घेणार आहेत काय ? लघु उद्योग, मध्यम उद्योग, आयटी पार्क, कापूस, सोयाबीन, संत्रा या पिकांवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा विदर्भातील अनुशेष पुढच्या काळामध्ये कशा प्रकारे टप्याटप्याने कमी करण्यात येणार आहे ? ॲडव्हाण्टेज विदर्भाच्या कार्यक्रमाचा विदर्भाला खऱ्या अर्थाने ॲडव्हाण्टेज होणार आहे की ही केवळ घोषणा आहे ?

श्री. नारायण राणे : सन्माननीय विराधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांची लक्षवेधी सूचना क्रमांक 4 ही दिनांक 10 डिसेंबर 2013 रोजी सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आली होती. परंतु त्या दिवशी कामकाज होऊ न शकल्यामुळे त्या लक्षवेधीवर चर्चा होऊ शकली नाही. सभापती महोदय, मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, त्याच दिवशी प्रश्नोत्तराच्या यादीमधील क्रमांक 27वरील तारांकित प्रश्न क्रमांक 45228 हा याच विषयावर विचारण्यात आलेला होता. एकाच दिवशी एकाच विषयावर तारांकित प्रश्न आणि लक्षवेधी सूचना

..2..

श्री. नारायण राणे...

विचारण्यात आलेली होती. एखाद्या विषयाचा तारांकित प्रश्न सभागृहासमोर आला तर किमान 6 महिने तोच विषय दुसऱ्या आयुधा मार्फत सभागृहामध्ये उपस्थित करता येत नाही अशा प्रथा परंपरा आहेत. परंतु तो विषय आला. माझी उत्तर देण्याची तयारी आहे. यापूर्वी विधिमंडळाच्या कामकाजामध्ये असे होत नव्हते ते आता होत आहे एवढेच मला आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे.

सभापती महोदय, ॲडव्हाण्टेज विदर्भामध्ये जे 28 प्रकल्प आले त्यामधील एकाही प्रकल्पाला जमीन देण्यात आलेली नाही असे लक्षवेधीच्या सूचनेमध्ये म्हटलेले आहे ते खरे नाही. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, त्यावेळी एकूण 28 सामंजस्य करार झाले. त्यापैकी 5 प्रकल्प सुरु झाले असून त्यांनी उत्पादन देखील सुरु केलेले आहे. या प्रकल्पांची गुंतवणूक 692 कोटी रुपये इतकी आहे. 6 प्रकल्पांचे बांधकाम सुरु झाले असून त्यातील अपेक्षित गुंतवणूक 7018 कोटी रुपये आहे. जमीन ताब्यात असलेल्या प्रकल्पांची गुंतवणूक 3808 कोटी रु. आहे.6 प्रकल्पांना जमिनीकरिता देकार पत्रे देण्यात आलेली आहेत.

...नंतर श्री. गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

सभापती महोदय, यामध्ये 483 कोटी रुपयांचे तीन प्रकल्प आहेत, त्यांना देकार पत्र देण्यात आले आहे. परंतु त्यांनी पुढे कोणत्याही प्रकारचे काम सुरु केलेले नाही. एकाही उद्योगाला जमीन देण्यात आली नाही असा उल्लेख लक्षवेधी सूचनेत करण्यात आलेला आहे. याबाबतीत सांगू इच्छितो की, प्रत्यक्षात 97 टक्के जमिनी उद्योग सुरु करण्यासाठी देण्यात आल्या असून प्रत्यक्षात 97 टक्के उद्योजकांनी काम सुरु केलेले आहे. यात काही उद्योजकांनी बांधकाम सुरु केलेले आहे, काही उद्योजकांनी आपले उत्पादनही सुरु केलेले आहे. काही उद्योजकांनी आपल्या उद्योगाचे प्लॅन सादर केले आहेत अशी विविध प्रकारची कामे उद्योजकांनी सुरु केलेली आहेत.

मी या ठिकाणी विदर्भाच्या बाबतीत माहिती देऊ इच्छितो की, विदर्भात मोठया उद्योगांची एकूण संख्या 367 एवढी आहे. या अनुषंगाने 30290 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. रोजगार 90 एवढे आहेत. सुक्ष्म लघुमध्यम उद्योगांची संख्या 25360 एवढी आहे. त्यात 2990 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. यातून 2 लाख 30 हजार एवढा रोजगार प्राप्त झालेला आहे. एकूण 25627 उद्योगांची संख्या असून 33280 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून 3 लाख 20 हजार रोजगार प्राप्त झालेला आहे. विदर्भात भविष्यासाठी किती उद्योग येणार आहेत अशी आपण माहिती विचारली. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, विदर्भात नियोजित उद्योग येऊ पाहता आहेत, त्यामध्ये मोठे उद्योग 110 आहेत. 57 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे आणि रोजगार 44 हजार एवढा निर्माण होणार आहे. सुक्ष्म, लघु मध्यम उद्योग 1730 सुरु होणार आहेत. यात 3600 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे आणि 1 लाख 65 हजार एवढा रोजगार निर्माण होणार आहे. विशाल प्रकल्प 41 येणार आहेत. यात 13320 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. 21600 एवढा रोजगार निर्माण होणार आहे. नियोजित प्रकल्प 67 आहेत. 56890 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे, 34600 एवढा रोजगार निर्माण होणार आहे अशा पध्दतीचे विदर्भाचे चित्र आहे.

आपण असे म्हणालात की, एका बाजूला उद्योग होत असले तरी त्यांना लागणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. मी या संदर्भात सांगू इच्छितो की, गेल्या 15 दिवसापूर्वी राज्यातील वेगवेगळया एमआयडीसीच्या माध्यमातून उद्योगांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी 3 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली असून काही ठिकाणी पायाभूत सुविधांच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

कामासंबंधीच्या वर्क ऑर्डरही देण्यात आलेल्या आहेत. या तरतुदीतील 450 कोटी रुपये विदर्भात ज्या ज्या ठिकाणी एमआयडीसी आहेत तेथील रस्ते, पाणी, ड्रेनेज, इत्यादी व्यवस्थेसाठी देण्यात आलेले आहेत. विदर्भातील उद्योगांना एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून आदर्श पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. 2013 च्या नवीन औद्योगिक धोरणा नुसार आम्ही विदर्भात जास्त उद्योग येण्यासाठी अधिकच्या सवलती दिलेल्या आहेत. वीज दरात एक रुपयाची सूट दिली.

सभापती महोदय, नागपूर हे "डी" झोनमध्ये येते. नागपूर वगळता विदर्भातील सर्व जिल्हे व तालुके हे " डी प्लस" मध्ये येतात. त्यामुळे "डी प्लस" दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती देत आहोत. विदर्भात जास्तीत जास्त उद्योग यावेत म्हणून या सवलती देण्यात येत आहेत. विदर्भात जास्तीत जास्त उद्योग यावेत म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत. आम्ही गेल्या वर्षी दिनांक 25 आणि 26 फेब्रुवारी, 2013 रोजी "ॲडव्हांटेज विदर्भ" कार्यक्रम आयोजित केला होता. "ॲडव्हांटेज विदर्भा" मध्ये 14838 कोटी रुपयांचे करार झाले. मी आताच सांगितले की, विदर्भासाठी 483 कोटी रुपये खर्च सोडला तर उर्वरित रक्कम खर्च झालेली आहे. उद्योग उभारणीची बरीच कामे सुरु आहेत. वडसा-देसाईगंज, जिल्हा गडचिरोली येथे 300 एकर जागेवर एम.आय.डी.सी.निर्माण करण्याचे आम्ही ठरविले आहे. गडचिरोली जिल्हा हा नक्षलाईट जिल्हा आहे म्हणून तेथे वेगळया सवलती आहेत. विदर्भातील जिल्हे डी प्लस असल्यामुळे वेगळया सवलती शासनाने दिलेल्या आहेत. विदर्भ हा मागासलेला भाग आहे, तो भाग मागासलेला राहू नये, मोठया प्रमाणात रोजगार निर्माण व्हावा म्हणून अधिकच्या सवलती राज्य शासनाकडून देण्यात येत आहेत. उद्योजकांना आकर्षित करुन हा विदर्भ महाराष्ट्रातील अन्य भागाप्रमाणेच विकसित व्हावा असा आमचा प्रयत्न आहे. विदर्भाचा विकास व्हावा असा राज्य शासनाचा हेतू आहे. चांगल्या नजरेने पाहिले तर चांगले दिसते एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. भोगले...

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयात कोळसा, चूनखडी आदी खनिज संपत्ती मोठया प्रमाणात आहे. त्या जिल्हयात नवीन उद्योग येणार नाहीत असे धोरण शासनाने ठरविले आहे. त्यामुळे खनिज संपत्तीवर आधारित उद्योगांना चंद्रपूरमध्ये परवानगी देण्यात येईल काय? चंद्रपूर एमआयडीसीमध्ये उन्हाळ्याच्या तीन महिन्यामध्ये पाण्याअभावी उद्योग बंद असतात. वर्धा नदीचे पाणी त्या एमआयडीसीला दिले जाते. त्या ठिकाणी 9 ऊर्जा प्रकल्पांना मान्यता दिलेली असल्यामुळे एमआयडीसीवर परिणाम झाला आहे. या एमआयडीसी क्षेत्रासाठी वेगळी पाण्याची व्यवस्था करण्यात येईल काय? अनेक लोकांनी बुटीबोरी, मूल एमआयडीसी क्षेत्रात जमिनी घेऊन ठेवल्या आहेत, त्यांनी मागील दहा वर्षापासून या जमिनींचा वापर केलेला नाही. वर्धा एमआयडीसीमध्ये जमिनी घेऊन लोकांनी स्वत:ची घरे बांधली आहेत, उद्योग सुरु केलेले नाहीत. त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहात?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, शेवटच्या प्रश्नाला 'होय' असे उत्तर आहे. जमीन खरेदी केल्यानंतर उद्योग सुरु करण्यासाठी चार-पाच वर्षाची मुदत दिली जाते. या मुदतीत ज्यांनी उत्पादन सुरु केले नाही अशा सर्वांना जमीन परत का घेऊ नये अशा प्रकारची नोटीस दिली आहे. जमीन परत घेण्याची प्रक्रिया आजही सुरु आहे. चंद्रपूरमध्ये नवीन उद्योग सुरु करण्यास बंदी केल्याबाबत उद्योग विभागाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. परंतु पर्यावरण विभागाच्या माध्यमातून कोर्टाने काही आदेश दिलेले आहेत. त्या भागामध्ये कारखान्यांना परवानगी देऊ नये यासंबंधी राज्य सरकारने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. एमआयडीसी क्षेत्रात ज्यांनी जागा घेऊन अद्याप उद्योग सुरु केलेले नाहीत त्यांच्या जागा परत घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यातील काही उद्योजकांनी नवीन धोरणाप्रमाणे कारखाना सुरु करण्याची तयारी दर्शविली तर त्यांना परवानगी दिली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : चंद्रपूर एमआयडीसी क्षेत्रासाठी पाण्याची व्यवस्था नाही.......

श्री.नारायण राणे : पाण्याची व्यवस्था करु. नवीन धोरणाप्रमाणे स्थानिक लोकांना प्रशिक्षण देण्याचीही योजना सुरु केली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदय फार हुशार संसदपटू आहेत. विदर्भात कसे आलबेल सुरु आहे, किती उद्योग सुरु झाले हे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. इंग्रजांच्या काळात काय झाले हे त्यांनी सांगितले नाही हे आमचे सुदैव मानतो.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, ॲडव्हाण्टेज विदर्भ यानंतर काय झाले याबाबत आमचा स्पेसिफिक प्रश्न आहे. ॲडव्हाण्टेज विदर्भानंतर ज्या वेगाने प्रगती व्हायला पाहिजे होती तितकी ती झाली आहे असे मंत्री महोदयांना वाटते का? विदर्भ हा राज्याचा एक अविभाज्य भाग आहे. अमुक इतके प्रकल्प आले, अमुक लोकांना रोजगार मिळाला याची आकडेवारी छापून येईल. प्रत्यक्षात तसे घडलेले आहे का? विदर्भ ॲडव्हाण्टेज कार्यक्रम ज्या कल्पनेने राबविला गेला त्यानंतर प्रत्यक्ष तेवढी आर्थिक गुंतवणूक आली का? गेल्या वर्षभरात किती रोजगार निर्मिती झाली?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, ॲडव्हाण्टेज विदर्भ कार्यक्रम 25 व 26 फेब्रुवारी, 2013 रोजी घेण्यात आला होता. 14838 कोटी रुपये गुंतवणुकीचे करार झाले. 28 सामंजस्य करारापैकी 5 प्रकल्प उत्पादनात गेलेले आहेत. त्यांची गुंतवणूक 692 कोटी रुपयांची आहे. बांधकाम सुरु असलेले 6 प्रकल्प असून त्यांची गुंतवणूक 7018 कोटी रुपयांची झाली आहे. बांधकाम पूर्ण होताच त्यांचे उत्पादन सुरु होईल. जमीन ताब्यात घेतलेले असे 8 प्रकल्प असून त्यांची गुंतवणूक 3808 कोटी रुपयांची आहे. देकार असलेले 6 प्रकल्प असून 2663 कोटी रुपये इतकी त्यांची गुंतवणूक आहे. जमीन ताब्यात घेतलेली नाही असे फक्त 3 टक्के म्हणजे 3 प्रकल्प असून त्यांची गुंतवणूक 483 कोटी रुपयांची असणार आहे. त्यांनी अजून उत्सुकता दाखविलेली नाही.

नंतर के.1....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

आमच्याशी एकदा करार झाल्यानंतर, जमीन घेतल्यानंतर त्या उद्योजकाला आपला उद्योग सुरू करण्यासाठी 4 ते 5 वर्षाचा कालावधी असतो. अजूनही त्यांच्याकडे पुढील 4 वर्षाचा कालवधी आहे. या उद्योजकांनी 4 वर्षात कारखाने उभे करून रोजगार द्यावा. आम्ही जे करार केले आहेत त्यावर माझा विश्वास आहे. ॲडव्हान्टेज विदर्भ अंतर्गत ज्यांनी करार केले आहेत त्यातील 3 प्रकल्प सोडून उर्वरित सर्व प्रकल्प सुरू होणार आहेत. त्यातून हजारो नव्हे तर लाखो बेरोजगारांना रोजगार मिळणार आहे.

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यात गौण खनिज हे वन जमिनीच्या खाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात खनिजावर आधारित कोणताही उद्योग काढावयाचा असेल तर वन जमिनीच्या बाबतीत कायद्यान्वये काही सूट देण्यात येणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सदर प्रश्न हा आमच्याशी संबंधित नाही. याबाबत केंद्र शासनाचे मार्गदर्शन घ्यावे लागेल. एखाद्याने अशा प्रकल्पाची मागणी केली तर सूट मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

.....

**लधवेधी सूचना क्रमांक 5 बाबत**

**उप सभापती** : लक्षवेधी क्रमांक 5 पुढे ढकलण्यात येत असून आता लक्षवेधी सूचना क्रमांक 6 घेण्यात येत आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वक्फ बोर्डाच्या अखत्यारितील नांदेड शहरातील कामिलदाद दर्ग्याची जागा विकणे

**मु. शी.** : वक्फ बोर्डाच्या अखत्यारितील नांदेड शहरातील कामिलदाद दर्ग्याची जागा विकणे यासंबंधी ॲड.अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.अनिल परब (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अल्पसंख्याक मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील नांदेड येथील शहर कामिलदाद दर्ग्याची हबीब टॉकिज जवळील सर्व्हे क्र. 1 वरील 3 एकर 13 गुंठे, जमीन अलियास पिता महमद उस्मान, महमद उस्मान पिता अहमदभाई, मैमुमाबी भ्र अब्दुल जलील, बिल्कीस बानू भ्र महमद हसन या चौघांकडे भाडेतत्वावर फार पूर्वीपासून असणे, या चौघांनी दिनांक 15 जून, 2009 रोजी महमद मुख्यार पिता अब्दुल सत्तार व विखार महमद खान पिता मसूद अहमद खान, दोघेही रा.नांदेड यांना उक्त जमीन खरेदी खत करुन स्टॅम्प ड्युटी भरून विकणे, नंतर या दोघांनी दिनांक 15 नोव्हेंबर, 2010 रोजी शेख हबीब पिता शेख अब्दुल बावजीर, शेख अयुब पिता शेख नवी रा.नांदेड यांना सदर जमीन विकणे, ही विकलेली मालमत्ता वक्फ बोर्डाने दिनांक 1 नोव्हेंबर, 2011 रोजी महमद खलिद अहमद अब्दुल रशीद यांना एक वर्षासाठी भाडेकरार करुन भाडेतत्वावर भाड्याने देणे, महाराष्ट्र शासनाच्या 31 ऑक्टोबर, 1974 च्या राजपत्रामध्ये पृष्ठ क्र.40, अनुक्रमांक 35 वर सदर जमीन इनामी असून वक्फ प्रॉपर्टी असल्याची नोंद असणे, मूळ भाडेकरुंनी त्यांच्या ताब्यातील प्रॉपर्टी विकण्याच्या व्यवहारामध्ये सिटी सर्व्हे व रजिस्टर ऑफीस, नांदेड येथील अधिकाऱ्यांनी प्रापर्टी कार्डामध्ये जाणूनबूजून खोटी नोंद करणे, या सर्व खरेदी-विक्री व्यवहारामध्ये मूळ भाडेकरू वक्फ बोर्ड, सिटी सर्व्हे ऑफीस, स्टॅम्प ऑफिस इत्यादी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी संगनमताने लाखो रूपयांचा गैरव्यवहार करणे, या संदर्भात वक्फ बोर्डाकडे तक्रारी करुनही त्यांनी कोणतीही कारवाई न करणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व भूमिका."

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसिम खान (अल्पसंख्याक मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या मोक्याच्या जमिनी लाटल्या जात आहेत त्याचे हे जिवंत उदाहरण आहे. सदर जमीन ही वक्फ बोर्डाची असून ती त्यांनी स्वत:च्या नावावर करून घेतली आहे. त्यानंतर सदर जमीन त्यांनी भाडेतत्त्वावर दिली. ज्यांना सदर जमीन भाडेत्त्वावर दिली त्यांनी ही जमीन विकली. जी जमीन विकली त्याचे खरेदी खत, विक्री खत, त्याचे रजिस्ट्रेशन माझ्याकडे आहे. ज्यांना ही जमीन विकली त्यांनी ती जमीन दुसऱ्याला विकली. तिसऱ्याने ही जमीन पुन्हा भाडेतत्त्वावर दिली. या सर्वांची नावे मी आपल्याकडे देतो. माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे वक्फ बोर्डाची जमीन विकता येते काय, नसल्यास ज्यांनी ही जमीन विकली, ज्यांनी हे खोटे दस्तऐवज बनविले, ज्यांनी ही जमीन रजिस्ट्रर्ड करून घेतली त्यांच्या विरूद्ध आपण फौजदारी स्वरूपाची कारवाई करणार आहात काय ? यात जे जे अधिकारी गुंतलेले आहेत, त्यांना तात्काळ निलंबित करण्यात येणार आहे काय ? या विकलेल्या जमिनीचे खरेदी खत नांदेडच्या महापौरांच्या मुलाच्या नावाने आहे. तेव्हा याची संपूर्ण चौकशी करून तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे काय व सदर जमीन वक्फ बोर्डाच्या ताब्यात घेण्यात येणार आहे काय ?

श्री.नसिम खान : सभापती महोदय, वक्फ बोर्डाची जागा विकण्यासंबंधातील तरतूद कायद्यामध्ये आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. केंद्रीय वक्फ कायदा 1995 आपल्या देशात लागू झालेला आहे. वक्फ जाहीर झाल्यानंतर कधीही जागा विकता येत नाही, अशा प्रकारची तरतूद केंद्रीय वक्फ कायदा 1995 मध्ये आहे. सन्माननीय सदस्यांनी नांदेड जिल्ह्यातील वक्फ बोर्डाच्या जागे संबंधातील प्रश्न उपस्थित केला आहे. या जागेचे क्षेत्रफळ 18 x 24 फूट आहे. या जागेवर महानगरपालिकेची परवानगी घेऊन एक इमारत बांधण्यात आली आहे, अशा प्रकारची माहिती वक्फ अधिकाऱ्यांनी आमच्याकडे दिलेली आहे. यात कुठल्याही प्रकारची चुकीची कार्यवाही झाली असेल, वक्फ बोर्डाची जागा विकली असेल तर वक्फ कायदा, 1995 मधील सेक्शन 54 अंतर्गत कारवाई करून सदर जागा ताबडतोब परत घेण्याचा निदेश वक्फ अधिकाऱ्यांना देण्यात येईल.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसिम खान......

संबंधित जागेच्या रेकॉर्डवर वक्फ बोर्डाचे नाव असतानाही महसूल अधिकाऱ्यानी त्या जागेवर रजिस्ट्रेशन केले असेल तर यासंदर्भात चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या जागेचा व्यवहार झाल्याचा उल्लेख केलेला आहे. एकदा नव्हे तर तीन वेळा झालेल्या व्यवहाराचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. हा जो पत्र व्यवहार आहे तो सरकार दरबार मधील असल्यामुळे आपल्याला तो नाकारता येणार नाही. तीन वेळा ट्रान्सफर कसे झाले आणि चौथ्या वेळेस भाडयाने कसे काय दिले गेले हा मुख्य प्रश्न आहे. वक्फ बोर्डच्या अधिकाऱ्यावर या अगोदरही निलंबनाची कारवाई झाली होती. वक्फ बोर्डाच्या जमिनी बेमालूमपणे विकण्यासाठी कायद्याच्या पळवाटा शोधणे अशा प्रकारच्या कारवाया अधिकाऱ्यांनी केलेल्या आहेत. सन्माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नामध्ये लक्ष घातले आहे याबद्दल वाद नाही. वक्फ बोर्डाचा कायदा सुस्पष्ट असून त्यांच्या कारवाया सुध्दा सुस्पष्ट आहेत. असे असताना यामध्ये पुन्हा चेक करण्याचे कारणच काय ? ही जागा 18x24 असल्यामुळे तो महत्वाचा विषय नाही असे नाही. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, तर काळ सोकावतो आहे याचे आम्हाला दु:ख आहे. राज्यामध्ये वक्फ बोर्डाच्या अनेक प्रश्नाला आपण सामोरे गेलेलो असून वक्फ बोर्डाच्या अनेक जागा अशाच पध्दतीने विकून त्यांचा गैरवापर केला गेला आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांच्याकडे जी माहिती आहे ती गृहीत धरुन तात्काळ कारवाई केली जाणार आहे काय ? संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय त्या जागेवर इमारत उभी राहूच शकणार नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर तत्काळ कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. नसिम खान : सभापती महोदय, 1995 चा जो केंद्रीय कायदा आहे त्यातील सेक्शन 54 प्रमाणे कारवाई करता येते. ही जागा भाडेपट्टयावर ट्रान्सफर करण्यात आलेली आहे अशी आमच्याकडे माहिती आहे. वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी ही जागा ट्रान्सफर करुन भाडेपट्टयावर दिलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, ही जमीन विकली गेली असून त्या जमिनीचा करारनामा सुध्दा त्यांच्याकडे आहे. यासंदर्भातील जी काही कागदपत्रे सन्माननीय सदस्यांकडे आहेत ती आमच्याकडे द्यावेत अशी मी त्यांना विनंती करतो तसेच या प्रश्नाच्या संदर्भात संबंधितांवर आठ दिवसाच्या आत कारवाई केली जाईल एवढे मी या नमित्ताने सांगू इच्छितो.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की,सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाच्या संदर्भात सर्व माहिती आपल्या प्रशासनाकडे दिलेली आहे. प्रशासनाकडे माहिती आल्यानंतर हा प्रश्न या सभागृहात येणार आहे याची माहिती असतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या प्रश्नावर अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही करु नये ? या प्रश्नाची मला माहिती घ्यावी लागेल असे माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितलेले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदयांवर सभागृहात नामुष्की ओढवली आहे त्यामुळे अशा प्रकारे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आपण कोणती उपाययोजना करणार आहात असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी विचारलेला आहे. त्यामुळे या प्रश्नाला आपण ठाम उत्तर द्यावे असे माझे मत आहे.

श्री. नसिम खान : सभापती महोदय, यासंदर्भातील कारवाई करण्याचे काम वक्फ बोर्डाच्या अखत्यारीत असते. शासन वक्फ बोर्डाच्या कामामध्ये डे टू डे हस्तक्षेप करीत नसते. वक्फ बोर्डाच्या अखत्यारीत वक्फ बोर्डाचे काम चालत असते. वक्फ बोर्डाला जी काही मदत लागत असते ती सर्व मदत शासन वक्फ बोर्डाला वेळोवेळी देत असते. यासंदर्भात सीईओ यांना कारवाई करण्याचे अधिकार आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात सेक्शन 54 खाली कारवाई करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:00

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. वक्फ बोर्डाच्या जमिनीचा प्रश्न प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित होतो. वक्फ बोर्डाच्या 92 हजार एकर जमिनीपैकी 60 टक्के जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे. मध्यंतरी दिल्लीची जॉईन्ट पार्लमेन्टरी समिती महाराष्ट्रात आली होती. त्या समितीची औरंगाबाद येथे बैठक झाली. त्या समितीमध्ये वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील अतिक्रमणे उठवून त्या जमिनी वक्फ बोर्डाच्या ताब्यात देण्याचा निर्णय झाला. औरंगाबाद येथील एम.पी.लॉ कॉलेज हे वक्फ बोर्डाच्या जमिनीवर आहे. महानगरपालिका, जिल्हा परिषदांची कार्यालये अनधिकृतपणे वक्फ बोर्डाच्या जमिनीवर आहेत. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी त्या विभागांवर काय कारवाई केली याची आपण माहिती घेतली काय ? मागे सभागृहात वक्फ बोर्डाचा विषय आला त्यावेळी वक्फ बोर्डाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एम.वाय.पटेल यांची चौकशी करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते. त्यांची चौकशी झाली काय ? चौकशी झाली असेल तर त्याचा अहवाल आला काय ? त्यानंतर वक्फ बोर्डावर आलेले मुख्य कार्यकारी अधिकारी जमिनीच्या व्यवहारामध्ये सापडले असल्याचे आपण पाहतो. मध्यंतरी एका अधिकाऱ्याकडे किती मालमत्ता होती हे आपण पाहिले. म्हाडातील एसआरए विभागात जाण्यासाठी अधिकारी उत्सुक असतात त्याप्रमाणे वक्फ बोर्डावर जाण्यास अधिकारी उत्सुक असतात. माझा प्रश्न आहे की, वक्फ बोर्डाच्या मालकीच्या मालमत्तेचे संगणकीकरण किती दिवसांत करणार आहात ? आपण संगणकीकरण केले नाही तर वक्फ बोर्डाच्या जमिनी लुटायला आपण मुभा देत आहात असा अर्थ निघू शकतो. तेव्हा वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनीच्या नोंदीचे संगणकीकरण किती दिवसांत करणार आहात ?

श्री.नसीम खान : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला ती वस्तुस्थिती आहे. वक्फ बोर्डाच्या मालमत्तेवर अनधिकृतपणे अतिक्रमणे झाली आहेत. राज्यात केंद्रीय कायदा स्थापित झाल्यानंतर राज्य वक्फ मंडळाने जमिनीवरील अतिक्रमणे उठविण्यासाठी कार्यवाही सुरु केलेली आहे. मागील तीन वर्षात 552 एकर पेक्षा जास्त जमिनीवरील अतिक्रमणे उठविण्यास आम्हाला यश आले आहे. सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर उच्च न्यायालय, नागपूर आणि औरंगाबाद वक्फ ट्रॅब्युनल या कोर्टामध्ये जमिनीवरील अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी 476 केसेस करण्यात आलेल्या आहेत. या विषयाच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान....

संदर्भात शासन गंभीर आहे. या ठिकाणी सांगण्यात आले की, महानगरपालिका आणि जिल्हापरिषदांची कार्यालये वक्फ बोर्डाच्या जमिनीवर आहेत. त्या संदर्भात आम्ही शासकीय पातळीवर अनेकवेळा बैठका घेतलेल्या आहेत. वक्फ बोर्डाच्या जागेवर शासकीय किंवा निमशासकीय कार्यालये असतील तर ती काढण्याच्या बाबतीत वक्फ बोर्डाने निर्णय घेतलेला आहे आणि ती कारवाई प्रगतीपथावर आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, वक्फ बोर्डाच्या मालमत्तेच्या नोंदीचे संगणकीकरण झाले पाहिजे. त्याबाबत सांगू इच्छितो की, शासनाने गेल्या वर्षापासून ही कार्यवाही सुरु केलेली आहे. वक्फ बोर्डाकडे 8 हजार संस्था रजिस्टर्ड झालेल्या आहेत. त्यापैकी 6 हजार 800 संस्थांचे संगणकीकरण झालेले आहे. वक्फ बोर्डाकडे रजिस्टर्ड असलेल्या प्रत्येक संस्थेचे संगणकीकरण झाले पाहिजे. वक्फ बोर्डाच्या मालमत्तेचे विवरण वेबसाईटवर दिले पाहिजे जेणेकरुन सर्वांना वक्फ बोर्डाची कोणत्या जिल्ह्यात किती मालमत्ता आहे याची माहिती होईल आणि लोक कारवाईसाठी पुढे येऊ शकतील.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान....

या संदर्भातील 80 टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित 20 टक्के काम दोन-तीन महिन्यांत पूर्ण होईल. वक्फ बोर्डाला आणखी बळकट करण्यासाठी राज्याचे लाडके मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी अत्यंत चांगला निर्णय घेतला आहे. वक्फ बोर्डाच्या माध्यमातून कडक कारवाई करण्यासाठी दोन महिन्यांपूर्वीच वक्फ बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर ज्युडिशियरीमधून दिवाणी न्यायाधीशाची नेमणूक करण्यात यशस्वी आपण झालो आहोत. महोदय, देशात महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे की, ज्या राज्याने वक्फ बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर दिवाणी न्यायाधीशाची नियुक्ती केली आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:10

**पृ. शी.** : इतर मागासवर्गीयांसाठी नॉन क्रिमिलीअरसाठीची मर्यादा सहा लाख रुपयांवरुन साडेचार लाख रुपये करणे

**मु. शी.** : इतर मागासवर्गीयांसाठी नॉन क्रिमिलीअरसाठीची मर्यादा सहा लाख रुपयांवरुन साडेचार लाख रुपये करणे, या संबंधी सर्वश्री जयवंतराव जाधव, दिपकराव साळुंखे, राजेंद्र जैन, हेमंत टकले, संदीप बाजोरिया, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, सतीश चव्हाण, विक्रम काळे, अमरसिह पंडित, धनंजय मुंडे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे, डॉ.रणजीत पाटील, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे,,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"केंद्र शासनाच्या दिनांक 27 मे, 2013 रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे राज्य शासनाने दिनांक 24 जून, 2013 च्या शासन निर्णयानुसार इतर मागासवर्गीयांसाठी नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा सहा लाख रूपये करणे, राज्यामध्ये आरक्षण व नॉन क्रिमीलेअरच्या सवलती लागू करुनही राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने दिनांक 31 ऑगस्ट, 2013 रोजी एका परिपत्रकाद्वारे शिष्यवृत्तीसाठी चार लाख पन्नास हजार रुपये हीच उत्पन्न मर्यादा ग्राह्य धरली जाईल असे मार्गदर्शक निर्देश निर्गमित करून संभ्रम निर्माण करणे, वास्तविक राज्य शासनाकडून केंद्रिय नियोजन आयोगाच्या नॅशनल ॲलोकेशनला ओबीसी विद्यार्थ्यांची माहिती विहित वेळेत पाठविली जात नसल्यामुळे केंद्र शासनाच्या अंदाजपत्रकामध्ये ओबीसी शिष्यवृत्तीसाठी तरतूद केली जात नसल्याचे उघडकीस येणे, ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा राज्यशासनावर अधिक भार पडतो अशी होत असलेली ओरड भारत सरकार मॅट्रीकोत्तर योजनेचा राज्य स्तरावरील आर्थिक भार कमी करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाने नेमलेली समिती बरखास्त करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, 2013 च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास शासनाकडे केलेली मागणी, तसेच केंद्र

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

शासनाने 1998 च्या आदेशांत इमाव विद्यार्थ्यांना संपूर्ण 100 टक्के खर्च देण्याचे नमुद असतांनाही खर्चाच्या 50 टक्केच शिष्यवृत्ती दिली जात असणे, यामुळे इतर मागासवर्गीय समाजामध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, यावर शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 12:10

निवेदनानंतर

श्री.जयवंतराव जाधव : महोदय, या विषयावर कालच विधानसभा सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. त्यामुळे बरेच विषय वर्तमानपत्रातून आम्हाला समजलेले आहेत. परंतु काही बाबी रेकॉर्डवर येणे गरजेचे असल्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना काही प्रश्न विचारतो. केंद्र सरकारने दि.27 मे, 2013 रोजीच्या अधिसूचनेनुसार नॉन क्रिमिलेअरची मर्यादा साडेचार लाख रुपयांवरुन सहा लाख रुपयांवर नेली. राज्याच्या मंत्रिमंडळाने सुध्दा ही मर्यादा 6 लाख रुपयांपर्यंत नेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दि.24 जून, 2013 रोजी साडेचार लाख रुपये असलेली मर्यादा सहा लाख रुपयांवर नेली असल्याचा जी.आर. शासनाचे अवर सचिव श्री.वडते यांनी काढला. परंतु नंतर एक महिन्यातच म्हणजे दिनांक 31 ऑगस्ट, 2013 रोजी शासनाचे उप सचिव श्री.लोणारे यांनी ही मर्यादा सहा लाख नव्हे तर साडेचार लाख रुपयेच असल्याचा आदेश काढला. नॉन क्रिमिलेअरसाठी सहा लाख रुपयांची मर्यादा झाली असे गृहीत धरुन अनेक विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजमध्ये प्रवेश घेतले. परंतु लगेच एक महिन्यात दुसरा शासन निर्णय निर्गमित केल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या, त्यांच्या डोक्यावर टांगती तलवार आली. अशा प्रकारचा आदेश निर्गमित करण्यासाठी कोणता आधार घेण्यात आला होता हे माहीत नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, अशा प्रकारचा जी.आर. निर्गमित करण्याची जबाबदारी कोण घेणार आहे ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, शिष्यवृत्तीच्या कारणास्तव प्रवेश नाकारणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्यात येईल. मी स्पेसिफिक विचारतो की, ज्या अधिकाऱ्यांमुळे विद्यार्थ्यांवर अशी वेळ आली त्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत शासन काय कारवाई करणार आहे ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, शिष्यवृत्तीचा फेरआढावा घेण्यासाठी जी समिती गठीत करण्यात आली आहे ती रद्द करण्यात येईल. ही समिती रद्द करण्यासाठी दोन दिवस का लागत आहेत हे मला समजत नाही. त्यामुळे मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, ही समिती आजच्या आज बरखास्त करण्यात येईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, केंद्र सरकारने सहा लाख रुपयांची मर्यादा नॉन क्रिमिलीअरसाठी लागू केली आहे. ही मर्यादा आपल्या राज्यामध्ये रिझर्व्हेशनसाठी लागू झाली आहे. मागासवर्गीयांच्या नोकऱ्यांसाठी किंवा शैक्षणिक प्रवेशासाठी ही मर्यादा सहा लाख रुपयेच आहे. केंद्र सरकार 100 टक्के रक्कम देत नाही म्हणून ही मर्यादा सहा लाख रुपयांवरुन

..5..

श्री.शिवाजीराव मोघे....

साडेचार लाख रुपये करण्यासाठी मंत्रिमंडळात जावे लागते. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, 1100 कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम प्रलंबित आहे. या बाबतचा निर्णय प्रोसेसमध्ये आहे. साधारणत: एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळात यावर निर्णय होईल.

ॲड.निरंजन डावखरे : महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, शिष्यवृत्तीचा फेर आढावा घेणारी बांठिया समिती रद्द करण्यात येईल काय ? माननीय मंत्र्यांनी सांगितले की, केंद्र सरकारकडून पूर्ण निधी येत नाही. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, राज्य शासन राज्याच्या मंजूर तरतुदीतून इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी निधी उपलब्ध करीत आहे. सदर योजनेंतर्गत शासन निर्णय दिनांक 13 मार्च, 2012 नुसार इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अंतर्गत 50 टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्यात येते. मघाशी माननीय मंत्र्यांनी संगितले की, शिष्यवृत्तीच्या कारणास्तव प्रवेश नाकारणाऱ्या महाविद्यालयांवर आपण कारवाई करणार आहात. परंतु पुणे विद्यापीठामध्ये वरिष्ठ लिपिक असे आहेत की, जे प्रधान सचिवांनी आदेश देऊनही महाविद्यालयांना शिष्यवृत्तीचे पैसे देत नाही.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. निरंजन डावखरे ....

ते सिनिअर क्लर्क राहुल कोंडाळकर आहेत. प्रधान सचिवांनी सांगितले तरीही ते तिकडे "माझे काय" हा विषय घेऊन समाजकल्याण अधिकाऱ्यांकडे फाईल जाऊ देत नाहीत. तिकडे अशी सातत्याने सर्व कॉलेजची कोंडी होते. आपण या स्पेसिफिक सिनिअर क्लर्कवर काही कारवाई करणार आहात का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी कालच विधानसभेत म्हटले होते की, 2 दिवसांत बांठिया कमिटी रद्द करण्यात येईल. कदाचित आज संध्याकाळपर्यंत त्या संदर्भातील ऑर्डर निघेल. आपण सिनिअर क्लर्कच्या संदर्भात तक्रार करून माझ्याकडे नाव दिले आहे. नियमबाह्य कृत्य असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. येथे 2 महत्त्वाच्या गोष्टी आहेत. केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे 6 लाख रूपयांची मर्यादा आहे तर त्याचा वेगळा जीआर काढण्याची आवश्यकता काय होती ? सन्माननीय सदस्यांनी अधिकाऱ्यांची नावे सांगितली. आपल्याकडे प्रथा, परंपरा आहे की, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती ग्राह्य धरून, ती सत्य समजून संबंधितावर कारवाई होणे आवश्यक आहे. 1 महिन्याच्या गॅपमुळे, चाडे चार लाख रूपयांवरून 6 लाख रूपयांपर्यंतचा क्रिमिलेअर वाढल्यामुळे, ज्यांनी प्रयत्न केला असेल त्यांचा दोष काय आहे ? अधिकाऱ्यांच्या गलथानपणामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार असेल तर त्याबाबतीत शासन काय निर्णय घेणार आहे ? सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे सांगत आहेत की, कोंडाळकर नावाचे क्लर्क सचिवांकडून आदेश जात असतानाही पाळत नाहीत. यापेक्षा वेगळे काय आहे ? आज संध्याकाळपर्यंत किंवा हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्यांच्यावर तत्काळ कारवाई होणार का ? 1 महिन्याच्या गॅपमुळे प्रश्न तयार झाला आहे, विद्यार्थ्यांच्या बाबतीत अडचणी निर्माण झाल्या आहेत, त्यांना शासन कशी मदत करणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, संबंधित क्लर्कवर अधिवेशन संपण्यापूर्वी नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी साडेचार लाख रूपयांच्या मर्यादेबाबतचे काय असे विचारले. मला अतिशय नम्रपणे सांगावेसे वाटते की, केंद्र शासनाची उत्पन्नाची मर्यादा एक लाख रूपये आहे, आपल्या राज्यात साडे चार लाख रूपयांची मर्यादा आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे ....

देशामध्ये असे कुठेच नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात आपण पैसे देतो. बोनस शॉर्टेज होता, हे बरोबर आहे. त्यामुळे राज्य सरकारचा पैसा द्यावा लागतो. परंतु, ते देणे होत नाही. मागील वर्षी 302 कोटी देणे होते, ते आता जून-जुलैमध्ये दिले आहेत.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तरात सांगितले की, संबंधित क्लर्कवर कारवाई करण्यात येईल. ते बरोबरही आहे. कारण जीआर 6 लाख रूपयांचा काढण्याऐवजी 4 लाख रूपयांचा काढला. हे सहज झालेले नाही. अनावधानाने झाले, असे वाटत नाही. जाणूनबुजून असा खोडसाळपणा केल्याचे दिसत आहे. माननीय मंत्र्यांनी संगितले की, आजच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल. केंद्र सरकार एससी, एसटीच्या शिष्यवृतीच्या संदर्भात तरतूद करते. तत्कालीन मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांनी ओबीसींच्या संदर्भात जाहीर केले होते की, ओबीसींना सुध्दा 50 टक्के शिष्यवृत्ती देण्यात येईल. परीक्षा फी आणि शिक्षण फी म्हणून ती रक्कम देण्यात येते. त्यावेळपासून हे सातत्याने सुरू आहे. विद्यार्थ्यांना मदत मिळत होती. पण मागील 2-4 वर्षांत अशी शिष्यवृत्ती म्हणजे शिक्षण फी आणि परीक्षा फी कमी करण्यात आली किंवा बंद करण्यात आली.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

म्हणून मागील काळातील काही पैसे थांबलेले आहेत. त्यामुळे शिक्षण फी व परीक्षा फी तत्काळ देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. यावेळच्या पुरवणी मागण्यांमध्ये त्यासाठी तरतूद केलेली आहे. विद्यार्थ्यांना ही रक्कम परीक्षेपूर्वी देणे आवश्यक आहे. ओबीसीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षा फी भरली नाही तर त्यांना परीक्षेला बसता येणार नाही अशी त्यांना भीती वाटत आहे. त्यामुळे विदर्भ, कोकण व खानदेशातील विद्यार्थ्यांमध्ये असंतोष आहे. म्हणून वेळेपूर्वी त्यांची परीक्षा फी व शिक्षण फी शासनाकडून पूर्णपणे भरली जाईल काय, नॉन क्रिमिलेअरची 4.5 लाख रुपयांची मर्यादा 6 लाख पर्यंत केली जाणार आहे. त्याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट आहे. पण ओबीसीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा व शिक्षण फी ठराविक कालावधीच्या आत शासन देणार आहे का ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, स्व.विलासराव देशमुख यांच्या काळामध्ये दोन महत्वाचे निर्णय झाले होते. सन 2006-07 मध्ये ओबीसीच्या विद्यार्थ्यांसाठी रिएम्बर्समेण्टची योजना सुरु झाली आहे. पूर्वी विद्यार्थी कॉलेजमध्ये फीचे पैसे भरत होते. ते पैसे शासनाकडून विद्यार्थ्यांना परत मिळत होते. राज्यात वैद्यकीय कॉलेजसाठी 6-6 लाख रुपये द्यावे लागतात. ओबीसीचे विद्यार्थी 50 टक्के फी भरतात व शासन त्या विद्यार्थ्याला 50 टक्के पैसे देते. परंतु हे पैसे उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे शासनाने बदल केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये पैसे भरावे लागत नाहीत. आता शासनाकडून त्या विद्यार्थ्यांचे कॉलेजला पैसे दिले जात आहेत. पैशाचा शॉर्टेज होता म्हणून विलंब होत होता. तेवढ्या काळात कॉलेजने बेअर करावे. मागील वेळी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केलेली आहे. तो पैसा रिलीज झाल्यानंतर दिला जाईल. त्या कॉलेजच्या क्लार्कविरुध्द ताबडतोब कारवाई केली जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, क्रिमिलेअरसाठी 4.5 लाख रुपयांवरुन 6 लाख रुपयांपर्यंत मर्यादा वाढविलेली आहे. हा निर्णय केंद्र सरकारने घेतलेला आहे. ही योजना बाकीच्या राज्यात नाही असे मंत्री महोदय सांगत आहेत. महाराष्ट्र राज्य हे कल्याणकारी राज्य आहे असे नेहमी सांगितले जाते. ओबीसीमध्ये भेदभाव करु नये. सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे व निरंजन डावखरे यांनी मांडलेले मत योग्य आहे. त्यामुळे 4.5 लाखांची मर्यादा 6 लाख रुपये करण्याचा निर्णय आजच्या आज घेण्यात येईल का ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.शिवाजीराव मोघे : सन्माननीय सदस्यांच्या भावना मी समजू शकतो. केंद्र सरकारच्या निर्णयाप्रमाणे आरक्षण असो की प्रशासन असो त्यासाठी 6 लाख रुपयांची मर्यादा आहे. राज्यावर आर्थिक बोजा पडत असल्यामुळे मंत्रिमंडळाचा निर्णय होणे आवश्यक आहे. हा विषय एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर गेल्यावर तेथे याबाबत निर्णय होईल.

श्री.विनायक राऊत : केंद्र शासनाने घेतलेला निर्णय राज्य सरकारवर बंधनकारक असतो. त्यामुळे राज्य सरकारला 6 लाख रुपयांची मर्यादा करण्यासाठी एक महिना थांबण्याची आवश्यता नाही. भारत सरकारची 100 टक्के मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची योजना राज्य सरकारने स्वीकारलेली आहे. दुर्दैवाने 2001 पासून केंद्र शासनाकडून राज्य सरकारला पैसा मिळालेला नाही. तरीही राज्य सरकारचे हे कर्तव्य आहे. केंद्राकडून पैसा येईल तेव्हा येईल. राज्य सरकारने 100 टक्के योजना मान्य केली असल्याने ओबीसीच्या विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती वेळेवर मिळणे आवश्यक होते. शासनाने 664 कोटी रुपये दिले आहेत. उर्वरित पैसे देण्यासाठी या अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केलेली आहे. परंतु भविष्यामध्ये या विद्यार्थ्यांची अवहेलना न करता केंद्र सरकारच्या स्वीकारलेल्या योजनेची शासन स्वत:च्या निधीतून तंतोतंत अंमलबजावणी करणार आहे काय ?

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे : शैक्षणिक सुविधांसाठी केन्द्र शासनाच्या योजनेप्रमाणे 1 लाख रुपयाची मर्यादा आहे. महाराष्ट्र शासनाने ही मर्यादा 4.5 लाख रुपये केलेली आहे. ही मर्यादा 6 लाख रुपयापर्यंत करण्यासाठी मंत्रिमंडळापुढे जावे लागेल.

श्री. पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदयांनी सांगितले की, केन्द्र शासनाची 1 लाख रुपयाची मर्यादा आहे आणि राज्य सरकारची 4.5 लाख रुपयाची मर्यादा आहे. ही 4.5 लाख रुपयाची मर्यादा 6 लाख रुपये करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भातील निर्णय आपण थांबविलेला आहे. सन 2013-14मध्ये ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी 1230 कोटी रुपयाची आवश्यकता असताना शासनाने केवळ 634 कोटी रुपयाची तरतूद केली. उर्वरित रकमेची तरतूद शासन तातडीने करील काय ? नॉन क्लिमिलेअरची उत्पन्नाची मर्यादा वाढत असताना विद्यार्थ्यांची वाढणारी संख्या शासनाने लक्षात घेतलेली नाही. वाढणा-या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिष्यवत्तीसाठी तरतूद करणे गरजेचे होते. परंतु तशी तरतूद झालेली नाही. आता 4.5 लाख रुपयाची मर्यादा 6 लाख रुपये करण्याचे विचारधीन असल्यामुळे ही मर्यादा 6 लाख रुपये झाली तर जितकी विद्यार्थी संख्या वाढेल तितक्या प्रमाणात शिष्यवृत्ती देण्याची तरतूद बजेटमध्ये करण्यात येईल काय ? सन 2013-14 या वर्षासाठी 1230 कोटी रुपयाची आवश्यकता असताना 634 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे.उर्वरित तरतूद पुरवणी मागण्यामध्ये करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. सन 2013-14 या वर्षात ओबीसी विद्यार्थ्यांची किती फी देणे बाकी आहे आणि ती केव्हा देण्यात येणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : विद्यार्थ्यांची संख्या वाढणार आहे. त्या दृष्टीने बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : माझ्या प्रश्नाला नीट उत्तर मिळालेले नाही.

श्री. शिवाजीराव मोघे : वाढीव विद्यार्थी संख्या विचारात घेऊन बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल असे उत्तर मी दिलेले आहे.

श्री. विनोद तावडे : मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. आर्थिक तरतूद नाही, आम्ही कर्जात आहोत, आम्ही बुडालो आहेत, आम्ही डुबलो आहोत म्हणून ओबीसी विद्यार्थ्यांसाठी काही देऊ शकत नाही हे मंत्री महोदय मान्य करीत आहेत. राज्य बुडविलेले आहे असे

. ..2..

श्री. विनोद तावडे...

मंत्री महोदय सांगत आहेत आणि म्हणून ते विद्यार्थ्यांसाठी सोयीसुविधा देऊ शकत नाहीत हेच मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : युतीच्या काळात ते देऊ शकले नाहीत, त्यांच्या काळात ही योजना सुरु झाली नाही. ही योजना विलासराव देशमुख यांच्या काळात सुरु झाली हेही मी सांगू इच्छितो.

श्री. कपिल पाटील : माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर विसंगत आहे असे नाही तर ओबीसींची क्रूर चेष्टा करणारे आहे. तुम्ही दिले नाही म्हणून आम्ही देत नाही असे उत्तर होऊ शकत नाही. केन्द्र सरकारने 6 लाख रुपये मर्यादा केलेली आहे. राज्य शासन ही मर्यादा 6 लाख रुपये करणार आहे की नाही, नसेल तर ती का करणार नाही ?

श्री. शिवाजीराव मोघे : मी सर्व प्रश्नांची नीट उत्तरे दिलेली आहेत. 6 लाख रु. मर्यादा करण्यासंबंधी आम्ही 1 महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर जाणार आहोत.

----

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : औषध विक्रेत्यांनी संपावर जाण्याचा घेतलेला निर्णय

**मु. शी.** : औषध विक्रेत्यांनी संपावर जाण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, भाई जगताप, प्रा.सुरेश नवले, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री जयप्रकाश छाजेड, सुभाष चव्हाण, एम.एम.शेख, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व औषधी प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील औषधविक्रेत्यांवर अन्न आणि औषध प्रशासनाकडून (F.D.A.) होत असलेल्या कारवाईचा निषेध म्हणून औषध विक्रेत्यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१३ रोजी संपावर जाण्याचा निर्णय घेणे, अन्न आणि औषध प्रशासनाकडून औषधांच्या दुकानांवर सातत्याने करण्यात येत असलेली कारवाई, डॉक्टरांच्या प्रीस्क्रिप्शनशिवाय औषधे विकणाऱ्या तसेच फार्मासिस्ट नसलेल्या औषध दुकानांवर कारवाई केली जात असणे, मधुमेह, अस्थमा, उच्च रक्तदाबासारख्या कायमस्वरुपी आजारांच्या औषधांसाठी प्रत्येक वेळी नवीन प्रिस्क्रिप्शन आणणे रुग्णांना शक्य होत नसणे, एफडीएचे अधिकारी दुकान बंद करण्याच्या व विक्री परवाना रद्द करण्याच्या हेतूनेच येत असणे, या कारवाईविरोधात द रिटेल ॲण्ड डिस्पेसिंग केमिस्ट असोसिएशन आणि द फार्मास्युटिकल होलसेलर्स असोसिएशन यांनी एकत्रितरित्या एक दिवसाचा संप पुकारणे, या दुकानदारांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( अन्न व औषधी प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, अन्न व औषधी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून औषध विक्रेत्यांवर मागील दोन वर्षापासून अन्यायपूर्वक व आकसपूर्ण कारवाया करण्यात येत आहेत. या बाबतीत औषध विक्रेत्यांनी तीन वेळा आंदोलन पुकारले. सामाजिक आरोग्य व्यवस्था विस्कळीत होऊ नये म्हणून या संस्थांनी आपले आंदोलन मागे घेतले. या गोष्टीवर तोडगा काढण्यासाठी माननीय मंत्र्यासमवेत बैठक झाली. त्यात असे निश्चित झाले की, या बाबतीत काही तरी मार्ग काढला जाईल. परंतु आतापर्यंत या बाबतीत काहीही मार्ग निघाला नाही. परंतु औषध विक्रेत्यांवर औषधी द्रव्ये प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी आकसपूर्ण कारवाया सुरु केल्या आहेत. मला या ठिकाणी महत्वाचा मुद्दा निदर्शनास आणावयाचा आहे की, राज्यामध्ये 55 हजार औषध विक्रेत्यांची दुकाने आहेत. 16, 17 आणि 18 डिसेंबर, 2013 या दिवशी औषध विक्रेत्यांनी राज्यव्यापी बंदचा इशारा दिलेला आहे. सध्या शासनाची अशी भूमिका आहे की, रुग्ण मेला तरी चालेल पण कायदा वाचवा. आमची भूमिका सुध्दा अशी आहे की, कायद्याची अंमलबजावणी झालीच पाहिजे. पण यातील अतिरेकाचा जो भाग आहे तो वगळला पाहिजे.

मी या ठिकाणी स्पेसिफिक तीन उदाहरणे देऊ इच्छितो. कायद्याप्रमाणे शेडयूल मेडीसीन हे प्रिस्क्रिप्शनवर एम.बी.बी.एस. डॉक्टर किंवा त्याच्या वरचा डॉक्टर देऊ शकतो. माझा प्रश्न असा आहे की, ग्रामीण भागामध्ये किती एम.बी.बी.एस.डॉक्टर्स उपलब्ध आहेत ? ग्रामीण भागामध्ये एम.बी.बी.एस.डॉक्टर उपलब्ध नसताना जर प्रिस्क्रिप्शन नसेल तर गोरगरिबांना औषध कसे मिळेल आणि जर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि रुग्णवाहिकेमध्ये आपण बी.ए.एम.एस.,बी.एच.एम.एस. डॉक्टर्स प्रोव्हाईड करण्याची संमती देता तर त्यांच्या प्रिस्क्रिप्शनला संमती का देत नाही ? दुसरी प्रॅक्टीकल बाब अशी आहे की, पेशंट डॉक्टरांकडे जातो तेव्हा डॉक्टर पेशंटला 15 दिवसांचे औषध लिहून देतो. त्यानंतर तो डॉक्टर दूरध्वनीव्दारे पेशंटला सांगतो की, तुम्हाला दिलेले पूर्वीचे औषध 15 दिवस कंटीन्यू करा. परंतु त्या पेशंटकडे प्रिस्क्रिप्शन नसल्यामुळे औषध विक्रेते सांगतात की, तुमच्याकडे डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन नाही, त्यामुळे तुम्हाला औषधी देता येत नाहीत. त्या गरीब रुग्णास डॉक्टरांकडे परत जावे लागते, डॉक्टरांना त्यांची 500 ते 1000 रुपये फी द्यावी लागते. तो डॉक्टर कोठे बाहेर गेला असेल तर अशा वेळी त्या पेशंटने काय करावे हा प्रश्न उपस्थित होतो. ग्रामीण भागामध्ये एखादी ब्लिडींगची केस असेल, त्यास तत्काळ मेडीसीन हवी आहे. त्याच्याकडे डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन नाही, प्राथमिक आरोग्य केंद्र त्याच्या घरापासून दूर आहे. अशा

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:30

श्री.संजय दत्त....

पेशंटने काय करावे असाही प्रश्न उपस्थित होत असतो. जर त्या पेशंटला विना प्रिस्क्रिप्शन औषध दिले तर अन्न व औषधी द्रव्ये विभागाचे अधिकारी त्या औषध विक्रत्याचे लायसन्स रद्द करतात, अशा प्रकारे इम्प्रॅक्टीकल व्यवहार या राज्यात चाललेला आहे. माझा तिसरा प्रश्न असा आहे की, यामध्ये त्यांनी असे लिहिले आहे की, फार्मसिस्ट  राऊंड दि क्लॉक असला पाहिजे. हे प्रॅक्टीकल आहे काय ? ग्रामीण भागात औषध दुकानात तीन शिफ्टमध्ये फॉर्मिस्ट ठेवणे दुकानदारास परवडू शकेल काय ? समजा त्या औषध विक्रेत्यांनी तीन शिफ्टमध्ये फॉर्मिस्ट ठेवले, तेथील फॉर्मिस्ट जेवणासाठी बाहेर गेला वा अन्य कामासाठी थोडा वेळ बाहेर गेला व अशा वेळी ड्रग इन्स्पेक्टर आला तर संबंधित औषध विक्रेत्यावर कारवाई करण्यात येते. औषधी द्रव्ये विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अशा पध्दतीने का कारवाई करण्यात येते अशा प्रकारचे तीन स्पेसिफिक प्रश्न विचारलेले आहेत, त्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी देखील स्पेसिफिक उत्तर द्यावे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 12:35

श्री.संजय दत्त......

हायकोर्टामध्ये हे प्रकरण गेले. हायकोर्टाने सुध्दा निकालामध्ये सांगितले की, "For as long duration as may be reasonably possible." 24 तास फार्मासिस्ट ठेवणे फायनान्शियली व्हिजिबल नाही. Grievance redressal mechanism नसल्यामुळे अडचण येते. असे मेकॅनिझम स्थापित करण्यासाठी बैठक झालेली नाही. मंत्री महोदय या विषयावरील धोरण बदलणार का? आज त्यांच्यावर अन्यायपूर्वक कारवाई झालेली आहे ती मागे घेणार आहात का?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, हा औषध विक्रीचा धंदा आहे. कोण औषध किती घेतो हे महत्वाचे आहे. जो आजारी असतो त्यावेळीच तो औषध घेतो. औषध हे चॉकलेट नाही. आज या देशाचा विचार केला तर वर्षाला 70 हजार कोटी रुपयांची औषधे या देशात विकली जातात. त्याच्या 10 टक्के म्हणजे 6 ते 6.5 हजार कोटी रुपयांचा औषध विक्रीचा व्यवहार या राज्यामध्ये केला जातो. या देशामध्ये अनेक कायदे आहेत. त्यात अनेक व्यवसायांना संरक्षण दिले जाते. या देशात कोणताही असा व्यवसाय नसेल ज्या व्यवसायासाठी प्रॉफीट मार्जिन कमीत कमी 16 टक्के आहे. रिटेलर्सना प्रॉफीट मार्जिन कम्पलसरी मिळाले पाहिजे ही कायद्याने स्थापित केलेली तरतूद आहे.

सभापती महोदय, हा राज्याचा विषय आहे. राज्यातील 11 कोटी जनतेच्या आरोग्याशी निगडित असलेला विषय आहे. 16 टक्के प्रॉफीट मार्जिन रिटेलर्सना देण्याची भूमिका कायद्याने घेण्यात आली आहे. गेली अनेक वर्षे प्रथा आणि परंपरेनुसार काही गोष्टी चालत आलेल्या होत्या. कायद्यामध्ये काही तरतुदी होत्या, त्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत होती. परंतु कायद्यातील तरतुदीनुसार केलेल्या कारवाईमुळे कुठे परिणाम झाल्याचे आपल्याला गेली अनेक वर्षे दिसून येत नव्हते. मागील दोन वर्षात कारवायांचे स्वरुप वाढले हे मी मान्य करतो. ते अमान्य करण्याचा विषय नाही. कारवाई करताना उद्देश हा आहे की, ग्राहकाला योग्य पध्दतीची औषधे मिळाली पाहिजेत. जगातील अमेरिकेसारख्या प्रगत देशात 1 लाख लोक वेगवेगळ्या औषधांमुळे मृत्युला सामोरे जातात असा जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल आलेला आहे. या पार्श्वभूमीवर ग्राहकाला योग्य औषधे मिळाली पाहिजेत की नाही हा महत्वाचा मुद्दा आहे. व्यवस्थित औषधे मिळाली पाहिजेत ही प्रशासनाची भूमिका आहे. आजपर्यंत केमिस्ट करीत असलेल्या वेगवेगळ्या घटना समोर आलेल्या आहेत. Adverse drugs reaction च्या गोष्टी समोर आलेल्या आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील..........

सभापती महोदय, या कारवाईच्या माध्यमातून दुकानदारांना त्रास देणे हा प्रशासनाचा उद्देश नाही. किंबहुना नियमांचे पालन व्हावे ही आमची सार्थ भूमिका आहे. एखाद्या प्रवासी वाहनाला अपघात झाल्यानंतर त्यातील प्रवासी मृत पावल्यास त्या वाहनाला परमिट कोणी दिले, लायसन्स कोणी दिले याची चर्चा केली जाते. चुकीचे औषध दिल्यामुळे मृत्यू झालेल्या घटनेबाबतची आकडेवारी दुर्दैवाने आपल्यासमोर नाही, तसे मेकॅनिझम आपल्याकडे नाही. कारवाईबाबत सुसंगतपणा नसेल त्या ठिकाणी अधिकाऱ्यांवर आवश्यक ती कारवाई करु. त्रास देण्याच्या उद्देशाने कोणी कारवाई करीत असेल तर त्याला पाठीशी घालण्याची भूमिका असणार नाही.

नंतर टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील ....

परंतु, फार्मासिस्ट दुकानामध्ये असला पाहिजे. 24 तास दुकान उघडे ठेवण्याची परवानगी मागण्यात येते तेव्हा शिफ्टमध्ये फार्मासिस्ट असलाच पाहिजे. फार्मासिस्टच्या देखरेखीखाली औषण देण्यात यावे अशी तरतूद कायद्यामध्ये आहे. जेव्हा सामान्य माणूस दुकानाची परवानगी मागायला जातो तेव्हा त्याने फार्मासिस्टचे नाव दिल्या शिवाय, त्याची डिग्री दाखविल्या शिवाय त्याला औषध दुकानांसाठी परवानगी मिळत नाही. त्यामुळे फार्मासिस्ट न ठेवण्या मागचा उद्देश काय आहे हेच कळत नाही. कारवाईमुळे लोकांना त्रास होत आहे हे मी मान्य करतो. नियमांचे पालन करण्यासाठी कधी कधी कारवाई करावी लागते. आता थोडी सुसूत्रता आली आहे. अनेक लोकांनी आपली दुकाने बंद करण्याची भूमिका स्वीकारली आहे. कारण ते फार्मासिस्ट ठेवू शकत नाही. मी या माध्यमातून असोसिएशनच्या लोकांना करतो की, त्यांनी लोकांना वेठीस धरू नये. नियमामध्ये जे काही आहे त्या प्रमाणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक महत्त्वाचा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. याद्वारे शासनाला देखील सविस्तर माहिती देण्याची संधी मिळालेली आहे. 1945 च्या कायद्यानुसार या देशात आणि राज्यात औषधांची दुकाने सुरू झाली. या कायद्याची पाहिजे तशी अंमलबजावणी झाली नव्हती हे देखील खरे आहे. अधिकाऱ्यांकडून आता या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शासनाने सुरूवाती पासून काहीच केले नाही. शासनाने आता एकदम 55 हजार दुकानांवर एकाच वेळी धाडी घालण्याचे काम केले. तेथे फार्मासिस्ट आढळला नाही म्हणून त्या दुकानांवर कारवाई केली आहे. अशा दुकानांविरूद्ध कडक कारवाईची टोकाची भूमिका घेणे योग्य नाही. संदर्भातील सर्व उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी आपल्या प्रश्नात उपस्थित केला आहे. कधी कधी तर अचानकपणे दुकानातून औषध खरेदी करावे लागते. बऱ्याच वेळा डॉक्टरकडे जाणे अशक्य होते. रात्रीच्या वेळी डॉक्टरकडे जाणे शक्यच नसते. माझ्या माहिती प्रमाणे हा केंद्र सरकारचा कायदा आहे. आपण अधिकाऱ्यांच्या मार्फत ही कारवाई करताना किमान वास्तवतेचे भान ठेवणे आवश्यक आहे असे मला वाटते. मी अधिकारी आहे, मी कोणाचे ऐकणार नाही अशा आवेशात कोणी अंमलबजावणी करीत असेल तर ते योग्य नाही. अशा प्रकारे कोणताही अधिकारी काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

करीत असेल तर शासनाची, प्रशासनाची जबाबदारी आहे की, त्यांनी अधिकाऱ्यांची कामाची मर्यादा काय आहे हे लक्षात आणून दिले पाहिजे. आज तेथे वास्तविकता काय आहे याची सांगड घालण्याचे काम देखील केले पाहिजे. कायदा केल्या नंतर तो जबरदस्तीने अंमलात आणण्याचा प्रयत्न केला तर तो कायदा लोक जुमानत नाही. त्या कायद्याचे अस्तित्वच रहात नाही. आपण सर्व बाबी नजरे समोर ठेवल्या पाहिजेत. आज मोठ्या प्रमाणावर फार्मासिस्ट आहेत काय, ते नसताना औषध देण्यासाठी कशा प्रकारे पर्यायी व्यवस्था केली पाहिजे इत्यादी सर्व बाबी बारकाईने पाहणे आवश्यक आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली म्हणून तक्रारी येत आहेत असे नाही. कुठे तरी काही तरी चुकीचे घडते आहे म्हणून लोकप्रतिनिधी येथे प्रश्न उपस्थित करीत आहेत. तेव्हा शासनाने बारकाईने लक्ष देऊन यात जाचक गोष्टी कोणत्या आहेत हे पहावे व यात त्रास न होता कायदा कसा लागू करता येईल याचा देखील विचार करावा.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

त्यामुळे यासंदर्भात संबंधितांशी बैठक घेऊन योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे काय ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात थोडा गैरसमज होतो आहे. सामान्य जनतेला जी काही औषधे लागतात त्या औषधांचे शेडयूल वेगळे आहेत. ओव्हर दि काऊंटर ही जी औषधे आहेत त्यामध्ये क्रोसीन,अँटासीड तसेच अन्य काही औषधे आहेत ती देण्याची मुभा दुकानदाराना आहेच. परंतु ज्या औषधाचा परिणाम शरीरावर योग्य आणि अयोग्य पध्दतीने होऊ शकतो अशा औषधांचे शेडयूल "एच" घालण्यात आलेले आहे. नियमांचे पालन व्हावे एवढीच आमची अपेक्षा आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, फार्मासिस्टच्या संदर्भात नियमाच्या बाहेर जाऊन नियम करावे असे या सभागृहातील कोणताही सन्माननीय सदस्य म्हणणार नाही. परंतु आपल्याला कल्पना आहे की, आता सिग्नल जवळ हवालदार उभा राहत नाही तर तो झाडा जवळ जाऊन उभा राहत असतो. नियम कोण मोडतो हे हवालदार बघतो व फाईन मारत असतो. वाहतूक पोलिसाला दिवसाला कमीतकमी 25 चलन फाडावेच लागेल असा वरुन आदेश आलेला असतो त्यामुळे तो झाडाखाली जाऊन हे सर्व बघत असतो. त्यामुळे तुम्ही रोज 25 दुकाने सील करुन आणा असे टारगेट अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहे असे मला वाटते. हा नियम अंमलात आणावयाचा असेल तर व्यवहारी दृष्टिकोनातून शक्य आहे काय हे पाहिले पाहिजे. हे जर व्यवहारी असेल तर ते केले पाहिजे. आपल्याकडे खरोखर एवढे फार्मासिस्ट उपलब्ध आहेत काय याचाही पहिल्यांदा विचार करण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे किती फार्मासिस्ट उपलब्ध आहेत ? बी.फॉर्म किंवा डी. फॉर्म झाल्यानंतर त्यांना फार्मासिस्टचे प्रमाणपत्र दिले जाते. फार्मासिस्टचे प्रमाणपत्र दुकानदाराने दर तीन महिन्याने रिन्यू करायचे काय ? असे केले तर एकवेळ ठीक होईल नाही तर सरकारला मेडिकलची दुकाने उघडावी लागतील. आपण जनतेला औषधे उपलब्ध करुन देणार आहात काय ? आपण एका बाजूला रेड बूल्स कंपनीवाल्यांना सोडता, गुटखावाल्यांना सोडता व या लोकांसाठी नियम लावून धरता हाच लोकांचा खरा आक्षेप आहे. नियमाच्या बाहेर काहीही होता कामा नये असे माझे मत आहे. परंतु आपल्याला काही गोष्टी जर अचानक लागू करावयाच्या असतील तर त्या टप्पाटप्याने लावल्या पाहिजेत. माझे असे मत आहे की, यासंदर्भात माननीय मंत्री महोदय आणि मलाच जास्त त्रास होणार आहे. माननीय मंत्री महोदयांचे कार्यालय विधान भवनात असल्यामुळे

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

आता विधान भवनामध्ये आठवडी बाजारा प्रमाणे गर्दी होऊ लागली आहे. आपल्याला नियमांच्या बाहेर जाऊन गोष्टी करण्यास सांगणार नाही. आज मनात आले आणि त्याची अंमलबजावणी उद्यापासून केली तर ते योग्य होणार नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सकाळी उठलो आणि कारवाई केली असे आम्ही काही केले नाही. लोकांना एकत्रित करुन सेन्सेटायजेशन करुन मेडिकल दुकानामध्ये फार्मासिस्ट असला पाहिजे अशी भूमिका आपण मांडलेली आहे. पहिल्या वर्षभरात ज्या कारवाया करण्यात आल्या त्यामध्ये नो फार्मासिस्ट, नो शॉप असे धोरण आम्ही स्वीकारले होते व यामध्ये सर्वच दुकानदारांनी दुकानामध्ये फार्मासिस्ट ठेवण्याची भूमिका स्वीकारली. आज बाजारात एखादे औषध आले आणि ते औषध जर सबस्टँर्ड असेल, अनसेफ असेल आणि हे औषध आम्हाला विथड्रॉ करावयाचे असेल तर हे औषध अगोदरच मार्केटमध्ये पोहचले असल्यामुळे हे औषध कोणाकोणाकडे पोहचले याचे रेकॉर्ड उपलब्ध नसते. एखाद्या कंपनीने होलसेलरला औषध दिले, होलसेलरने ते औषध डीलरला दिले आणि डीलरने ते औषध रिटेलरला दिले आणि रिटेलरने ते औषध 20 लोकांना दिले असेल तर त्याचे रेकॉर्ड आम्हाला मिळत नाही. हे औषध अनसेफ असल्यामुळे ते बाजारातून रिकॉल करा असे सांगितले आणि दुकानदाराने हे औषध 20 लोकांना दिले असेल व दुकानदारांकडे त्या ग्राहकांची रिसीट नसेल तर आम्ही त्या 20 लोकांपर्यंत पोहचू शकत नाही.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेफ उर्फ बंटी डी.पाटील.....

तेव्हा यामध्ये निश्चितपणे सुसूत्रता आणली जाईल. कारवाईच्या माध्यमातून औषध दुकाने बंद करण्याची शासनाची अजिबात इच्छा नाही. राज्यामध्ये औषधांची 60 हजार दुकाने आहेत आणि एक लाख फार्मसीस्ट आहेत. तेव्हा राज्यात फार्मसीस्टची अजिबात कमतरता नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, फार्मसीस्टवर कारवाई झाली असे मंत्री महोदय कशावरुन सांगत आहेत ? स्त्री भ्रूणहत्या प्रकाशात आली आणि एमपीटीपीची औषधे शोधण्यासाठी राज्य शासनाला जाग आली. एफ.डी.ए.चे अधिकारी प्रत्येक दुकानावर जाऊन एमपीटीपीच्या गोळ्या दिल्या काय असे विचारु लागले. त्यावरुन ही सुरुवात झाली. त्यानंतर त्यांनी संप केला. हा संप बराच काळ चालला. या विषयावर मी सभागृहात चर्चा उपस्थित केली होती. त्यानंतर आपण शिथिलतेचे धोरण अवलंबिले. एमबीबीएस डॉक्टरचे प्रिस्क्रीप्शन स्वीकारायचे की बीएएमएसचे की बीएचएमएसचे प्रिस्क्रीप्शन स्वीकारायचे यावर देखील सभागृहात चर्चा झाली. माझा पहिला प्रश्न आहे की, ग्रामीण आणि शहरी भागाकरिता या नियमामध्ये शिथिलता आणणार काय ? कारण ग्रामीण भागात आणि शहरी भागात फार्मासीस्टच्या उपलब्धतेचे प्रमाण व्यस्त आहे. त्यामुळे दुकाने बंद होतील अशी आमची भीती आहे आणि लोकांना काऊन्टर प्रॅक्टीसवरुन औषधे दिली जातील. शहरात प्रॅक्टीस करणारे एमबीबीएस डॉक्टर्स आणि खेड्यात प्रॅक्टीस करणारे डॉक्टर्स यामध्ये व्यस्त प्रमाण आहे. त्यामुळे गावात बीएएमएस आणि बीएचएमएस डॉक्टर्स जास्त आहेत. तेव्हा त्याबाबतीत आपणास शिथिलता करावी लागेल. ही बाब आपण स्वीकारणार काय ? एफ.डी.आय.च्या अधिकाऱ्यांना प्रत्येक वर्षाला 10 ते 15 हजार रुपयांचा हप्ता आहे, ही बाब खरी आहे. ते वर्षाला हप्ता घेत असल्यामुळे दुकानावर कोणतीही कारवाई होत नाही. तेव्हा असे प्रकार शासन थांबविणार आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील :सभापती महोदय, रुग्ण शहरातील असो वा ग्रामीण भागातील असो तो आजारी असल्यामुळे औषधे घेण्यासाठी औषधांच्या दुकानात जातो. तेव्हा ग्रामीण भागामध्ये फार्मासीस्ट ठेऊ नका आणि शहरामध्ये फार्मासीस्ट ठेवा असा भेदभाव आपणास करता येणार नाही..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, ग्रामीण भागामध्ये फार्मासीस्ट दोन तास उपलब्ध नसेल तर शिथिलता द्यावी. फार्मासीस्ट नको असे माझे म्हणणे नाही. कारण मधुमेह, रक्तदाबाची औषधे लोकांना नेहमी लागत असतात. त्यासाठी प्रत्येक वेळी प्रिस्क्रीप्शन घेण्यासाठी 500 रुपये देणे शहरातील आणि ग्रामीण भागातील लोकांना परवडणारे नाही. तेव्हा त्यामध्ये शिथिलता आणावी असे माझे म्हणणे आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, आपण वेळेत शिथिलता आणली तर त्या काळात विक्री होणे शक्य होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी अधिकारी हप्ता घेतात असा मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत सांगू इच्छितो की, त्या संदर्भात ॲन्टी करप्शन विभागामार्फत कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील. एखादा ड्रग इन्स्पेक्टर असा प्रकार करीत असेल तर त्याच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. शासन अशा अधिकाऱ्यांना पाठीशी घालणार नाही.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, अधिकाऱ्यांनी दिवसाला दोन लायसेन्स सस्पेन्ड केली पाहिजेत असा आदेश आयुक्तांनी काढलेला आहे. प्रिस्क्रीप्शन शिवाय अंगदुखीवर वा डोकेदुखीवर गोळी घेतली तर त्याचा परवाना रद्द होतो. परवाना रद्द झाला तर नवीन परवाना काढण्यासाठी अधिकाऱ्यांना 25 ते 50 हजार रुपये द्यावे लागतात. महाराष्ट्रात औषधांची जवळपास 50 हजार दुकाने आहेत. प्रत्येक दुकानदाराकडून महिन्याला एक ते दोन हजार रुपये हप्ता घेतला जातो. अशा प्रकारे महिन्याला जवळपास 5 कोटी रुपये जमा होतात. यातील अर्धे पैसे वरच्या अधिकाऱ्यांना दिले जातात. माझा प्रश्न आहे की, आयुक्तापांसून ते औषध निरीक्षकापर्यंतच्या अधिकाऱ्यांची मागील दोन वर्षात किती संपत्ती झाली याची चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, अशाप्रकारे व्यवहार झाला असता तर मोठ्या प्रमाणावर कारवाया झाल्या नसत्या, फक्त 50-100 लोकांवर कारवाया झाल्या असत्या. तेव्हा सरसकटपणे अधिकाऱ्यांविरुद बोलणे योग्य होणार नाही. परंतु अशी एखादी घटना कुठे घडत असेल तर आपण ती निश्चितपणे आमच्या निदर्शनास आणून द्यावी. आम्ही अधिकाऱ्यावर कारवाई करुन थांबणार नाही तर तो अधिकारी नोकरीत राहणार नाही याची दक्षता शासन घेईल. सन्माननीय सदस्यांनी अधिकाऱ्यांची स्पेसिफीक नावे दिल्यास त्यांची ॲन्टी करप्शन विभागामार्फत चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.निरंजन डावखरे : महोदय, हा निर्णय अतिशय लोकहिताचा आहे. लोकहिताचा निर्णय राबवित असताना त्यातून थोडासा प्रॅक्टीकल ॲप्रोच असावा अशीच सर्व सन्माननीय सदस्यांची भावना आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, राज्यात नेमके किती फार्मासिस्ट आहेत, त्यापैकी महिला किती व पुरुष किती आहेत, यामध्ये महिला फार्मसिस्ट जास्त असतील तर त्या मेडीकल दुकानांमध्ये 24-24 तास काम करु शकतात काय ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, राज्यात काही मेडीकल दुकाने बंद पडली आहेत. या निमित्ताने मी विचारतो की, बंद पडलेल्या मेडीकल दुकानांची संख्या किती आहे ? मेडीकल दुकाने बंद करुन मल्टीनॅशनल कंपन्या स्वत:च्या ऑर्गनायझेशनच्या स्वरुपात येत असतील तर ते योग्य नाही. जी मेडीकल दुकाने बंद पडत आहेत त्यांना वाचविण्यासाठी शासनाकडून कोणते प्रयत्न केले जात आहेत ?

महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, एखाद्याने सिग्नल तोडल्यामुळे त्याच्यावर कारवाई करणे योग्य आहे. परंतु झाडाखाली लपलेला माणूस कारवाई करण्याचा प्रयत्न करीत असेल किंवा मुद्दाम आकसापोटी कारवाई करीत असेल तर त्या संदर्भात आपण काय कारवाई करणार ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : महोदय, आकसापोटी किंवा कोणाला त्रास देण्यासाठी कारवाई करणे हा प्रशासनाचा उद्देश नाही. आकसापोटी कारवाई करण्याची बाब निदर्शनास आली तर संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, केंद्र सरकारने 348 ड्रग्जच्या किंमती कमी केल्या आहेत. जर विभागाने मेडीकल दुकानांतील पावत्या बघितल्या नाही तर ती औषधे नव्या किंमतीने विकली जात आहेत की नाही, हे लक्षात येणार नाही. प्रशासनाकडून अशा प्रकारची कार्यवाही लोकांच्या हितासाठीच राबविली जात आहे. यामध्ये लोकांना थोडासा त्रास होणार आहे. मी सांगू इच्छितो की, यामध्ये सुसूत्रता आणण्याची भूमिका शासनाकडून निश्चितपणे घेतली जाईल.

श्री.भाई जगताप : महोदय, आपल्या आयुष्याशी निगडित असलेला अतिशय महत्त्वाचा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या ठिकाणी उपस्थित केल्याबद्दल मी सन्माननीय सदस्यांचे स्वागत करतो. या संदर्भातील कायदा हा सुस्पष्ट आहे. प्रीस्क्रीप्शन आणि नॉन-प्रीस्क्रीप्शन हा विषय नाही. कारण एखादी व्यक्ती क्रोसीनची गोळी घेण्यासाठी गेल्यानंतर मेडीकल दुकानदाराने त्याला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

प्रीस्क्रीप्शनमुळे गोळी देणे नाकारल्याचे उदाहरण नाही. कारण लहान मुलांना मेडीकल दुकानामध्ये पाठवून क्रोसीनची गोळी आणण्यास सांगितले जाते. मला वाटते यातून अनेक गंभीर प्रश्न तयार होतील. उद्या एखाद्याने नाकातून रक्त येत असल्यामुळे मेडीकल दुकानातून औषध घेऊ ये असे म्हटले तर ते मिळणार नाही. कारण अशा प्रसंगाच्या वेळी तसे होऊ शकत नाही. आपणास कोणाच्याही आयुष्याशी खेळता येणार नाही. हा कायदा 1945 पासूनचा आहे. या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना अधिकारी काही चुका करीत आहेत असे निदर्शनास आले आहे. शिवाय यामध्ये अतिरेक होत असल्याचेही निदर्शनास आले आहे. ग्रामीण भागात अशा प्रकारची यंत्रणा उभी करण्यासाठी मेडीकल दुकानदारांना काही तरी ठराविक कालावधी देण्यात येईल काय ? एखाद्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र असेल किंवा नसेल. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी औषधे उपलब्ध करुन द्यावी लागतील. मेडीकल दुकाने बंद होत असतील तर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये औषधे उपलब्ध करुन देण्यात येतील काय ? मी तर म्हणेन की, औषधे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनाला स्वीकारावीच लागेल. ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र नाही त्या ठिकाणच्या मेडीकल दुकानांना आवश्यक त्या बाबींची पूर्तता करण्यासाठी पुरेसा कालावधी देण्याचा निर्णय घेण्यात येईल काय ? अधिकाऱ्यांवर जे आरोप होत आहेत ते पूर्णत: चुकीचे नाहीत. म्हणून या बाबतीत गांभीर्याने चौकशी करुन, सभागृहासमोर चौकशी अहवाल मांडण्यात येईल काय ?

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 3 विषय मांडलेले आहेत. मी सांगू इच्छितो की, आम्ही कारवाईमध्ये 5 ड्रग इन्स्पेक्टर्स सस्पेंड केलेले आहेत. मी मघाशी नाही असे म्हटलेले नाही. अधिकारी आकसपणे वागत असतील तर त्यांच्यावर कारवाई करीत आहोत. ग्रामीण भागात देखील फार्मासिस्टच्या बाबतीत क्लस्टर करावा, फार्मासिस्ट उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचना दिलेल्या आहेत.

**उप सभापती** : मी सभागृहाची वेळ दहा मिनिटे वाढवित आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी अतिशय महत्त्वाचा व गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. औषध विक्रेत्यांच्या असोसिएशनने पुढील आठवड्यात आंदोलन करण्याचे ठरविले आहे. वेगवेगळ्या कारणांवरून वेगवेगळ्या पध्दतीने फार्मासिस्ट वरील कारवाई सुरू आहे. माझा प्रश्न असा आहे की, आतापर्यंत किती औषध दुकानदारांवर कारवाई करण्यात आली, किती फार्मासिस्टवर कारवाई करण्यात आली, किती दुकाने रद्द करण्यात आली आणि किती दुकानांना शासनाने स्टे दिला ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मागील वर्षापासून आतापर्यंत 21 हजार इन्स्पेक्शन केले. 1493 जणांना निलंबित केले आणि 2550 परवाने रद्द केले. कायद्यामध्ये तरतूद आहे की, संबंधिताने अपील करायचे. मग ती शिक्षा स्टे देऊन आपण कायम करतो. त्या नुसार 50 टक्के लोकांना स्टे देऊन, साडे पाचशे ते सहाशे लोकांना शिक्षा देण्यात आली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहात चुकीची चर्चा सुरू आहे. माननीय मंत्र्याचे म्हणणे बरोबर आहे. आपल्याला यासाठी कायद्यामध्ये बदल करावा लागेल. वकिलाची डिग्री नसताना देखील वकील म्हणून काम करण्यास सांगत असाल तर ते ठीक नाही. आपल्याला कायद्यामध्ये बदल करावा लागेल. आपल्याला असे सांगता येणार नाही. बऱ्याच मुलांनी पदवी संपादन केलेली आहे. ते बेकार आहेत. दुकानदारांना त्यांना नोकरी द्यायची नाही. त्यांना कमी खर्चात माणूस ठेवायचा आहे. त्यामुळे ते याकडे दुर्लक्ष करीत आहेत. मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो की, त्यांनी चांगला निर्णय घेतला आहे. पोलीस स्टेशनमध्ये पैसे खाल्ले जातात म्हणून तुम्ही पोलीस स्टेशनच बंद करा, असे सांगाल तर ते ठीक नाही. आपण सिस्टिम

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

बदलण्याची मागणी करावी. अशा पध्दतीने सभागृहात चर्चा होणे चुकीचे आहे, असे मला वाटते. सन्माननीय सदस्य सर्वश्री. संजय दत्त व अमरनाथ राजूरकर माहिती देत आहेत. अधिकारी पैसे खात असतील, त्रास देत असतील तर त्यांच्यावर कडक कारवई करण्याचे धोरण शासन राबवेल का आणि अशी चर्चा होण्याची वेळ येऊ नये असे वातावरण आपल्या खात्यामध्ये आपण निर्माण कराल का ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, होय.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शासनाचे अभिनंदन करण्याची वेळ सहसा सभागृहात येत नाही. मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो. एफडीआयच्या अधिकऱ्यांचेही अभिनंदन करतो. कारण त्यांनी पहिल्यांदा कायदा पाळण्यास भाग पाडले. श्री. शेषन यांनी निवडणूक सुधारणा करून मागितल्या, तेव्हा अशीच ओरड झाली. पण आज निदान निवडणुकीमध्ये सुधारणा झाली. एफडीएचे अधिकारी, माननीय मंत्री, सरकार यांचे अभिनंदन केले पाहिजे. मला असे विचारावयाचे आहे की, एक लाख फार्मासिस्ट असताना त्यातील किती फार्मासिस्टना नोकरी लागली आणि उर्वरित फर्मासिस्टना नोकरी लावण्याकरिता कालबध्द कार्यक्रम शासन राबविणार का आणि त्याची सक्ती करणार का ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, होय. फर्मासिस्ट ठेवणे सक्तीचे आहे. त्यामुळे त्यांना नोकरी मिळणारच आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. माझे दोन प्रश्न आहेत. माननीय मंत्री कार्यक्षम आहेत. त्यांनी कुशलतेने त्याचा उपयोग करून उपस्थित केलेल्या महत्त्वाच्या मुद्यांना बगल देऊन चर्चेला वेगळी दिशा दिली. फार्मासिस्ट ठेवू नका, असे कोणाचेही मत नाही. मी वेगळे मुद्दे उपस्थित केले होते. माझे दोन स्पेसिफिक मुद्दे आहेत. त्यांनी स्वत: कबूल केले आहे. ॲडव्हर्स ड्रग रिॲक्शन ॲन्टिबायोटिक रेझिस्टन्स यामुळे काही फेटल डेथ झालेले आहे का, याचे एव्हिडन्स आहे का, या संदर्भात त्यांनी उत्तरात दिले आहे. ते त्यांनी स्वत: कबूल केले नाही.

( नंतर श्री. खंदारे ....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

हायकोर्टाने असे सांगितले आहे की, There is no grievance redressal mechanism ते मेकॅनिझम स्थापन करावे. राज्यामध्ये एखादा प्रश्न निर्माण झाला असेल तर तो सभागृहाच्या माध्यमातून सरकारला जागे करुन निदर्शनास आणून दिला जातो. हे फार्मासिस्ट संपावर जात आहेत. तरीही शासन रिड्रेसल मेकॅनिझमचा उपयोग करीत नाही. शासन त्यांच्या संघटनेबरोबर चर्चा करुन तोडगा काढेल काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, फार्मासिस्टच्या असोसिएशनबरोबर शासनाच्या वेळोवेळी बैठका होत असतात. माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर एक बैठक झालेली आहे. दिनांक 17,18 व 19 रोजी फार्मासिस्टचा मोर्चा येणार आहे. या संदर्भात सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्या समितीमध्ये त्यांचे प्रतिनिधी घेतलेले आहेत. रिड्रेसल मेकॅनिझम तयार केलेले आहे. त्याबाबतही एक बैठक झालेली आहे. त्यांनी संपाची नोटीस दिल्याबरोबर आजही दुपारी एक बैठक आयोजित केली होती. आपल्यामार्फत मला त्यांना आवाहन करावयाचे आहे की, फार्मासिस्टनी ग्राहकांना वेठीला धरु नये, त्यांच्या प्रश्नासाठी चर्चा करण्यासाठी शासनाचे दार सदैव उघडे आहे, शासनाने त्यांना नकार दिलेला नाही.

--------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**पृ. शी.** : प्राथमिक शाळांच्या प्रवेशाच्या नियमांची अंमलबजावणी बहुसंख्य शाळांकडून होत नसणे

**मु. शी.** : प्राथमिक शाळांच्या प्रवेशाच्या नियमांची अंमलबजावणी बहुसंख्य शाळांकडून होत नसणे यासंबंधी डॉ.दीपक सावंत ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत ( मुंबइ विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

""माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2013 मध्ये होणारी विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया अनधिकृत ठरवून मार्च-एप्रिल, 2014 मध्ये प्रवेश प्रक्रिया राबविणे बंधनकारक करण्याचा शासनाने नुकताच घेतलेला निर्णय, मात्र, प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत शासनाच्या नियमांची अंमलबजावणी बहुसंख्य शाळांनी न करणे, यामुळे राज्यातील प्राथमिक शाळा व बालवाड्या सुरु होण्यापूर्वीच सहा महिने आधीपासून सुरू झालेल्या प्रवेश प्रक्रियेसाठी शाळांसमोर पालकांच्या रांगा लागणे, सदरहू निर्णयाची कडक अंमलबजावणी होण्याची आवश्यकता विचारात घेता प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन करण्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

प्रा.फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या आहेत. परंतु मी आपल्या परवानगीने निवेदनामध्ये दुरुस्ती करु इच्छिते.

या निवेदनाच्या चौथ्या ओळीमध्ये "शासनाने दिनांक 15 मार्च, 2013" याऐवजी "शासनाने दिनांक 24.5.2012" असे वाचावे. उर्वरित निवेदन मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

डॉ.दीपक सावंत : या निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, एप्रिल व मे या महिन्यात हे प्रवेश होत होते. परंतु आयसीएससी, सीबीएसई, आयबी, कॉन्व्हेण्ट शाळांचे प्रवेश ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होतात. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा राज्यात लागू झालेला आहे. या कायद्यानुसार विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर 25 टक्के जागा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राखून ठेवणे बंधनकारक आहे. परंतु तसे आरक्षण ठेवले जात नाही. या शाळा आमच्या शाळांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे, आमच्या शाळांमध्ये जागा नाहीत, असे थेट पत्र लिहून कळवित होत्या.

या निवेदनात असे नमूद केले आहे की, "माहे एप्रिल-मे मध्ये प्राथमिक शाळांमधील प्रवेश प्रक्रिया करण्याबाबत संचालक (प्राथमिक) यांच्या परिपत्रकावर काही आक्षेप आल्याने अंतिम निर्णय घेण्यासाठी आयुक्त (शिक्षण) यांना एक आठवड्यात अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे." हे आक्षेप नेमके काय आहेत ? हा कायदा 2009 मध्ये लागू झाला आहे, आता आपण 2013 मध्ये आहोत. गेल्या वर्षभरामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी 25 टक्के राखीव असलेल्या जागा आयसीएसई, सीबीएसई, आयबी व कॉन्व्हेण्टच्या शाळांनी नियमानुसार भरल्या आहेत काय ? आता शासन ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाईनद्वारे करणार आहे. त्यानुसार पुढील वर्षी 25 टक्के राखीव जागा संपूर्णपणे भरणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 मधील कलम 12 (1) (सी) अन्वये वंचित गट व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील बालकांना विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर 25 टक्के प्रवेश देणे बंधनकारक केलेले आहे. हे धोरण गेल्या 2 वर्षांपासून राबविले जात आहे. परंतु या प्रश्नामध्ये अनेक आव्हाने, समस्या आहेत त्यामुळे शासनाने असे ठरविले आहे की, हे प्रवेश 100 टक्के झाले पाहिजेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

प्रा. फौजिया खान...

म्हणून प्रायोगिक तत्वावर केन्द्रीय पध्दतीने फक्त मुंबई आणि पुणे या शहरामध्ये ही ऑन लाईन पध्दत राबविण्याचे आम्ही प्रस्तावित केलेले आहे. प्रस्ताव तयार झालेला असून तो शासनाकडे सादर केलेला आहे. त्याचे प्रझेण्टेशन पाहून शासन याबाबतीत निर्णय घेणार आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यामध्ये काही शाळांमध्ये प्रवेश सुरु होतात असे सांगितले. मी सांगू इच्छिते की, हा विषय फक्त शाळामधील 25 टक्के जागांच्या आरक्षणासंबंधीचा आहे. 75 टक्के जागावरील प्रवेश देण्याची त्या शाळांना मुभा आहे. कायद्यानुसार 25 टक्के जागा दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवणे शाळांना बंधनकारक असून त्याची अंमलबजावणी शासन करणार आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, बरोबर दोन वर्षापूर्वी नागपूरच्याच अधिवेशनामध्ये या प्रश्नासंबंधी चर्चा झाली होती आणि यासंदर्भात तातडीने बैठक घेण्यात येईल असे मंत्री महोदयांनी मान्य केले होते. परंतु ती बैठक अद्याप घेतलेली नाही. गेल्या दोन-तीन वर्षापासून शासन नवनवीन आदेश काढीत आहे. 25 टक्के आरक्षणाची प्रक्रिया राबविण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. परंतु अद्याप आरटीई अंतर्गत "ई" प्रक्रिया राबविण्यास शासनास यश मिळालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. आज आपल्याकडे एण्ट्री पॉईण्टला, म्हणजे शिशुवर्ग असेल तर शिशु वर्गात आणि पहिलीपासून शाळा असेल तर पहिलीच्या वर्गापासून ही 25 टक्क्याची मर्यादा आरटीई अंतर्गत लागू केलेली आहे. आपल्या राज्यामध्ये ज्या शाळांनी एण्ट्री पॉईण्टला 25 टक्के प्रवेश देणे बंधनकारक आहे अशी राज्यातील एकूण प्रवेश क्षमता किती आहे आणि त्या प्रवेश क्षमतेपैकी 25 टक्क्यानुसार किती प्रवेश क्षमता उपलब्ध होऊ शकते ? राज्यामध्ये गेल्या दोन-तीन वर्षामध्ये आरटीई अंतर्गत 25 टक्क्याप्रमाणे किती प्रवेश देण्यात आले ? 25 टक्के प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती शासनाने करावयाची आहे. तेव्हा मागील दोन-तीन वर्षामध्ये ज्या संस्थांनी, ज्या शाळांनी इमानेइतबारे आपले आदेश पाळून 25 टक्के प्रवेश दिले अशा विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती शासनाने केलेली आहे काय ? असल्यास, ती रक्कम किती आहे ? शासनाचे आदेश असूनही अनेक संस्था 25 टक्के आरक्षणाच्या आदेशाचे पालन करीत नाहीत, दुर्बल घटकातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना 25 टक्क्याप्रमाणे प्रवेश देत नाहीत अशा शाळांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : राज्यातील मायनॉरिटीच्या शाळा वगळून सर्व शाळांमध्ये 25 टक्के आरक्षण ठेवायचे आहे. अशा शाळांची संख्या 9505 आहे. मॉयनॉरिटीच्या शाळांना हा नियम लागू होत नाही. यामध्ये थोडा संभ्रम निर्माण होतो. संविधानातील तरतुदी नुसार हा संभ्रम दूर करुन नवीन नोटिफिकेशन काढण्यात आलेले आहे. पूर्वी 1,33,808 इतकी विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता होती. सन 2012-13मध्ये 67 हजार विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. सन 2013-14मध्ये 68833 विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, अनेक शाळांनी शासनादेशाची अंमलबजावणी केलेली नाही. अशा शाळा कायद्यानुसार कारवाईस पात्र आहेत. बजेटमध्ये 28 कोटीची तरतूद केलेली आहे. या प्रवेशामधील त्रुट्या लक्षात आल्यानंतर ही प्रक्रिया ऑनलाईन करण्याचे आम्ही ठरविले. अनेक शाळांनी त्यांच्याकडे फॉर्मच गेलेले नाहीत असे कळविलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

आणि त्यामुळे आम्हाला प्रतिसादच मिळाला नाही. हे जे लुपहोल्स आहेत, ते दूर करण्यासाठी हा निर्णय घेण्यात येत आहे. जनतेला यासंबंधी माहिती व्हावी म्हणून याचा प्रचार आणि प्रसारासाठी सुध्दा निर्णय घेणे आवश्यक आहे. या बाबतीत विभागाच्या माध्यमातून पाऊल उचलण्यात येत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कबूल केले की, यामध्ये मॉयनॉरिटी शाळा नाहीत. मॉयनॉरिटी शाळा नाही म्हणजेच यात श्रीमंत शाळा नाहीत हे आपल्याला वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. शासन गरिबांच्या मुलांना शिक्षणाचा हक्क देत आहे. शिक्षणाच्या अधिकारामध्ये गरिबांच्या मुलांना 25 टक्के राखीव जागाच्या संदर्भात हक्क देत आहात. चांगल्या शाळेमध्ये हे विद्यार्थी कसे जाणार? फक्त मराठी, हिंदी, गुजराथी माध्यमांच्या शाळा असतील आणि काही मराठी माध्यमांच्या इंग्रजी शाळा असतील अशाच शाळांमध्ये 25 टक्के राखीव जागेतून या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार हे खरे आहे काय आणि या बाबतीतील कार्यवाहीचे स्वरुप काय राहणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, अल्पसंख्यांक शाळांच्या बाबतीत घटनात्मक तरतूद आहे. दिनांक 12 एप्रिल, 2012 रोजी उच्च न्यायालयाने सुध्दा यासंदर्भात निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयाप्रमाणे कायद्यात सुधारणा देखील करण्यात आलेली आहे. अल्पसंख्यांक शाळांना हा निर्णय लागू नाही. त्याप्रमाणे राज्य शासनाच्या माध्यमातून नोटिफिकेशन काढण्यात आलेले आहे. यात फक्त मराठी आणि इतर शाळा आहेत अशी परिस्थिती नाही. यात मोठया व प्रसिध्द शाळा सुध्दा आहेत. 9505 शाळांचा मी उल्ल्ेख केलेला आहे. यात अनेक अशा शाळा आहेत की, अल्पसंख्यांक शाळा नाहीत. परंतु यात अनेक पाप्युलर शाळा आहेत. त्या शाळांमध्ये प्रवेश घेण्यासंदर्भात विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणात मागणी असते. याच्यात फक्त मराठी माध्यमांचा शाळा आहेत असे म्हणणे चुकीचे आहे असे मी स्पष्ट करु इच्छिते.

श्री.रामनाथ मोते : कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

प्रा.फौजिया खान : कार्यवाहीचे स्वरुप कायद्यामध्ये निश्चित करण्यात आलेले नाही. या संदर्भात आज कशी कार्यवाही करावी यासंबंधी कायद्यात काहीही डायरेक्शन देण्यात आलेल्या नाहीत. ही बाब धोरणात्मक असल्यामुळे त्यासंबंधी विचार करण्यात येईल.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.17 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी कमी केलेली तरतूद**

**(१) * ४५१८१ श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यांमध्ये सुमारे ७४ हजार मॅट्रीकोत्तर मागासवर्गीय शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र असून त्यांच्यासाठी सुमारे १५२ कोटी ६८ लाख इतकी तरतूद असताना राज्य शासनाने फक्त ५७ कोटी ८१ लाख एवढेच मंजूर केल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात असल्याचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये असा भेदभाव करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शिष्यवृत्तींची पूर्ण रक्कम मंजूर करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे :** (१), (२) व (३) सन २०१३-१४ मध्ये राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी रूपये ७६९.४४ कोटी, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी रूपये ६६४.२७ कोटी, विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी रूपये ३६१.९४ कोटी व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी रूपये १११.५६ कोटी एवढ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(४) राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत करण्यात आलेली तरतूद कमी पडत असल्याने पुरवणी मागणीद्वारे निधी प्राप्त करून घेण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा हा अत्यंत ज्वलंत प्रश्न आहे. अनुसूचित जाती, व्हीजेएनटी, ओबीसी, एस.टी.प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते, परंतु ती वेळेवर मिळत नाही. २०१० पासूनची शिष्यवृत्ती अद्याप मिळालेली नाही हे खरे आहे काय? महाविद्यालयांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा केली परंतु आजतागायत ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना वितरित झालेली नाही हे खरे आहे काय? शिष्यवृत्तीच्या कारणास्तव प्रवेश

..२...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण............ ता.प्र.क्र.४५१८१.....

नाकारणाऱ्या महाविद्यालयांच्या विरुध्द कोणती कारवाई करणार आहात आणि त्या महाविद्यालयांची यादी उपलब्ध आहे का? ओबीसी प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय, असल्यास त्याबाबत फेरविचार करणार आहात काय? शिष्यवृत्तीच्या रक्कमेसाठी बजेटमध्ये तरतूद का केली जात नाही, बजेटमध्ये तरतूद करणार आहात का?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती कमी करणार नाही. उत्पन्नाची मर्यादा 4.5 लाख रुपयांवरुन 6 लाख करण्याचा प्रयत्न आहे. 2010-2011 पासून याची प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. मागील वर्षाची रक्कम ऑनलाईन देता येत नाही. 2009-2010 वर्षाची रक्कम देणे शिल्लक राहिले असेल तर त्यासाठी मंत्र्यांची परवानगी घ्यावी लागेल, त्यानंतरच देता येईल. ऑनलाईन प्रक्रिया केल्यामुळे पूर्वीप्रमाणे मॅन्युअल रक्कम देणे बंद केले आहे. आज सकाळी लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मी सांगितले आहे की, ओबीसी प्रवर्गासाठी केंद्र शासनाची उत्पन्नाची मर्यादा 1 लाख असली तरी महाराष्ट्रामध्ये 4.5 लाख रुपयांवरुन 6 लाख करीत आहोत. त्यामुळे कॅबिनेटपुढे जावे लागते. निधी कमी पडतो ही गोष्ट खरी आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, ओबीसी प्रवर्गाची शिष्यवृत्ती बंद करणार नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले असले तरी अद्याप त्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही. उत्पन्नाची मर्यादा 4.5 लाख रुपयांवरुन 6 लाख रुपये केली असली तरी त्या संदर्भातील परिपत्रक न काढल्यामुळे त्यांना लाभ मिळणार नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत. उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबतचा शासन निर्णय अधिवेशन संपण्यापूर्वी निर्गमित करणार आहात काय?

श्री.शिवाजीराव मोघे : मी काल सांगितल्यामुळे आज वेगळे काही सांगणे बरोबर होणार नाही. एका महिन्याच्या आत मंत्रिमंडळापुढे उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याचा विषय येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 2013-2014 मध्ये अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची किती फी देणे प्रलंबित आहे आणि किती फी दिली गेली आहे?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, 2013-2014 मध्ये फी देणे राहिलेले नाही. विजाभज, ओबीसी, विशेष मागासप्रवर्गासाठी मिळून 806 कोटी देणे आहे.

नंतर 2सी.1.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ KTG/ भोगले.. 14:05

ता.प्र.क्र.45181.... श्री.शिवाजीराव मोघे...

पुरवणीमध्ये त्याची मागणी केली आहे. ओबीसींसाठी 566 कोटी रूपये आहेत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येते. बऱ्याच विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती शासनाने केलेली नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही हे माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. अनेक महाविद्यालयातील किंवा व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून वेळेवर शिष्यवृत्ती मिळालेली नसल्यामुळे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून फी वसूल केली आहे. एवढेच नव्हे तर काही विद्यार्थ्यांना प्रवेश देखील दिलेला नाही. तेव्हा ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून फी वसूल केली आहे अशा महाविद्यालयांवर आपण कोणती कारवाई करणार आहात?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, आदिवासी सोडून जवळ जवळ 12,49,344 विद्यार्थ्यांना सन 2012-2013 मधील शिष्यवृत्ती दिलेली आहे. शिष्यवृत्ती देता येऊ शकली नाही हे मी मान्य केलेले आहे. परंतु, कोणत्याही शाळेने किंवा महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून फी घेऊ नये त्याचा प्रवेश रोखून नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या कॉलेजने विद्यार्थ्यांकडून फी घेतली आहे अशा कॉलेजचे आपण नाव दिल्यास त्या कॉलेजवर कारवाई करण्यात येईल. मागच्या वर्षीचा पैसा आम्ही ताबडतोब जून-जुलै मध्ये रिलिज केला आहे. आता आम्ही डिसेंबर-जानेवारी महिन्यामध्ये एकाच वर्षातील सगळे पैसे देणार आहोत. त्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आजच सकाळी माननीय मंत्रिमहोदयांनी केंद्र शासनाकडून निधी येत नाही असे सांगितले. राष्ट्रीय नियोजन आयोगाला ओबीसी विद्यार्थ्यांची संख्या किती आहे हे कळविले नसल्यामुळे त्यांना नियोजन करता येत नाही ही वस्तुस्थिती खरी आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगला प्रश्न विचारलेला आहे. पण तशी परिस्थिती नाही. एक लाखा पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांची प्रतिपूर्ती करण्यात येते असे केंद्र शासनाचे म्हणणे आहे. पण सेंटपर्सेंट प्रतिपूर्ती करण्यात येईल असे देखील केंद्र सरकार म्हणत नाही.

...2

ता.प्र.क्र.45181.... श्री.शिवाजीराव मोघे...

माझ्याकडे अशी माहिती आहे की, मागच्या वर्षी केंद्र शासनाने देशातील सर्व राज्यांसाठी एकूण 350 कोटी रूपयांची तरतूद केली होती. केंद्र शासनाने सन 2011-12 मध्ये 61 कोटी 24 लाख रूपये दिलेले आहेत. सन 2012-13 मध्ये 90 कोटी 72 लाख रूपये दिलेले आहेत.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपण विद्यार्थ्यांच्या बाजूने विचार करीत आहात ते बरोबर आहे. गेली 2-3 वर्ष शैक्षणिक संस्थांना रि-एम्बर्समेंट मिळाली नसल्यामुळे संस्था खूप अडचणीत आल्या आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणावर पॉलिटेक्निक आणि इंजिनिअरिंग कॉलेजस सुरू झाल्यामुळे 50 टक्के सुद्धा सिटस् भरल्या जात नाहीत. त्यामुळे त्या संस्था खूप अडचणीत आहेत. आपण फी कधीही द्यावी. पण त्याच्या अगेन्स्ट त्यांना गव्हर्मेंट गॅरंटी देऊन बँकांमधून लोन मिळण्याची व्यवस्था करता येईल काय हे पहावे. कारण आज तेथील कर्मचाऱ्यांचे पगार देखील होत नाहीत. 2 ते 4 वर्षाचा फरक पडतो आहे. त्याचा बँकांना इंटरेस्ट द्यावा लागत आहे. तो आपण देणार आहात काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मी म्हटले होते की, ज्यांनी सन 2009-10 ची मागणी केली नसेल त्यांना शासनाच्या परवानगीने शिष्यवृत्ती देतो. आता 3 ते 4 वर्षाची शिष्यवृत्ती देणे अशक्य आहे. मागच्या वर्षीची शिल्लक राहिलेली शिष्यवृत्ती या वर्षी देणार आहोत व या वर्षाची शिष्यवृत्ती आम्ही या वर्षीच देणार आहोत. मुलांची शिष्यवृत्ती 3-4 वर्षे रहात नाही. संस्थाचालक गैरसमज पसरवत असतात हे आपण लक्षात घ्यावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, क्रीमिलेअरची मर्यादा सहा लाख रूपये करण्यात येणार आहे, असे माननीय मंत्री गेल्या सहा महिन्यांपासून सांगत आहेत. सदर मर्यादा केंद्र शासनाने वाढविल्यानंतर आपण तातडीने सदर मर्यादा न वाढविण्याचे कारण काय आहे ? आज त्या संबंधातील ताबडतोब घोषणा करण्यात येणार आहे काय व त्याची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात येणार आहे काय ? मागासवर्गीयांची मॅट्रीक्युलेटर शिष्यवृत्ती तर दूरच राहिली. पण मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्तीची प्रतिपूर्ती न केल्यामुळे अनेक संस्था, शाळा अडचणीत आलेल्या आहेत. तसेच, ओबीसींना 100 टक्के शिष्यवृत्ती देण्याची तरतूद हे शासन करणार आहे काय ?

यानंतर श्री.जुन्नरे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ KTG/ प्रथम श्री. भारवि.... 14:10

ता.प्र.क्र. :45181......

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, शिष्यवृत्तीच्या संदर्भातील मुख्य कारण हे आर्थिक बाबीच्या संदर्भातील आहे. आर्थिक कारण असल्यामुळे हा विषय कॅबिनेट समोर जात असतो. आदिवासी सोडून मागासवर्गीयांच्या संदर्भात सन 2013-2014 च्या अर्थसंकल्पात 1907.22 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हा केंद्र सरकारचा निधी आहे. आम्हाला "कॅबिनेट समोर जावे लागते" हे या प्रश्नाचे उत्तर होऊ शकत नाही.

**सभापती** : सर्व प्रक्रिया पूर्ण करुन तातडीने पैसे कसे मिळतील यासंदर्भात आम्ही व्यवस्था करीत आहोत असे उत्तर देणे आवश्यक होते.

श्री. शिवाजीराव मोघे : ठीक आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, आर्थिक बाबीमुळे जास्तीत जास्त एक वर्ष शिष्यवृत्ती देण्यास उशीर होतो. परंतु महाविद्यालयाकडून, संबंधित विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल केले जाते, विद्यार्थ्यांना परीक्षेस बसू देण्यास प्रतिबंध केला जातो. यासंदर्भात माझी आपल्याला विनंती आहे की, ज्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय आहे अशा विद्यार्थ्यांसाठी जरी शासनाकडून प्रतीपूर्तीची रक्कम आली नाही तरी सुध्दा त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येऊ नये किंवा विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करण्यात येऊ नये असा आदेश आपण तातडीने काढणार आहात काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी चांगली सूचना केली असल्यामुळे त्यासंदर्भातील परिपत्रक काढण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पावसाळी अधिवेशनात सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकात पाटील यांनी शिष्यवृत्तीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला असता माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, "प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्याबरोबर मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे पैसे त्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात येतील". आता माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, "तरतूद झाल्यानंतर पैसे देण्यात येतील". या प्रश्नाच्या संदर्भात गेल्या अधिवेशनामध्ये मी उप प्रश्न विचारला होता त्यावेळी "या वर्षापासून जून किंवा जुलै महिन्यामध्येच 100 टक्के पैसे विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात येतील" असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले होते. त्यामुळे यासंदर्भातील कार्यवाही राज्य शासन केव्हा करणार आहे ? ...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :45181......

श्री. शिवाजीराव मोघे : पैसे उपलब्ध असले तर ते देण्यात येतात परंतु आम्ही अनुसूचित जमातीचे 100 टक्के पैसे दिलेले आहेत. परंतु ओबीसींसाठी जसा फंड उपलब्ध होईल तसा तो देण्यात येईल. पैशांचे किती शॉर्टेज आहे याची माहिती मी अगोदरच दिलेली आहे. मागच्या वर्षीचे पैसे जून,जुलै महिन्यामध्ये दिले आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला स्पष्टपणे उत्तर दिले पाहिजे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागासवर्गीय मुलांना 3-3 वर्षे शिष्यवृत्ती मिळालेली नाही.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मागासवर्गीयांची शिष्यवृत्ती 3-4 वर्षापासून पेंडींग राहिलेली आहे अशी वस्तुस्थिती नाही. परंतु ज्यांनी सन 2009-2010 या वर्षा पासूनचा हिशोब दिला नाही त्यांना वित्त मंत्रालयाची परवानगी घ्यावी लागेल. ज्यांनी हिशोब दिलेला नाही अशांना ऑनलाईन सुविधा मिळणार नाही. ऑनलाईन प्रक्रिया आपण सन 2010-2011 पासून सुरु केलेली आहे. मागच्या वर्षी पर्यंत जे प्रलंबित होते त्यांना या वर्षी पहिल्यांदा दिले जाणार असून त्यानंतर रेग्युलर पैसे दिले जातील.

**सभापती** : हा प्रश्न निकाली निघण्यासाठी या प्रश्नाच्या संदर्भात माझ्या दालनात एक बैठक आयोजित केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशन संपण्याच्या अगोदर शिष्यवृत्तीच्या संदर्भातील बैठक आपल्या दालनात आयोजित करण्यात यावी अशी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे. या विषयाच्या संदर्भातील बैठक पुढील आठवडयात आयोजित करण्यात येईल.

यानंतर श्री.अजित.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45181...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी निधी प्राप्त झाला की तो देण्यात येईल असे उत्तर दिलेले आहे. आपण जी बैठक बोलाविणार आहात त्या बैठकीस माननीय वित्त मंत्री महोदयांना देखील बोलवावे अशी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वाडा तालुक्यात (जि.ठाणे) गौण खनिजाचे मोठ्या प्रमाणावर होत असलेले अवैध उत्खनन**

**(2) * 46280 श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.संजय दत्त , श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.मनीष जैन** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वाडा तालुक्यात (जि.ठाणे) खारीवली, वावेघर, कंचाड, शिरसाड, खैरे, चेंदवली, भुसावणे मुळगांव, विजयगड, जातिवली, लोहणा, गुंज या परिसरातील टेकडया सुरुंग लावून फोडण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, लोकवस्तीपासून 2 कि.मी अंतरावर सुरुंग स्फोटांना कायद्याने बंदी असताना उपरोक्त ठिकाणी स्फोट करण्यात येत असून ब्रास दगडांचे मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात येत असल्याचे प्रकार माहे सप्टेंबर, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनात आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या उत्खननाला आळा घालून त्याठिकाणी असलेल्या नैसगिक संपत्तीचे रक्षण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश धस, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : 1 व 2 ) या परिसरात रीतसर परवानगी दिलेले 7 खनिपट्टे आहेत. विस्फोटक परवाने घेऊन सदर खनिपट्टयांमधून सुरुंग लावून उत्खनन करण्यात येते. लोकवस्ती, नदी, नाले, रस्ते इत्यादी पासून 500 मीटर अंतराच्या आत सुरुंग लावून उत्खनन करता येत नाही. सदर खनिपट्टे लोकवस्तीपासून 1 कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर आहेत.

3 व 4 ) गौण खनिज उत्खननासाठी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन ) नियम 2013 तयार करण्यात आले आहे. सदर नियमात गौण खनिजाचे उत्खनन हे शास्त्रोक्त पध्दतीने करण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच गौण खनिजाचे उत्खनन करताना पर्यावरणाची काळजी घेतली जाईल या बाबतही तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने सुधारित लेखी उत्तर देत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46280....

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, वाडा तालुक्यामध्ये 11 खनिपट्टे आहेत. उत्तरामध्ये 7 खनिपट्टे असल्याचे नमूद केलेले आहे. खनिपट्टयांमुळे प्रदूषण होत आहे त्याच बरोबर तेथील ग्रामस्थांना आणि आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांना मोठ्या प्रमाणावर त्रास होत आहे. लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, हे खनिपट्टे लोकवस्तीपासून 1 कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर आहेत. परंतु माझ्या माहिती प्रमाणे हे खनिपट्टे 1 कि.मी.पेक्षा कमी अंतरावर आहेत. त्या ठिकाणी ठराविक रॉयल्टीपेक्षा जास्त उत्खनन केले जाते. त्या ठिकाणी पाच हजार ब्रास पेक्षा जास्त उत्खनन केले जाते. माझा प्रश्न आहे की, हे खनिपट्टे 1 कि.मी.च्या आत असतील तर ते बंद करणार काय, जेवढी रॉयल्टी देण्यात आली त्यापेक्षा जास्त उत्खनन होत असेल तर त्यांच्यावर काय कारवाई करणार, सदर जागेला मंत्री महोदय व जिल्हाधिकारी प्रत्यक्ष भेट देतील काय ?

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी 11 खनिपट्टयांचा उल्लेख केला प्रश्नामध्ये 12 खनिपट्टयांचा उल्लेख आहे. त्यापैकी बावेघर येथे खनिपट्टे अस्तित्वात नाहीत. उत्तरामध्ये जी सात संख्या सांगितलेली आहे त्याचे कारण म्हणजे एकूण 11 खनिपट्टयांपैकी 4 खनिपट्टे दोन वर्षापासून बंद आहेत तर दोन खनिपट्टे सहा महिन्यापासून बंद आहेत.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, एक कि.मी.च्या आत त्या खनिपट्टया आहेत. डोंगस्ते आणि विजयगड येथील खनिपट्टयांपैकी विजयगड येथील खाण ही 1.200 मीटर म्हणजे 1200 मीटर इतक्या अंतरावर आहे. महाराष्ट्र राज्य गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन ) नियम 2013 नुसार 500 मीटर पेक्षा जास्त ठिकाणी उत्खनन करु शकतो. तेव्हा 1 कि.मी.च्या आत खनिपट्टे आहेत असे म्हणता येणार नाही. उत्खननासाठी जी परवागनी दिलेली आहे त्यापेक्षा अधिक उत्खनन होत असेल आणि त्या ठिकाणी व्हर्टीकल उत्खनन केले असेल तर त्या संदर्भात चौकशी करुन योग्य कारवाई केली जाईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, उत्तरामध्ये 7 खनिपट्टयांतून उत्खनन होत आहे असे म्हटलेले आहे. परंतु वाडा तालुक्यामध्ये 7 पेक्षा अधिक अनधिकृत खनिपट्टया आहेत. या अनधिकृत खनिपट्टयांची माहिती घेऊन शासन त्यांच्यावर काय कारवाई करणार आहे ? उत्तरामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46280....

श्री.रामनाथ मोते.....

नमूद केले आहे की, 500 मीटर अंतराच्या आत सुरुंग लावून उत्खनन करता येत नाही. परंतु सुरुंगाच्या स्फोटामुळे तेथील रहिवाशांवर आणि घरांवर विपरित परिणाम झालेला आहे. तेथील अनेक घरांना अक्षरश: तडे गेले आहेत. तेव्हा याची माहिती घेऊन आपण काय कारवाई करणार आहात ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 14:20

ता.प्र.क्र.46280...

श्री.रामनाथ मोते....

तिसरा प्रश्न असा की, क्रशरमुळे त्या भागात वायू प्रदूषण होत आहे. त्यामुळे या बाबींना प्रतिबंध घालण्यासाठी शासन काय उपाययोजना आखणार आहे ?

श्री.सुरेश धस : महोदय, वाडा तालुक्यातील एकूण खाणींच्या संदर्भात हा प्रश्न विचारलेला नाही. हा प्रश्न केवळ 12 गावांच्या संदर्भातील आहेत. त्यामुळे मी केवळ 7 खाणींच्या बाबतीत उल्लेख केला आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल की, इतर ठिकाणी सुध्दा अशा प्रकारच्या तक्रारी आहेत तर त्या बाबत चौकशी केली जाईल.

महोदय, पर्यावरण विभागाची एन.ओ.सी. प्राप्त झाल्यानंतरच खाण खोदण्याची परवानगी दिली जाते. सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिल्यानुसार त्या ठिकाणी असे प्रकार घडत असतील तर निश्चितपणे जिल्हाधिकाऱ्यांना सोबत घेऊन सन्माननीय सदस्यांसोबत त्या भागाला भेट देण्याची माझी तयारी आहे. त्या भेटीमध्ये ज्या गावांतील लोक बाधित असतील त्यांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : महोदय, माननीय मंत्र्यांनी चांगल्या पध्दतीने उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रश्न 12 गावांपुरता मर्यादित असला तरी या विषयाची व्याप्ती मोठी आहे. 1 कि.मी. किंवा 500 मीटर अंतर निश्चित केले असेल हा भाग निराळा. परंतु आपण जे नियम ठरवितो त्याचा उद्देश असा असावयास पाहिजे की, तेथील गावांतील किंवा वाड्यातील नागरिकांना त्याचा त्रास होता कामा नये, त्यांच्या घरांचे नुकसान होता कामा नये, किंबहुना दगडापासून कुटुंबातील व्यक्तींना इजा होता कामा नये. परंतु आज त्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, सुरुंग स्फोटामुळे तेथील काही घरांना तडे गेले आहेत. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांना सोबत घेऊन सन्माननीय सदस्यांसह त्या भागांना भेट देण्यात येईल. मी स्पेसिफिक विचारतो की, आपण ही भेट कधी देणार आहात, तसेच हा प्रश्न लोकांच्या जीवनमरणाचा झाला असल्यामुळे त्यांना कधी न्याय देणार आहात ?

श्री.सुरेश धस : महोदय, अधिवेशन संपल्यानंतर एक महिन्याच्या आत त्या भागाला भेट देऊन त्या भागात ज्या तक्रारी असतील त्या संदर्भात निर्णय घेतला जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 14:20

ता.प्र.क्र.46280...

श्री.रणजित पाटील : महोदय, उत्खननाचे मोजमाप जिल्हा खनीकर्म विभागामार्फत टेपद्वारे केले जाते. आजच्या विज्ञानाच्या युगात शास्त्रोक्त पध्दती उपयुक्त असताना हे काम यंत्राद्वारे न करता टेपने करण्यात येत आहे. या पध्दतीमुळे भ्रष्टाचारास बराच वाव असतो. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, हे काम टेपऐवजी शास्त्रोक्त पध्दतीने करण्याबाबत शासन काही प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.सुरेश धस : महोदय, आतापर्यंत एकूण हेक्टर क्षेत्रावर उत्खननास परवानगी दिली जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या नवीन आदेशानुसार मोजणी बरोबरच फेरमोजणीच्या संदर्भात सुध्दा विचार करीत आहोत. त्यावेळी खाणींचा सुध्दा त्यामध्ये समावेश होईल. प्रचलित पध्दतीनुसार या बाबतचे अधिकार तहसीलदारांना दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात जी सूचना केली आहे तिचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. डंपीग लेव्हलच्या ऐवजी मोजमाप करणारे मशीन उपलब्ध झाले असेल तर त्याचा निश्चितपणे विचार करता येईल. येथून पुढे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल. आता जे पट्टे दिलेले आहेत त्या बाबत विचार करण्यात येईल. उलट नव्या शास्त्रोक्त पध्दतीचा अवलंब केल्यास त्यामध्ये ॲक्युरसी येईल व शासनाला त्याचा उपयोग होईल.

श्री.विनायक राऊत : महोदय, खनिज पट्टयात सुरुंग लावून उत्खनन करीत असताना, ज्या गावात खाणपट्टे असतात तेथील ग्रामसभेचा ठराव घेण्याची सक्ती केली जाते काय, अशा प्रकारच्या ठरावाची आवश्यकता आहे हे खरे आहे काय ? सध्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळाच्या ठिकाणी अतिशय जास्त शक्तीची स्फोटके वापरुन सुरुंग लावले जातात. त्यामुळे आजूबाजूच्या गावातील घरांना तडे गेले आहेत. अशा प्रकारची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे आलेली आहे. त्या तक्रारीची तातडीने दखल घेऊन त्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यात येईल काय ?

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46280 ....

श्री. सुरेश धस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ग्रामसभेच्या ठरावाच्या बाबत प्रश्न विचारला आहे. आपण ग्रामसभेची मान्यता घेतो. दुसरा प्रश्न इतर जिल्ह्यातील प्रश्न आहे, त्या संदर्भात वेगळे उत्तर दिले जाईल.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, डम्पी लेव्हलमुळे अक्युरसी मिळू शकते. डम्पी लेव्हल आले. आता टोटल स्टेशन मशिनच्या सहाय्याने अजून ॲक्युरसी मिळू शकेल. डम्पी लेव्हलने एवढी ॲक्युरसी मिळत नाही. सर्व्हे करण्याकरिता सर्व्हेचा नकाशा तयार करणे, किती खनिज काढले आहे हे मोजणे, यासाठी टोटल स्टेशन मशीन वापरले तर काही चूक होणार नाही. काही वेळा असे होते की, एकाला पट्टा मिळतो, तो दुसरा घेतो. पहिल्याने पैसे भरले नाहीत तर दुसऱ्यावर त्याचा भूर्दंड येतो. त्याकरिता ॲक्युरसी मोजून त्याच्याकडून वसुली केली तर जास्त फायदा होईल. माझा प्रश्न असा आहे की, आपण सर्व्हेकरिता टोटल स्टेशन मशीन वापरणार का ?

श्री. सुरेश धस : सभापती महोदय, मी होय म्हटले आहे. टोटल स्टेशन मशीन उपलब्ध झाले आहे. त्याचा ॲक्युरसीसाठी निश्चतपणे उपयोग करता येईल. आपण पुढील वर्षीपासून त्या मशिनचा उपयोग करून घेऊ.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मराठा समाजास आरक्षण देण्याबाबत स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(3) * 46602 श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक 44312 ला दिनांक 23 जुलै, 2013 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मराठा समाजातील लोकांना आरक्षण देण्याबाबत मा.उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(2) असल्यास, अद्याप अहवाल शासनास सादर केला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,
(3) असल्यास, हा अहवाल शासनास केव्हा सादर करण्यात येणार आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवाजीराव मोघे** : (1) नाही.
(2), (3) व (4) मराठा समाजास आरक्षण देण्याबाबत मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली आहे. या विभागाच्या दि. 6 जुलै, 2013 च्या शासन निर्णयान्वये समितीस 6 महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. समितीचा अहवाल अद्यापि अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार यथोचित निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये मला छोटीशी दुरूस्ती करावयाची आहे. प्रश्न क्रमांक 2, 3 व 4 ला दिलेल्या उत्तरात "6 जुलै" असे म्हटले आहे त्या ऐवजी "10 जुलै" असे वाचावे.

श्री. विनायक मेटे : महोदय, मला वाटले की, माननीय मंत्री मूलभूत स्वरूपाचा बदल सांगत आहेत. परंतु, त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी मोघमच बदल सांगितला आहे. सभापती महोदय, मी सुरूवातीलाच आपले मन:पूर्वक आभार मानतो की, आपण स्वत: पुढाकार घेऊन गेल्या वर्षी याच अधिवेशनात 20 डिसेंबरला या संदर्भात बैठक घेतली आणि समिती स्थापन करण्याचा आदेश दिला. आपण सांगितले की, समितीने 3 महिन्यांच्या आत अहवाल द्यावा. आपण आदेश देऊन सुध्दा समितीची स्थापन करण्यास 3 महिने लागले. दिनांक 21 मार्च, 2013 ला समिती स्थापन केली. 3-4 महिने समितीचा आदेश काढण्यास लागले. त्यानंतर 3 महिने होऊन गेले. नंतर 10 जुलैला परत आदेश काढला आणि 6 महिन्यांची मुदत दिली. जवळपास 1 वर्ष झाले तरी देखील समितीचे कामकाज पूर्ण होत नाही. समितीमध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याचा आदेशच निघत नाही. तेथे सर्व्हे करून डेटा एकत्र करणे आवश्यक आहे. परंतु, त्याचाही अंतर्भाव नाही. या सर्व धोरणात्मक गोष्टी आहेत. माननीय मुख्यमंत्रीच या संदर्भात उत्तर देऊ शकतात. माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे साहेब नेहमीप्रमाणेच मोघम उत्तर देत आहेत. त्यामुळे आम्हाला माननीय मंत्री

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 46602 ....**

श्री. विनायक मेटे ....

श्री. शिवाजीराव मोघे साहेबांचे उत्तर नको आहे. आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर हवे आहे. माननीय मुख्यमंत्री साहेब येईपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा आणि सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, हे मोघम उत्तर नाही. समिती स्थापन केली आहे. समितीच्या रेग्युलर बैठका सुरू आहेत. सर्व विभागाच्या बैठका संपलेल्या आहेत. एक्स्ट्रा बैठका सुरू आहेत. प्रयत्न करून वेळेच्या आत अहवाल देण्याच्या बाबतीत प्रयत्न होत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे साहेबांनी उत्तर दिले आहे. सभापती महोदय, आपल्या आदेशाने बैठक झाली, समिती गठित झाली, आदेश उशिरा निघाला. समितीने पहिली भेट ठरविली होती, त्यावेळी समितीची मुदत संपली होती. आदल्या दिवशी मुदत संपल्याचे लक्षात आले. लोक आपल्याला आव्हान करणार आहेत असे समजल्याने भेट रद्द केली. मराठा समाजाला आरक्षण द्यायचे नसेल तर देऊ नका, पण थट्टा करू नका. हा थट्टा करण्याचा प्रकार आहे. तुमची मुदत संपली हे तुम्हाला माहीत नाही का ? भेट देण्यासाठी चालले. लोक तेथे तयारच होते. उत्तरात देखील गंभीरपणा दिसत नाही. शासनाची मनोभूमिका काय आहे, हे समजले पाहिजे.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...... ता.प्र.क्र.46602....

आम्ही सांगितलेले आहे की, कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजात जे आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेले आहेत त्यांना आरक्षण मिळाले पाहिजे. इतकी उघड भूमिका आहे. कोणत्याही समाजात भांडणे लावावयाची नाहीत. याबाबत हे शासन गंभीर असेल तर शासन कधी मराठा समाजासाठी आरक्षण घोषित करणार आहे त्याची मंत्री महोदयांनी तारीख सांगावी. आम्हाला मोघम उत्तर नको.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या संदर्भात त्या समितीचे काम चालू आहे. त्या समितीला मुदतवाढ दिलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, गेल्या वर्षी हिवाळी अधिवेशनासाठी आलो त्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर माझ्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये राणे समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने प्रयत्नांची पराकाष्ठा करुन हा प्रश्न लवकरात लवकर सोडवावा असे ठरविण्यात आले होते. आपण हा प्रश्न सुटण्यासाठी आपल्या परीने जरुर प्रयत्न करीत आहात. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावरुन या प्रश्नाची उकल लवकर होईल अशी सन्माननीय सदस्यांची भावना आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, हा प्रश्न सुटण्यासाठी आपण माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात बोलवावे. त्यांच्याकडून या प्रश्नाला न्याय मिळेल अशी सन्माननीय सदस्यांचीही भावना आहे. सभापती या नात्याने मी आपल्या सांगू इच्छितो की, आपण माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहाच्या भावना कळवाव्या. ते सभागृहात आले तर त्यांनी या प्रश्नाला उत्तर देणे अत्यंत योग्य होईल असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. प्रश्नोत्तराचा तास संपेपर्यंत मी हा प्रश्न तसाच ठेवत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना निरोप दिला जाईल. त्यांच्याकडून आज उत्तर घेतले जाईल. परंतु आज शक्य झाले नाही किंवा उद्या सुध्दा ते शक्य झाले नाही तर याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? आपल्या दालनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना व मराठा समाजातील लोकांना चर्चेसाठी बोलविले जाईल, आम्हाला तसे नको. याबाबत आम्हाला सभागृहाच्या पटलावर उत्तर पाहिजे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. आपण प्रश्नोत्तराचा तास संपेपर्यंत हा प्रश्न तसाच ठेवणार आहात. आरक्षणाचा हा प्रश्न गुंतागुंतीचा आहे याची सगळयांना

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.... ता.प्र.क्र.46602....

जाण आहे. परंतु या प्रश्नामध्ये अनेक महत्वाचेही प्रश्न दडलेले आहेत त्याची शासनाकडून उत्तरे मिळत नाहीत. मागासवर्गीय आयोगाच्या सदस्यांची मुदत संपलेली आहे. शासनाला हवे असलेल्या सदस्यांची नेमणूक करावी. कारण हा प्रश्न सुटण्याच्या दिशेने शासनाचे सकारात्मक पाऊल पडत असल्याचे दिसत नाही. हा प्रश्न सुटण्यासाठी ठराविक तारीखच सांगा असेही आम्ही म्हणत नाही. या मागासवर्गीय आयोगाच्या सदस्यांच्या मुदती संपलेल्या आहेत त्यांच्या नेमणुका तत्काळ केल्या जातील का ?

श्री.शिवाजीराव मोघे : सन्माननीय सदस्यांचा थोडासा गैरसमज होत आहे. हायकोर्टाचे माजी न्यायाधीश हे या आयोगाचे अध्यक्ष आहेत. त्यांची मुदत संपलेली नाही.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एका सदस्याचे नाव पुन्हा आलेले आहे.त्यांची पुनर्नियुक्ती केलेली आहे. त्यांची मुदत संपली असे कसे काय म्हणता येईल ?

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, हा प्रश्न ऑन लेग ठेवल्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो. या तारांकित प्रश्ना बरोबरच अन्य तारांकित प्रश्न देखील महत्वाचे आहेत हे मला माहीत आहे. परंतु हा प्रश्न जास्त महत्वाचा आहे. राज्यातील करोडो लोकांच्या जिव्हाळ्याचा हा प्रश्न आहे. म्हणून या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये येईपर्यंत आपण सभागृहाची बैठक तहकूब करावी अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी मागासवर्गीय आयोगाच्या सदस्यांची मुदत संपलेली आहे असे सांगितले. यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे उत्तर दिलेले आहे की, मुदत संपल्यानंतर देखील ज्यांची अनधिकृतपणे नियुक्ती झालेली आहे अशा सदस्यांना बदलण्यात येईल. त्यामुळे त्याबाबतीत मंत्री महोदयांना अधिक बोलता येणार नाही. सर्व प्रश्नांची उत्तरे केवळ माननीय मुख्यमंत्री महोदयच देऊ शकतात. त्यानी उत्तर दिले तरच आम्हाला न्याय मिळू शकेल. माननीय मुख्यमंत्री महोदय या सभागृहामध्ये येईपर्यंत सभागृहाची बैठक तहकूब करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : यामध्ये कायदेशीर बाजू भक्कम आहे. कोणाचीही मुदत संपलेली नाही. ज्यांची मुदत संपली होती त्यांना रिअपॉईण्ट केलेले आहे. हा प्रश्न लवकर निकालात काढावा अशा सूचना दिलेल्या आहेत... अहवाल आल्यानंतर मंत्रिमंडळामध्ये निर्णय घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : हा अतिशय महत्वाचा विषय आहे. तामिळनाडू सरकारने 25 हजार कर्मचा-यांची नियुक्ती करुन सर्व्हेक्षण करुन कॉण्टीफिकेशनची तयारी केली, त्यांनी सर्वकाही मांडले. या पध्दतीने राज्य सरकार काहीही पावले टाकत नाही. विधानसभेमध्ये नियम 293 अन्वये चर्चा सुरु आहे. त्यामुळे आपण माननीय मुख्यमंत्र्यांना निरोप दिला तर ते येऊ शकतील. ते या सभागृहामध्ये येईपर्यंत आपण सभागृहाची बैठक 5 मिनिटासाठी तहकूब करावी. या प्रश्नामध्ये बरेच मुद्दे उपस्थित झालेले आहे. तामिळनाडू सरकारने कॉण्टीफाय करायला कर्मचारी नियुक्त

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.... ता.प्र.क्र. 46602...

केले. दोन वर्षे सर्व्हे केला. याबाबतीत आपल्या सरकारची काय भूमिका आहे हे राज्याचे माननीय मुख्यमंत्रीच सांगू शकतील. म्हणून ते या सभागृहामध्ये येईपर्यंत सभागृहाची बैठक तहकूब करावी अशी मी आपणास विनंती करतो.

**सभापती** : या प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या माननीय मंत्री महोदयांनी माननीय मुख्यमंत्र्यांना जरुर कळवाव्यात. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी तहकूब करीत आहे. 10 मिनिटामध्ये माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये येऊ शकले नाहीत तर माननीय मुख्यमंत्र्यांना जेव्हा वेळ असेल त्यावेळी आपणा सर्वांसहीत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करण्यात येईल. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.38 ते 2.48 पर्यंत स्थगित झाली.)

--

...नंतर श्री गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

( सभापतीस्थानी माननीय सभापती )

ता.प्र.क्र.46602....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मला थोडक्यात एक मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. कृपया आपण परवानगी द्यावी.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मघाशी प्रश्न विचारण्याच्या अभिनिवेषामध्ये सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांच्या आडनावावर कोटी करण्यात आली. "मोघे" शब्दप्रयोग असताना "मोघम" असा शब्दप्रयोग करण्यात आला. माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी जो शब्दप्रयोग केलेला आहे, तो त्यांनी मागे घ्यावा. (अडथळा )

**सभापती** : कामकाजात अशा प्रकारच्या शब्दप्रयोगाचा उल्लेख करण्यात आला असेल तर तो शब्दप्रयोग मी कामकाजातून काढून टाकतो.

श्री.विनोद तावडे : मराठा आरक्षणासंदर्भातील मुद्दा मागे सभागृहात उपस्थित झाला होता, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांच्या बरोबर भांडण उकरुन काढले. सभागृहात असा विषय उपस्थित झाल्यानंतर प्रत्येक वेळी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे वेगळा काही विषय उपस्थित करतात. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या महत्वाच्या विषयावर आपले लक्ष केंद्रित करावे.

**सभापती** : या प्रश्नास अतिशय गांभीर्य आहे, ते गांभीर्य आपण टिकविले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे सन्माननीय सदस्यांनी भावनेच्या आहारी जाऊन न कळत एखादा शब्द वापरला असेल. तो शब्द मी सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकतो.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मोघम हा शब्द असंसदीय आहे का?

**सभापती** : मोघम हा शब्द असंसदीय नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी लावालावी करण्याचा प्रयत्न केला आहे तो चुकीचा आहे. त्यांनी दिशाभूल करुन वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल सभागृहाची माफी मागितली पाहिजे.

**सभापती** : मी रेकॉर्ड तपासून घेतो आणि जे अयोग्य आहे असे आढळून येईल ते रेकॉर्डवरुन काढण्यात येईल. माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे हे माननीय मुख्यमंत्र्यांकडे निरोप धेऊन गेले होते. हा प्रश्न मी राखून ठेवीत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांची सोय पाहून येत्या दोन-तीन दिवसाच्या काळात हा प्रश्न पुन्हा चर्चेला घेण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपल्या निर्णयाबद्दल आमचा कोणताही आक्षेप नाही. परंतु अशा प्रकारची प्रथा पडू नये. कोणत्याही शब्दाला असंसदीय ठरविले जाऊ नये. कृपा करुन असा प्रघात पडू नये.

**सभापती** : ठीक आहे. आता मी पुढील प्रश्न पुकारतो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यात होत असलेले अवैध रेती उत्खनन**

**(४) * ४५९३४ श्री.मितेश भांगडिया , श्री.विनोद तावडे , डॉ.रणजित पाटील , श्री.प्रवीण पोटे-पाटील** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुका परिसरात अवैध रेती उत्खनन सुरु असल्याची घटना दिनांक २२ ऑगस्ट, २०१३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध उत्खननाबाबत पोलिसांनी गुन्हा नोंदविला व तहसीलदारांना तक्रार नोंदविण्यासंबंधी विनंती पत्र देखील दिले परंतु तहसीलदारांनी संबंधित प्रकरणी पोलिसांशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांनी अवैध रेती वाहून नेणाऱ्या वाहनांवर रात्री २.०० वा. त्या दरम्यान तपासणी केली असता वाहनांजवळ जो परवाना होता तो संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंतचाच होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी विनंती करुनही तक्रार दाखल न करणाऱ्या तहसीलदारांना जाब विचारुन कारवाई करण्यात आलेली आहे काय,

(५) नसल्यास, कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश धस, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता :** (१), (२) व (३) वाहनचालकाकडील वाहतूक पासावरील वेळ व पोलीस यंत्रणेने तपासणी केलेली वेळ यामध्ये आढळून आलेल्या वेळेच्या तफावतीमुळे पोलीस निरीक्षक, चिमूर यांनी जप्त केलेल्या वाहनावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत तहसीलदार, चिमूर यांना कळविलेले होते, तद्नुषंगाने तहसीलदार, चिमूर यांनी सदर प्रकरणी चौकशीसाठी नायब तहसीलदार यांची नियुक्ती केली होती. नायब तहसीलदार यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर बाब अवैधरित्या रेती उत्खननाची नसून, वाहतूक पास व पोलीस यंत्रणेने तपासलेल्या वेळेच्या तफावतीची असल्यामुळे, संबंधित वाहनावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, नायब तहसीलदार यांनी तहसीलदार यांच्याकडे अहवाल दिला की, हे अवैध वाहतुकीचे प्रकरण नाही. माझी मूळ उत्तराला हरकत आहे. रात्री २.०० वाजता ट्रक पकडल्यानंतर ड्रायव्हर आणि क्लिनरने जबाबात मान्य केले आहे की, रात्री पोकलेन मशिनच्या सहाय्याने ट्रकमध्ये रेती भरली गेली. त्यामुळे हे प्रकरण अवैध उत्खननाचे असल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल काय?

श्री.सुरेश धस : उत्तरात नमूद केलेली वस्तुस्थिती योग्य आहे. हे अवैध उत्खननाचे प्रकरण नाही. सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उत्खनन करता येते. रात्री २.०० वाजता ट्रक पकडला गेला हे खरे आहे. परंतु उत्खननाचे काम सायंकाळी ५.२० ते ५.४० वाजताच्या दरम्यान केलेले आहे. पोकलेन मशिनच्या सहाय्याने ट्रकमध्ये रेती भरण्यात आली

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४५९३४...... श्री.सुरेश धस.............

होती. माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर उप विभागीय अधिकाऱ्यांकडून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन अहवाल मागविता येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, उत्खननाकरिता सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत परवानगी दिली जाते. परंतु रात्री नदीच्या काठावर जाऊन उत्खनन करुन ट्रक भरण्याचा अधिकार नाही. तहसीलदारांनी परमिट तपासले असते तर योग्य ती वस्तुस्थिती समोर आली असती. एका परमिटच्या आधारे चार-चार वेळा वाहतूक केली जाते. संबंधित ट्रक रात्री २.०० वाजता पकडला आहे. त्या ट्रकच्या ड्रायव्हरने रात्री २.०० वाजता पोकलेन मशिनच्या सहाय्याने ट्रक भरल्याचे कबूल केले आहे. म्हणजे तेथे ठेकेदार उपस्थित होता. त्याने ट्रक भरुन दिलेला आहे. पोलिसांना या प्रकरणी कारवाई करता येत नाही म्हणून तहसीलदारांना अधिकार दिले आहेत. वेळेमध्ये फरक असल्यामुळे कारवाई करता येत नाही असे नमूद केले आहे. अवैध उत्खनन केलेले असल्यामुळे संबंधितांविरुध्द कारवाई करणे गरजेचे आहे. नायब तहसीलदारांनी चुकीचा अहवाल दिल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय?

नंतर २ एल.१...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45934...

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, ड्रायव्हर आणि क्लिनरच्या वेळेत तफावत आढळून आलेली आहे. येथे चार ट्रक पकडण्यात आले होते. या चार ट्रकवर रूपये 44800/- इतका दंड आकारलेला आहे. परमिट तपासले जात नाही अशी मागणी करण्यात आली आहे. यासंबंधी स्पष्टपणे आदेश देण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये अवैधरित्या रेती काढण्याचा धंदा सुरू झालेला आहे. हा धंदा महसूल खात्याच्या आशीर्वादाने सुरू आहे. सक्शन ड्रेझर वापरण्यास कायद्याने बंदी आहे. असे असताना या राज्यात राजरोसपणे रेतीचे बेकायदेशीरपणे उत्खनन होत आहे. तेव्हा यासंबंधी शासन कोणते धोरण स्वीकारणार आहे? रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यामध्ये एका तहसीलदारवर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. आज तेथेच जवळ जवळ 40 सक्शन ड्रेझर काम करीत आहेत. येथे पर ब्रास पाच हजार रूपये हप्ता घेण्यात येतो. हा हप्ता गोळा करण्यासाठी एजंट नेमण्यात आला आहे. याच्या बाजूलाच पोलीस ठाणे आहे. बेकायदेशीररित्या 1 कोटी 80 लाख रूपयांची रॉयल्टी गोळा करून तलाठ्यांपासून जिल्हाधिकाऱ्यापर्यंत वाटली जात आहे. हे थांबविण्याचे काम राज्य शासन करणार आहे काय ? जेथे सक्शन ड्रेझर आहेत ते जप्त करून ज्याने अवैध रेतीचे उत्पादन केले आहे त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, मूळ प्रश्न हा चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी रायगड जिल्ह्यातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. मागील वर्षी रूपये 47 कोटी 16 लाख इतक्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी रूपये 28 कोटी 26 लाख एवढी रक्कम वसूल केलेली आहे. एका परमिटवर वाहतूक करण्यासंबंधीचा प्रश्न विचारला आहे. आता आम्ही बारकोड सिस्टीम.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये प्रश्न विचारल्या नंतर एक राज्यव्यापी उप प्रश्न विचारण्यात येतो. या सभागृहात आम्ही 14 वर्ष काम केलेले आहे. आपण आजचे पेपर वाचावेत. तेव्हा आपणाला दिसेल की, प्रत्येक तहसीलदार, नायब तहसीलदार पैसे गोळा करण्याचे काम राजरोसपणे करीत आहेत. ठाणे जिल्ह्यात गाडीवर पिवळा दिवा लावून हप्ता गोळा करण्याचे काम सुरू आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45934...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, सदर प्रश्न हा चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यात होत असलेले अवैध रेती उत्खनन या संबंधातील आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने आपण संपूर्ण राज्यातील माहिती विचारत आहात. त्यासंबंधातील अचूक माहिती मंत्री महोदयांना देता येणार नाही. यासाठी आपल्याला वेगळा प्रश्न विचारावा लागेल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अचूक उत्तर दिले नाही तरी धोरणात्मक उत्तर त्यांना देता येऊ शकेल. मंत्री महोदय नवीन आहेत म्हणून त्यांनी मोघम बोलून चालणार नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 45934....

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अधिकारी गाडीवर लाल दिवे लावून हप्ता गोळा करतात, त्यांचे हे म्हणणे बरोबर नाही. वाळू धोरण झाल्यापासून आपण वाळूचे ई-टेंडरींग आणि ई-ऑक्शनची प्रक्रिया सुरु केली आहे. आजच्या घटकेला राज्यामध्ये पर्यावरण विभागाकडून वाळू उपशाला परवानगी मिळाल्याशिवाय वाळू उपसा केला जात नाही. मी राज्यमंत्री म्हणून जबाबदारीने सांगतो की, आम्ही मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुरुम, खडी आणि माती उपशासाठी पर्यावरण विभागाची मान्यता न घेता परवानगी दिली. परंतु वाळू उपशासाठी परवानगी दिलेली नाही. त्या संदर्भात अजून कमिटी व्हावयाची आहे. आम्ही तो प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविलेला आहे. सन्माननीय सदस्यांना त्यांच्या रायगड जिल्ह्यामध्ये काही गैरप्रकार निदर्शनास आले असतील तर त्यांनी मला वेगळे पत्र द्यावे. आम्ही त्याची चौकशी करु.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये दहा मिनिटांकरिता सभागृहाची बैठक तहकूब करण्यात आली होती. कृपया आपण ती वेळ आम्हाला वाढवून द्यावी अशी विनंती आहे.

**सभापती** : सभागृहात एका अत्यंत महत्वाचा विषय चर्चेसाठी होता आणि त्यासाठी आपण सभागृहाची बैठक स्थगित केली होती. त्यामध्ये सभागृहाचा वेळ वाया गेलेला नाही. त्यामुळे मी प्रश्नोत्तरासाठी वेळ वाढवून देणार नाही.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी आणि सातवी यादी सभागृहासमोर ठेवणे.

अतिरिक्त सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी पहिली, दुसरी, तिसरी, चौथी,पाचवी, सहावी आणि सातवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी,पाचवी, सहावी आणि सातवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापव्यात. )

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन 2011-2012 या वर्षाचे लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-------

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन 2011-2012 या वर्षाचे वार्षिक लेखे संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरीक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : लेखा परीक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन 2011-2012 या वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : लेखा परीक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचा दिनांक 1 एप्रिल, 2008 ते 31 मार्च 2009, 1 एप्रिल, 2009 ते 31 मार्च 2010 व 1 एप्रिल, 2010 ते 31 मार्च, 2011 या वर्षांचा अंकेक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** :अंकेक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-----------

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन 2011-2012 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

----------

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन 2011-2012 या वर्षांचा वार्षिक लेखे अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री.सुभाष चव्हाण (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा सत्तावीसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी** : नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माझ्याकडे आज दिनांक 12 डिसेंबर, 2013 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या आहेत त्या संदर्भात माझे निर्णय अतिरिक्त सचिव वाचून दाखवतील.

अतिरिक्त सचिव : मी माननीय सभापतींच्या निदेशानुसार नियम 93 अन्वयेच्या सूचनांचे निर्णय वाचून दाखवितो.

सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकात पाटील, विनोद तावडे व भगवान साळुंखे यांनी "आमदार-खासदार निधीतून शाळांना पुरविलेल्या संगणक खरेदीचा यंदाचा दर निश्चित न केल्याने कोट्यवधी रुपयांची संगणक खरेदी रखडली असल्याचे निदर्शनास येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "मौजे सगोडा, ता.शेगांव, जि.बुलढाणा या पूरग्रस्त गावाला मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी "मुंबई महापालिकेने शिवाजी पार्क आणि परिसरातील इमारतींचा समावेश हेरिटेज यादीमध्ये घोषित केल्यामुळे परिसरातील अनेक इमारतीतील रहिवाशांमध्ये पसरलेला असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "सोमवार, दिनांक 2 डिसेंबर, 2013 रोजी सातारा येथील सोनगाव कचरा डेपोमध्ये शालेय पोषण आहार योजनेतून आलेले सुमारे 400 क्विंटल धान्य सरकारी शिक्का असलेल्या गोण्यांमधून फेकून दिल्याचे आढळून येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..7..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अतिरिक्त सचिव......

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबई शहरातील सायन-धारावी येथील मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील प्रसुतिगृह, नवजात बालक दक्षता विभाग, क्ष-किरण तपासणी, रक्त तपासणी आणि ऑपरेशन थिएटर बंद असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "चंद्रपूर जिल्ह्यात विनफ्रा टेक या कंपनीने पैसे दुप्पट करुन देण्याचे आमिष दाखवून अनेक जणांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना दिनांक 11.12.2013 रोजीच्या सुमारास उघडकीस येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SJB/ D/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 15:05

अतिरिक्त सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी "जिल्ह्यातील आकोट रोडवर असलेल्या आकोट आणि बैतूल मार्गे जाणाऱ्या पुलाच्या मध्यभागी मोठ्या भेगा पडून पूल अत्यंत जीर्ण अवस्थेत असून कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.अपूर्व हिरे यांनी "शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये घड्याळी तासिकांवर रोजंदारीने काम करणाऱ्या शिक्षक व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, डॉ.रणजित पाटील, ॲड.आशिष शेलार, श्री.चंद्रकांत पाटील यांनी "अकोला ग्रामीण भागात सुरु असलेले 16 तासांचे भारनियमन कमी करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>

**पृ. शी./मु. शी.** : सरकारी प्रयोजनासाठी संपादित केलेल्या जमिनी हस्तांतरित न केल्यामुळे त्या मूळ मालकांच्याच नावे असणे, याबाबत श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"सरकारी प्रयोजनासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर जमिनी संपादित करण्यात येणे, त्या जमिनीच्या संपादनापोटी शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी जमीन मालकांना वाटप करणे, मागील वीस-पंचवीस वर्षांपूर्वी त्या जागी वसाहतींची स्थापना, कॅनॉल उभारणी व इतर विकास कामे करण्यात येणे, जमिनी संपादित झाल्यानंतर भू-संपादन विभागाकडून पाटबंधारे विभागाने त्या जागा हस्तांतरित करुन घेण्याची जबाबदारी असणे, प्रत्यक्षात पाटबंधारे विभागाने अशी कृती न केल्याने आजही त्या जागा मूळ मालकांच्याच नावे कायम असणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष लक्षात घेऊन मूळ मालकांनी त्या संपादित जमिनीची सर्रासपणे विक्री करणे, शासनाच्या जमिनीची फसवणुकीद्वारे इतरांना विक्री होत असतानाही त्या विरोधात महसूल, पाटबंधारे विभागाने कोणताही आक्षेप न घेणे, पोहेटाकळी, ता.पाथरी, सह परभणी जिल्ह्यातील बहुतांश पाटबंधारे प्रकल्पांसाठी संपादित जमिनी शासन नावे करुन नियमबाह्य विक्री थांबवावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : अंगणवाडी सेविका व मदतनीसांना पेन्शन योजना लागू करण्याची घोषणा करुनही त्याची अंमलबजावणी न करणे, याबाबत श्रीमती शोभा फडणवीस वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडते.

महोदय, राज्यात दोन लाख अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दोन वर्षांपूर्वी पेन्शन लागू करण्याची घोषणा करुनही अद्याप शासनाकडून अंगणवाडी सेविका व मदतनीसांना पेन्शन लागू न होणे, त्या बाबत राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस संघटनांनी वारंवार शासनाकडे मागणी व आंदोलन करणे, परंतु अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या मागण्या मान्य न होणे, त्यामुळे अंगणवाडी सेविका व मदतनीसांवर होत असलेला अन्याय, शासनाने त्याच्या मागण्या त्वरित मान्य करण्यासंबंधी करावयाची कार्यवाही."

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यात तंबाखू व गुटखा बंदी असताना विविध कंपन्यांच्या नावाने त्यांची विक्री होणे, याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

महोदय, तंबाखू, गुटखा आदिच्या सेवनामुळे कर्करुग्णाच्या संख्येत झपाट्याने वाढ होत असून राज्य शासनाने चार वर्षांपूर्वीच गुटखा विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला असला तरी तंबाखू, गुटख्याची विक्री विविध कंपन्यांच्या नावाने होत असणे, महाराष्ट्रात गुटखा बंदी करण्यात आली असताना परराज्यातून मेल एक्स्प्रेस गाड्यातून मोठ्या प्रमाणात पार्सल रुपाने गुटख्याची आवक होत असणे, मेल एक्स्प्रेसमध्ये गाड्यांच्या बोगीमध्ये पार्सल भरताना तपासणी केल्यानंतरच पार्सल पाठविणे आवश्यक असणे, ठाणे, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर येथून गुटखा जप्त करण्यात येणे, राज्य शासनाच्या गुटखा बंदीवर मात करण्यासाठी काही कंपन्यांनी तंबाखूमुक्त चॉकलेट बाजारात विक्रीस आणणे, हे चॉकलेट शाळा, महाविद्यालयाच्या परिसरात सर्वाधिक प्रमाणात विकले जात असणे, तंबाखू, गुटखा विक्रीस कायमस्वरुपी आळा घालण्यासाठी कारवाई करण्याची आवश्यकता व या बाबत शासनाची भूमिका."

---------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागा, कांदा, टोमॅटो, डाळिंब, भाजीपाला इत्यादी पिकांचे नुकसान झाले असून आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना नुकनसानभरपाई देणे याबाबत श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयवंराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

"दिनांक 1 ऑक्टोबर ते दिनांक 27 नोव्हेंबर, 2013 या काळात नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे निर्यातक्षम तसेच देशांतर्गत विक्री होणारे द्राक्ष बागा, नुकताच काढण्यात आलेला कांदा, टोमॅटो, डाळिंब, भाजीपाला इत्यादी पिकांचे मोठे नुकसान झाले, दिनांक 1 ऑक्टोबर ते दिनांक 27 नोव्हेंबर या काळात नाशिक जिल्ह्यात 1336 मिलीमीटर पावसाची नोंद झाली. नोव्हेंबरच्या शेवटच्या सप्ताहात तर बागलाण, मालेगाव, निफाड, इगतपुरी, सिन्नर, चांदवड, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी व पेठसह जिल्हाभरात सलग तीन-चार दिवस गारांसह बेमोसमी पावसाने थैमान घातले. वातावरणातील अचानक झालेला बदल मात्र शेतकऱ्यांच्या जीवावर उठल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंता निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने बाधित पिकांच्या पंचनाम्याबाबत एकत्रित अहवाल मागवून आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : दिनांक 28 नोव्हेंबर, 2013 रोजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांच्या 'मधुरम' या जनसंपर्क कार्यालयावर हल्ला केलेल्या हल्लेखोरांची चौकशी करून कारवाई करणे याबाबत डॉ. अपूर्व हिरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी, दिनांक 28 नोव्हेंबर, 2013 रोजी वा त्या सुमारास पवननगर, सिडको, नाशिक येथील शिक्षक आमदार, डॉ. अपूर्व प्रशांत हिरे यांच्या 'मधुरम' या जनसंपर्क कार्यालयावर दगडफेक करणे, कार्यालयात अनाधिकाराने घुसून अर्वाच्य शिवीगाळ करणे, प्रचंड तोडफोड नासधूस करणे, कार्यालयाच्या बाहेरील मोटार गाडीची मोडतोड करणे, त्यातील वस्तू व रोकड पळविणे, नुकसान करणे, पोलिसांनी राजकीय दबावाने प्रेरित होऊन खोटे गुन्हे दाखल करणे, तोडफोड करणाऱ्या राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी 'छगन भुजबळ यांचा विजय असो,' अशा घोषणा देत त्यांचा जय-जयकार करणे, पोलिसांनी उलटसुलट कारवाई करावी, म्हणून या प्रकरणी राजकीय हस्तक्षेप होणे, पोलिसांनी कायदेशीर अटक न करताच अनाधिकाराने प्रथम तक्रारकर्त्यास डांबून ठेवणे, गंभीर आजार असलेल्या वैद्यकीय सल्ल्यानुसार अत्यंत आवश्यक आहार घेणेस प्रतिबंध करणे, हल्लेखोरांची मात्र संपूर्ण बडदास्त ठेवणे, हल्ल्याचा तपास करणारे तपास अधिकारी दोन वेळेस बदलणे, सचोटीच्या व कठोर तपास अधिकाऱ्याकडून मुद्दाम हल्ल्याचा

..3



MSK/ D/ MMP/ पूर्वी श्री. बोर्डे 15:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अपूर्व हिरे ....

तपास काढून घेणे, राजकीय हस्तक्षेपामुळे केलेल्या वा करण्यात आलेल्या या कार्यवाहीबद्दल जनतेत प्रचंड संताप व्यक्त केला जाणे, या प्रकरणी पोलीस खात्याकडून राजकीय दबावाने गुन्हेगारांना पाठीशी घातले जाणे, पोलिसांबद्दल सार्वत्रिक अविश्वासाचे वातावरण निर्माण होणे, नाशिक येथील लोकप्रतिनिधीच्या जनसंपर्क कार्यालयावरील हल्ला, झालेली अन्यायकारक व पक्षपाती कारवाई, तसेच राजकीय हस्तक्षेप करणाऱ्यांची अत्यंत तातडीने राज्य गुप्तचर विभागामार्फत चौकशी करून हल्लखोर व संबंधित गुन्हेगारांविरुध्द तत्काळ कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

सभापती महोदय, दिनांक 28 नोव्हेंबरला माझ्या कार्यालयाची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तोडफोड केली. माझे कार्यालय संपूणपणे उद्ध्वस्त केले. सदर बाबतीतील तक्रार पोलिसांनी घेतली नाही. माझ्या कार्यालयाच्या समोर पोलीस चौकी आहे आणि तरी देखील पोलीस 30-35 मिनिटे आले नाहीत. माझा लहान भाऊ अद्वैत तेथे उपस्थित होता. तो पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेला, त्यावेळी त्याची तक्रार पोलिसांनी सुमारे एक तास घेतली नाही. विभागाचे डीसीपी श्री. स्वामी तेथे आले. त्यांनी उलट्यासुलट्या भाषेत बोलणे सुरू केले. मी स्वत: तेथे पोहचलो, त्यानंतर त्यांनी तक्रार नोंदवली. तक्रार घेतल्यानंतर त्यांनी मला सांगितले की, तुम्ही फेसबुकवर काही ना काही टाकले आहे. फेसबुकवर तुमच्या भावाने लिहिले आहे. त्यामुळे आम्ही क्रॉस कम्प्लेंट घेत आहोत. आम्ही त्यांना सांगितले की, फेसबुकवर आम्ही कोणतीही गोष्ट लिहिलेली नाही. ती गोष्ट खोटी आहे. परंतु, पोलिसांनी आमचे ऐकून घेतले नाही. माझ्या लहान भावाला जवळजवळ 24 तास पोलिसांनी अटक केली नाही, रिटेन करून ठेवले. दिनांक 28 ते दिनांक 29 असा एक अख्या दिवस त्याला रिटेन करण्यात आले, अटक करण्यात आली नाही. मी 29 तारखेला त्यांना विचारले की, आपण माझ्या भावाला अटक केली आहे की नाही, याचा मला खुलासा करावा. त्यावेळी मात्र त्यांनी त्यांना अटक दाखविली. मग त्याला कोर्टात हजर केले. फेसबुकच्या कमेंटबद्दल 7 दिवस पीसी देण्यात आली. अशा पध्दतीने हा खोटा गुन्हा नोंदविला. आपण फेसबुकवर एखादी कमेंट लिहिली तर त्याच्याकरिता दाखल होणारा गुन्हा 66 आणि 67 अंतर्गत नोंद केला जातो. परंतु, डीसीपी यांनी त्यामध्ये 66 ए व 67 ए ही दोन कलमे

..4

वाढविली. अश्लील चित्र किंवा अश्लील फित फेसबुकवर लावली तर जो गुन्हा दाखल होतो तो गुन्हा कमेंटबद्दल दाखल करू शकतो का, हा देखील प्रश्न आहे. आमची खूप मोठ्या प्रमाणात हरॅसमेंट करण्यात आली. माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली, त्या लोकांची धनश्री पाटील, महिला एपीआय आयओ म्हणून चौकशी करीत होत्या. राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शहर अध्यक्षांनी त्यांना दमदाटी केली, शिवीगाळ केली, त्याची तक्रारी त्यांनी पोलिसांत नोंदविली. त्यावेळी डीसीपी यांनी त्यांना बोलावून दमदाटी केली आणि त्यांच्याकडून आयओचे काम काढून घेतले. आयओ यांनी कार्यकर्त्यांना दम दिल्याबद्दल त्यांच्याकडून चौकशीचे काम काढून घेतले आणि त्या संदर्भात दुसरे आयओ नेमले.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भावना सन्माननीय सदस्य म्हणून मांडायच्या आहेत. विशेष उल्लेख वेगळ्या पध्दतीने मांडण्यात येतो. सन्माननीय सदस्यांची तीव्र भावना असेल तर ती सदनात मांडण्याची वेगळी पध्दत आहे. ठीक आहे. आपण आपली भावना मांडली आहे.

डॉ. अपूर्व हिरे : सभापती महोदय, आपल्याला विनंती आहे की, सदर प्रकरणाची चौकशी व्हावी आणि मला न्याय मिळावा. धन्यवाद !

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी येथे डिबेट करीत नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, सन्माननीय सदस्यांनी महत्त्वाचा विषय साध्या आयुधामार्फत मांडला आहे. आपण त्यांना वेगळी संधी द्यावी. माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना बोलावावे. एखाद्या सन्माननीय सदस्यांच्या कार्यालयाचे नुकसान होणार असेल आणि आम्ही ऐकत असू तर ते बरोबर नाही. आम्हाला ते ऐकवत नाही. सन्माननीय सदस्य नवीन असल्यामुळे त्यांना हे आयुध कशा पध्दतीने मांडायचे, हे माहीत नाही. माझी विनंती आहे की, सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे संरक्षण आपण केले पाहिजे.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सन्माननीय सदस्य चुकत असतील तर त्यांना शासन झाले पाहिजे. परंतु सन्माननीय सदस्य सभागृहात देत असलेली माहिती सत्य आहे असे आपण गृहीत धरतो. आपली तशी प्रथा आहे. त्यामुळे आपण हा प्रश्न वेगळ्या माध्यमातून मांडण्यासाठी त्यांना वेगळा वेळ द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अपूर्व हिरे यांनी सन्माननीय गृहमंत्र्यांसाठी निवेदन दिलेले आहे. ते निवेदन मी सन्माननीय गृह मंत्र्यांकडे पाठवित आहे. या संदर्भात योग्य ती कारवाई करण्याबाबत मी त्यांना विनंती करीन.

-----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी. मु. शी.** :आशियाई क्रॉसकंण्ट्री स्पर्धेत सुवर्ण व रौप्य पदक मिळविलेल्या राऊत भगिनींना प्रत्येकी 5 लाख व सदनिका देणे याबाबत श्री.विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राजकीय नेते व पत्रकारांना शासनाच्या कोट्यातील 2-2 सदनिका मिळाल्याची बातमी काल आम्ही विविध चॅनेल्सवर पाहिली आहे. परंतु सात वर्षांपूर्वी अम्मान (जॉर्डन) येथे आशियाई क्रॉसकंण्ट्री स्पर्धेत 20 वर्षाखालील मुलींच्या गटात कु.मोनिका व रोहिणी राऊत या भगिनींनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदक मिळविले आहे. राऊत भगिनींची कामगिरी बघून तत्कालीन मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांनी एका सोहळ्यात मुख्यमंत्री निधीतून मदत व सदनिका देण्याची घोषणा करुन नागपूरकरांच्या साक्षीने त्यांचा सत्कार केला होता. सत्कार झाल्यानंतर राऊत भगिनींनी सदनिका मिळण्यासाठी नियमानुसार शासनाकडे कागदपत्रांसहित अर्ज सादर केला आहे. सात वर्षांच्या काळात कै.विलासराव देशमुख यांच्यानंतर 3 मुख्यमंत्री बदलले आहेत. परंतु राऊत भगिनींना घर काही मिळालेले नाही. त्यांनी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, मंत्री, खासदार व आमदार या सर्वांकडे आपली कैफियत मांडलेली आहे. तरीही त्यांना ना सदनिका मिळाली ना फाईल पुढे सरकली आहे. या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला जात नाही. त्यामुळे राऊत भगिनी आजही नागपूरमधील शिरसपेठ येथील पडक्या घरात 20 वर्षांपासून राहत आहेत. राज्य शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार राऊत भगिनींना प्रत्येकी 5 लाख रुपये व सदनिका द्यावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

NTK/ D/ MMP/

श्री.विनोद तावडे......

सभापती महोदय, क्रीडापटूंबाबत शासनाची उदासीन भूमिका दिसून येते. मुंबईतील अधिवेशनामध्ये चर्चा केल्यानंतर 31 ऑगस्टच्या आत बैठक घेतो व दोन तुकडे करतो असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यानंतरही ती बैठक अद्याप झालेली नाही. खेळाडूंच्या बाबतीत काही करावयाचे नसेल तर घोषणा तरी कशासाठी केल्या जातात ?

भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या अभिनंदनाच्या प्रस्तावाच्या वेळी मी हा विषय मुद्दाम उपस्थित केला नाही. परंतु ते भारतरत्न आहेत. मुंबईतील अधिवेशनामध्ये माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी बजेट मांडत असताना सचिन तेंडुलकर गॅलरीची घोषणा केली होती. केवळ प्रसिध्दी मिळविण्यासाठी व हात धुवून घेण्यासाठी घोषणा करण्याचे बंद करावे. कृती केल्यानंतर घोषणा करावी. एका बाजूला राजकीय नेते व पत्रकार 2-2 सदनिका लाटत असल्यामुळे हायकोर्टाकडून ताशेरे मारले जातात व दुसऱ्या बाजूला जेन्यूईन प्रकरणात मात्र राऊत भगिनींना सदनिका व मदत मिळत नाही. हे दुर्दैव एकाच दिवशी लक्षात येते हे वाईट आहे.

-------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**पृ.शी.मु.शी.**:पोहरादेवी, ता.मानोरा येथील संत सेवालाल समाधीस राष्ट्रीय दर्जा देण्याची बंजारा समाजाची होत असलेली मागणी याबाबत श्री.जयंत प्र.पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"अखिल भारतीय बंजारा (लमाणी) शक्तीपीठ तीर्थक्षेत्र पोहरादेवी, ता.मानोरा, जि.वाशिम हे तीर्थक्षेत्र बंजारा समाजाचे आराध्य दैवत असून या ठिकाणी असलेल्या तीर्थक्षेत्र संत सेवालाल समाधीस राष्ट्रीय दर्जा देण्याबाबत समस्त बंजारा समाजाची सातत्याने मागणी असणे तसेच या ठिकाणी दरवर्षी मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येत असून पोहरादेवी हे ठिकाण रेल्वेने जोडणे आवश्यक असणे, तालुक्याचे ठिकाण मानोरा येथून हे तीर्थक्षेत्र जवळच असल्याने व या ठिकाणी येणाऱ्या भाविकांचा विचार करता जवळपास विमान सेवेची देखील सोय होणे आवश्यक असणे, सबब, राज्य शासनाने या तीर्थक्षेत्राचा विचार करुन केंद्र शासनाकडे रेल्वेची जोडणी, विमानतळ आदी संबंधी शिफारस करण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

--------

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: : पुणे जिल्हा परिवहन प्राधिकरणाने रुग्णवाहिकांसाठी दरपत्रक जाहीर करुन देखील मनमानी पध्दतीने सुरु असलेली भाडे आकारणी याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"पुणे जिल्हा परिवहन प्राधिकरणाने रुग्णवाहिकांसाठी दरपत्रक जाहीर केले असले तरी अद्यापही मनमानी पध्दतीने भाडे आकारणी सुरु आहे. सदरचे दरपत्रक आरटीओच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले नाही, तसेच रुग्णालयातही लावण्यात आले नसल्याने रुग्णांच्या व मृतांच्या नातेवाईकांकडून भरमसाठ भाडे आकारणी करण्यात येत आहे. नवीन दरपत्रकानुसार रुग्णवाहिकेसाठी एक तासाच्या प्रतीक्षा कालावधीचे 100 रुपये व 250 रुपये असे 350 रुपये भाडे घेण्यात येणे अपेक्षित असतानाही संबंधित मृतांच्या नातलगांकडून 900 रुपये भाडे वसूल करण्यात येणे, आधीच रुग्णांचे नातेवाईक आर्थिक संकटात असतांना अशा प्रकारे लूट करण्यात येत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेला संताप, तरी शासनाने तातडीने सदरचे दरपत्रक सर्व रुग्णालयात प्रसिध्द करुन मनमानी भाडे आकारीत असलेल्यावंर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. याकरिता शासनाने तातडीने आदेश द्यावेत अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे."

--

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:: रस्त्यावरील मुलांसाठी विविध योजना आखण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

"पोटाची भूक भागविण्यासाठी मुंबईच्या आकर्षणापोटी किंवा अशा अनेक कारणांनी रस्त्यालाच आपले घर मानणारी तब्बल 36,154 मुले रस्त्यावर आणि 905 मुले रेल्वेच्या डब्यांमध्ये आणि प्लॅटफॉर्मवर रहात असल्याचे टाटा इन्स्टियूट ऑफ सोशल सायन्स आणि ॲक्शन एड इंडियाने मुंबईतील 24 विभागातून जवळपास 100 संघटनांच्या मदतीने केलेल्या पाहणीत उघडकीस आले आहे. त्यापैकी जपळपास 25 टक्के मुले रस्त्यावर मोलमजुरी करुन अथवा काही तरी धंदा करुन आपली गुजराण करीत आहेत. तसेच रस्त्यावरच्या या मुलांपैकी जवळपास 15 टक्के मुले गंभीर व्यसनांच्या आहारी गेल्याचे करण्यात आलेल्या पहिल्या सेन्ससमध्ये आढळून आले आहे. मुंबईच्या रस्त्यावर नेमकी किती मुले राहतात याची आकडेवारी मिळाल्याने या मुलांना शिक्षणाचा अधिकार आणि त्यांना सुरक्षा मिळावी यासाठी शासनामार्फत करण्यात आलेल्या घोषणा पोकळ असल्याचे वरील पाहणीत स्पष्ट झाले आहे. रस्त्यावरच्या मुलांची संख्या 50 हजारापेक्षा अधिक असल्याचा अंदाज अनेक वेळा व्यक्त केला जात असे, त्यामुळे नेमकी संख्या नसल्याने त्यांच्यासाठी विविध योजना आखणे शासनास शक्य नव्हते. मात्र आता नेमकी संख्या कळल्याने या मुलांसाठी विविध योजना आखण्यासाठी लवकरात लवकर पावले उचलावीत अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे."

--

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:20

**पृ.शी./मु.शी.** : दुधात भेसळ करणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा होण्यासाठी कायद्यामध्ये करावयाची सुधारणा याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

"लक्षावधी निरपराध नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम करणाऱ्या आणि प्रसंगी जीवाशी खेळ करणाऱ्या भेसळयुक्त दुधाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेण्याचे आदेश दिले आहेत. भेसळयुक्त दूध आरोग्यासाठी घातक असून अशा दुधाचे उत्पादन अथवा व्यापार करणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यासाठी राज्य शासनाने कायद्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात अशा स्पष्ट सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. तेव्हा यासंबंधी राज्याच्या कायद्यामध्ये त्वरित बदल करण्यात यावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे."

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राष्ट्रपती पुरस्कार प्राप्तकर्त्यांस अधिक सवलती मिळण्याबाबत
ॲड. निरंजन डावखरे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष
उल्लेखाची सूचना.

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राष्ट्रपती पदकाच्या मानकरी ठरणा-या पारितोषिकाच्या निकषानुसार पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची निष्कलंक सेवा कर्तव्याप्रती निष्ठा व 100 पेक्षा अधिक बक्षिस मिळालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे राष्ट्रपती पदकासाठी पात्र ठरतात. राष्ट्रपती पदकासाठी पात्र ठरणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल (ACR) सातत्याने किमान 10 वर्षे अत्युकृष्ट (A+ outstanding) असावे लागतात. तरच त्यांची या पारितोषिकासाठी शिफारस होते. वास्तविक 10 वर्षाच्या कालावधीत 4 ते 5 वरिष्ठ अधिकारी या सगळयांनी अत्युत्कृष्ट (A+ outstanding) शेरा देणे याचा अर्थ तो अधिकारी यास निश्चित पात्र आहे असा होतो. सद्य:स्थितीत राष्ट्रपती पदक पुरस्कर्त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर केवळ रेल्वे प्रवास भाडे सवलत इतकाच लाभ मिळतो. परंतु ज्यांनी आपली सेवा निष्ठापूर्वक पार पाडली व राष्ट्रपती पदक प्राप्त केले त्यांना या सवलती व्यतिरिक्त अधिक सवलती मिळण्याची गरज असून त्यानुसार अशा पुरस्कार प्राप्तकर्त्यास राज्यात रस्ता पथकर (टोल टॅक्स) माफ करावा, 60 वर्षावरील अधिकारी व कर्मचारी यांना एका व्यक्तिसह राज्य परिवहन सेवेचा मोफत प्रवास, शासकीय विश्रामगृहाच्या दरात 50 टक्के सवलत, रेल्वे भाडे तिकीट पूर्णत: माफ , शासकीय कार्यालयातर्फे स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन व महाराष्ट्र दिन इत्यादी प्रसंगी आयोजित कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपती पदक प्राप्त पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना सन्मानाने आमंत्रित करावे. तसेच ज्या पोलीस मुख्यालयाच्या/आयुक्तालयाच्या हद्दीत सेवानिवृत्त राष्ट्रपती पदक प्राप्त अधिकारी व कर्मचारी राहात असतील त्यांना त्या पोलीस मुख्यालयाने/आयुक्तालयाने आयोजित केलेल्या प्रत्येक समारंभास

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



ॲड. निरंजन डावखरे....

सन्मानाने आमंत्रित करावे, इत्यादी लाभ व सोईसुविधा राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्तकर्त्यांस देण्यात याव्यात एवढीच मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे."

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.शिगम 15:25

ॲड.निरंजन डावखरे...

सभापती महोदय, आपण पोलिसांच्या प्रत्येक विषयाकडे काळजीपूर्वक पाहत असतो. माझी आपणास विनंती आहे की, पोलीस कर्मचारी आणि पोलिस अधिकारी यांच्या या विषयाच्या बाबतीत माननीय गृहमंत्र्यांना सूचना दिली तर निश्चितपणे त्यांना न्याय मिळू शकेल. धन्यवाद.

---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी** :वर्धा जिल्हयातील झुणका गावातील नागरिकांना प्राथमिक सुविधा न मिळणे याबाबत श्री.हेमंत टकले वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" वर्धा जिल्हयातील समुद्रपूर तालुक्यातील झुणका हया पुनर्वसित गावातील नागरिक गेली तीस वर्षे असंख्य यातना भोगत आहेत. 1980 साली पुनर्वसन झालेल्या गावात मंजूर केलेल्या प्राथमिक सुविधाही देण्यात आलेल्या नाहीत. हया परिसरात कोणतेही रस्ते तयार करण्यात आलेले नाहीत. पावसाळयात पोथरा धरणाच्या विसर्गामुळे ग्रामस्थांना महिन्यातले पंधरा दिवस घराबाहेर सुध्दा पडता येत नाही. दुसरीकडे उन्हाळयात पिण्याचे पाणीही मिळत नाही. हया पुनर्वसित गावाचे सर्व नागरी प्रश्न तातडीने दूर करावे हयासाठी सबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांनी करावयाची तातडीची उपाययोजना, अशी सूचना हया विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.शिगम 15:25

**पृ.शी./मु.शी**:रायपूर, ता.हिंगणा, जि.नागपूर येथील रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करणे बाबत श्री.प्रकाश बिनसाळे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

" मौजे रायपूर (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथे आधुनिक पायाभूत सुविधांनी सज्ज असे रुग्णालय बांधण्यात येणे, तसेच रुग्ण भरतीसाठी 50 खाटाची सोय करुन प्रत्येक विभागाच्या वेगवेगळया खोल्या, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने व आजूबाजूस मोकळा परिसर अशा प्राथमिक रुग्णालयाचे उद्‌घाटन 15 वर्षापूर्वी करुन सद्यस्थितीत सदर रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता असल्याने रुग्णांना पुरेशा प्रमाणात उपचार मिळत नसल्याचे नुकतेच उघडकीस येणे, याबाबत सदर रुग्णालयात तातडीने तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

----------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभागृहातील कामकाजासंबंधी</u>**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहातील कामकाजाची पध्दत बदलली आहे काय ? माननीय सभापती महोदय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना प्रश्नोत्तराच्या तासापूर्वी वाचत असत. परंतु काही दिवसांपूर्वी कोणत्याही परिस्थितीत प्रश्नोत्तराचा तास पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला ठेवून नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना वाचली जाते. आज आपण प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना मांडण्याची संधी न देता विशेष उल्लेख व इतर कामकाज पूर्ण केले आहे. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेची आम्हाला आठवण करुन द्यावी लागते.

**उप सभापती** : मला आपण आठवण करुन दिलेली नाही. माझ्याकडे प्रस्तावाची सूचना आल्यानंतर ती मी लगेच घेतली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्याला उद्देशून बोलत नाही. हे विधिमंडळ सचिवांचे काम आहे. प्रश्नोत्तराचा तास संपल्याबरोबर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावयास पाहिजे होते. पूर्वी प्रश्नोत्तराच्या तासातील पाच-दहा मिनिटे वाया गेल्यास प्रश्नोत्तराच्या तासाचा तेवढा वेळ वाढवून दिला जात असे. आजही सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली होती. परंतु आपण तेवढा वेळ वाढवून दिला नाही. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर सभागृहासमोर वेगळा विषय होता, त्यामुळे मी काही बोललो नाही. सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचा विषय आपण पुकारला नाही. आपण कामकाज पत्रिकेवरील पुढील कामकाज घेतले आहे. आम्हाला सभागृहात उभे राहून विचारावे लागते की, आमच्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचे काय झाले ? सभागृहाच्या कामकाजाची प्रकृती आणि प्रवृत्ती बदलली आहे काय ही माहिती आम्हाला जाणून घेण्याची इच्छा आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, नियम 289 अन्वये मी पोलिसी अत्याचाराची गंभीर बाब सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. दिनांक 24 नोव्हेंबर, 2013 रोजी सायंकाळी 4.30 वाजता सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली शहरामध्ये एका सामाजिक मुद्यावर त्या जिल्हयातील विरोधी पक्षाचे सदस्य या नात्याने सामाजिक काम करणारे कार्यकर्ते आणि राज्यात राज्य करणारे राज्यकर्ते यांच्यात विकासाच्या दृष्टीकोनातून वैचारिक मुद्दा त्या ठिकाणी निर्माण झाला. त्या वैचारिक मुद्याच्या आधारे त्या जिल्हयातील काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री.सतीश सावंत आणि शिवसेना पक्षाचे जिल्हा प्रमुख श्री.वैभव नाईक यांच्यामध्ये चर्चा होणार होती. त्या चर्चेच्या अनुषंगाने त्या ठिकाणी पोलीस अधीक्षकांनी ज्या पध्दतीने राजकीय दबावाखाली आपली सद्सद्विवेक बुध्दी गहाण टाकली, आपल्या अंगावरील वर्दी तेथील बलाढ्य राजकीय नेत्यांसमोर लाचारीने अर्पण करुन निरपराध शिवसैनिकांना आणि तेथे उपस्थित पत्रकारांना, छोट्या हॉटेल व्यावसायिकांना, ज्यांचे वय 70 ते 75 वर्षाचे आहे अशा लोकांना पोलीस अधीक्षक श्री.त्रिमुखे यांनी अमानुषपणे पोलीस कॉन्स्टेबलच्या हातातील लाठी घेऊन मारझोड केली. निरपराध माणसांना बदडून काढण्याचे काम केले. पोलीस अधीक्षकांनी जिल्हयाची शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम करायचे असते. ते कायद्याचे पालक आहेत. परंतु कायद्याचे पालकत्व बाजूला ठेवून कोणतीही गंभीर परिस्थिती नसताना त्यांनी दुष्कृत्य केले आहे. काँग्रेस आणि शिवसेना या दोन राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये किमान 1 कि.मी.चे अंतर असताना काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेच्या जिल्हा प्रमुखांवर दगडफेक केली. त्याबद्दल पोलीस अधीक्षकांनी काही केले नाही. उलट पोलीस अधीक्षकांना काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षांनी हाकलून दिले. परंतु शिवसेनेच्या कार्यालयात बसलेल्या निरपराध शिवसैनिकांना बेभान होऊन लाठीने बदडून काढण्यात आले. मी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या फोटोच्या प्रती आपल्याकडे सादर करतो. 60 ते 70 पोलीस कर्मचाऱ्यांसमवेत पोलीस अधीक्षकांनी शिवसैनिकांना लाठीने मारहाण केली. पोलीस कर्मचाऱ्यांना हा प्रकार पाहून हळहळ वाटली. परंतु त्रिमुखे नावाच्या या पोलीस अधीक्षकाच्या हृदयाला पाझर

..2..

श्री.विनायक राऊत.............

फुटला नाही. पोलीस अधीक्षकांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला आहे. मी हा विषय नियम 289 अन्वयेच्या सूचनेद्वारे आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

राजकीय नेत्यांपुढे लांगूलचालन करणारे जे पोलीस अधिकारी आहेत त्यात सिंधुदुर्ग जिल्हयाच्या पोलीस अधीक्षकांचा क्रमांक अगदी वरचा आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था शिल्लक राहिलेली नाही. तेथे कोणी न्यायासाठी भांडू शकत नाही. पोलीस अधीक्षक सारख्या उच्चस्तरीय अधिकाऱ्याने निरपराध व्यक्तींना मारझोड करुन जखमी केले आहे. जखमी व्यक्तींना रुग्णालयात ॲडमिट करण्यात आले आहे. या पोलीस अधीक्षकांची तातडीने बदली होण्याची आवश्यकता आहे.

नंतर 2टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत...

या संपूर्ण घटनेची चौकशी करून पोलीस अधीक्षकांना निलंबित करण्यात यावे अशी मी मागणी करीत आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन त्यांनी दिलेल्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात यावी याबाबतची सूचना दिलेली आहे. या संबंधी मी एवढेच सांगू इच्छितो की, या विषयावर मी लक्षवेधी सूचना मान्य करतो. सदर लक्षवेधी सूचनेच्या वेळी सन्माननीय सदस्यांना या विषयावर सविस्तर चर्चा करता येईल. आता मी पुढील कामकाजाला सुरूवात करीत आहे.

====

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भ आणि कोकणात माहे जून आणि जुलै महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत भरीव आर्थिक मदतीसाठी पॅकेज घोषित करणे

**मु.शी.**: विदर्भ आणि कोकणात माहे जून आणि जुलै महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत भरीव आर्थिक मदतीसाठी पॅकेज घोषित करणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गो-हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवानराव साळुंखे, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरू.....

डॉ.पतंगराव कदम (मदत व पुनवर्सन मंत्री) : सभापती महोदय, काल सभागृहात विदर्भात झालेल्या अतिवृष्टी संदर्भात चर्चा करण्यात आली. या चर्चेत सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, प्रा.सुरेश नवले, श्री.जयंत पाटील, श्री.पांडुरंग फुंडकर साहेब, माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन, डॉ.दीपक सावंत, श्री.विनायक राऊत, श्रीमती शोभाताई फडणवीस इत्यादी सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे.

सभापती महोदय, न भूतो न भविष्यती असा दुष्काळ राज्यात पडला होता. त्याच पद्धतीने अतिवृष्टी झालेली आहे. या अतिवृष्टीमध्ये 448 व्यक्ती मृत पावल्या. यापैकी मदतीस पात्र 382 ठरले असून 360 वारसदारांना एकूण रूपये 6 कोटी 19 लाख मदत देण्यात आली आहे. या अतिवृष्टीमध्ये 3627 मोठी व 1150 लहान अशी एकूण 4777 जनावरे गेली आहेत. त्यापोटी जनावर मालकांना रूपये 1 कोटी 48 लाख मदत देण्यात आली आहे. या अतिवृष्टीमध्ये घरांची देखील पडझड झाली आहे. यात पूर्ण पडझड झालेल्या घरांची संख्या 2352 असून अंशत: पडझड झालेल्या घरांची संख्या 59195 इतकी आहे. घरांसाठी आपण एकूण 19 कोटी 53 लाख रूपयांची मदत दिलेली आहे. त्याचे निकष असे आहेत की, पक्क्या घराला रूपये 70 हजार, कच्च्या घराला रूपये 25 हजार आणि अंशत: उद्ध्वस्त झालेल्या घराला रूपये 15 हजाराची मदत देण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम....

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले क्षेत्रफळ 18 लाख हेक्टर आहे. सुरूवातीला 4 लाख हेक्टर आले होते. सातत्याने पाऊस पडत गेला. शेवटचा 15 ऑक्टोबरचा निर्णय विचारात घेऊन एकूण नुकसान झालेले क्षेत्रफळ 18 लाख हेक्टर पर्यंत आलेले आहे. यासाठी एक हजार कोटी सोळा लाख रूपये देय मदत आहे. खरडून गेलेली जमीन 34 हजार हेक्टर आहे. यासाठी देय मदत 103 कोटी रूपयांची आहे. वाहून गेलेली जमीन 7025 हेक्टर असून देय मदत 30 कोटी आहे. राज्यातील शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी 450 कोटी रूपये जिल्ह्यांना देण्यात आले असून 9 डिसेंबर पर्यंत 116 कोटी रूपयांचे प्रत्यक्षात वाटप झालेले आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम...

त्यावेळी सी.एफ फंडातून 200 कोटी रुपये घेण्यात आले आणि पुनर्विनियोजनामधून 250 कोटी रुपये अशा एकूण 450 कोटी रुपयांना मंजुरी दिली.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना उर्वरित मदत देण्यासाठी मी स्वत: जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांच्याकडून कॉन्फरसींगद्वारे किती पैसे दिले, किती पैसे शिल्लक आहेत याची माहिती घेतली.

सभापती महोदय, जिल्हानिहाय किती मदत देण्यात आली याची माहिती देतो.

नागपूर जिल्ह्यामध्ये 185 कोटी 86 लाख नुकसान झाले त्यापैकी प्रत्यक्ष 28 कोटी रुपयांचे वाटप झाले आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये 136 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यांना कालपर्यंत 5 कोटी 54 लाख रुपयांचे वाटप केले आहे. यवतमाळ जिल्ह्यामध्ये 109 कोटी रुपयांचे नुकसान झाले प्रत्यक्षात 53 कोटी रुपयांचे वाटप केले. वर्धा जिल्ह्यात 57 कोटी रुपयांचे नुकसान झाले त्याठिकाणी 4 कोटी 77 लाख रुपयांचे वाटप झाले. चंद्रपूर जिल्ह्यातून 142 कोटी रुपयांची मागणी आहे. त्या ठिकाणी 4 कोटी 67 लाख रुपयांचे वाटप झाले. नंदूरबार जिल्ह्यात 29 कोटी रुपये, जळगाव जिल्ह्याला 7 कोटी, पुणे जिल्ह्याला 13 कोटी रुपये, सातारा जिल्ह्याला 4 कोटी रुपये, कोल्हापूर जिल्ह्याला 4 कोटी रुपये दिले. भंडारा जिल्ह्यामध्ये 48 कोटी रुपयांचे नुकसान झाले, त्यापैकी 4 कोटी 70 लाख रुपयांचे वाटप करण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यात 50 कोटी रुपयांचे नुकसान झाले त्या ठिकाणी 25 हजार रुपयांचे वाटप करण्यात आले. आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडे सर्व पैसे दिलेले आहेत. गडचिरोली जिल्ह्यामध्ये 51 कोटी रुपयांचे नुकसान झाले त्या ठिकाणी 18 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. रत्नागिरी जिल्ह्याला 46 लाख, अहमदनगर जिल्ह्याला 2 कोटी 83 लाख, सिंधुदूर्ग जिल्ह्याला 76 लाख रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. नाशिक, औरंगाबाद, बीड, लातूर, सांगली आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये शून्य मदत आहे. देण्यात येणारी मदत ही नुकसानीप्रमाणे असून अमरावतीमध्ये 136.82 कोटी रुपये, नागपूरमध्ये 186 कोटी रुपये असून सोलापूर जिल्ह्यात केवळ 5 लाख रुपये मदत देण्यात आली आहे. जिल्हाधिका-यांचा अहवाल 15 ऑक्टोबरला आला आणि 31 ऑक्टोबरला सी.एफ फंडातील पैसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम...

15 दिवसांत वाटण्याचे आदेश दिले. त्यावेळी स्पष्ट जी.आर.काढण्यात आला होता की, महसूल विभागाने हे पैसे वाटायचे आहेत. काल येथे उल्लेख करण्यात आला की, हे पैसे कृषी विभागाने वाटायचे की महसूल विभागाने वाटायचे यामध्ये बराच घोळ झाला.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आमच्या शेतकऱ्यांना पैसे द्यायचे असतील तर घोळ आहे. आमच्या शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, ताबडतोब सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्त्यासाठी 25 कोटी रुपये देण्यात आले. राहिलेल्या खर्चासाठी 1700 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी 448 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एमडीआर आणि इतर साठी 900 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम....

अशा प्रकारे 3 हजार कोटी रुपयांची व्यवस्था पुरवणी मागण्यांमध्ये केलेली आहे.

महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते ज्या भागात दुष्काळ पडला असेल किंवा अतिवृष्टी झाली असेल त्या भागात सातत्याने जाऊन दौरा करतात आणि मला भेटून त्या बाबतची सविस्तर माहिती देतात. मी त्यांना सांगतो की, पूर्वीचे 450 कोटी रुपये आणि आता पुरवणी मागण्यांमध्ये प्रस्तावित केलेले 3 हजार कोटी रुपये, पुरवणी मागण्या मंजूर झाल्यानंतर येत्या 16-17 तारखेला नुकसानग्रस्त जिल्ह्यात मागणीनुसार तातडीने दिले जातील. यातून काही भाग राहिला तर त्याबाबत सुध्दा सरकारच्या वतीने विचार करण्यात येईल. कोठे काही अडचण असेल, सर्व्हेच्या अहवालाबाबत अडचण असेल तर त्या ठिकाणी सुध्दा मदत देण्यात येईल.

महोदय, अतिवृष्टीच्या परिस्थितीत या सरकारने प्रामुख्याने विदर्भात आणि उर्वरित जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ठोस मदत केली आहे. ही सर्व मदत शेतकऱ्यांना देण्यात येईल. यामध्ये तलाव दुरुस्ती, कायमचे पुनर्वसन इत्यादी विविध कामे करता येतील. सर्वप्रथम अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये 3 हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. पुरवणी मागण्या मान्य झाल्यानंतर राज्यपालांच्या मान्यतेने लोकांना 15 दिवसांच्या आत पैसे दिले जातील, एवढेच या निमित्ताने सांगतो.

श्री.दिवाकर रावते : महोदय, मी काल या चर्चेच्या अनुषंगाने विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांना करण्यात आलेल्या मदतीबाबत बोललो होतो. परंतु माननीय मंत्री महोदयांनी त्या बाबतचा उल्लेख आपल्या उत्तरात केलेला नाही.

डॉ.पतंगराव कदम : महोदय, या शेतकऱ्याला 80 रुपयांचा चेक दिला होता. या प्रकरणाची चौकशी करण्यात आली. त्या बाबतचा फोटो सुध्दा मला सकाळी दाखविण्यात आला. अतिवृष्टीमध्ये सुरुवातीला त्या शेतकऱ्याच्या घराच्या दोन विटा पडल्या होत्या. म्हणून 80 रुपयांचे नुकसान झाल्याचे गृहीत धरण्यात आले. त्यामुळे या प्रकरणी तेथील तलाठी आणि ग्रामसेवक या दोघांनाही निलंबित करण्यात आले आहे. महोदय, कालांतराने पाऊस पडल्यानंतर त्या शेतकऱ्याचे पुन्हा 1200 रुपयांचे नुकसान झाले. त्या व्यक्तीला 1200 रुपये मदत करण्यात आली. परंतु त्याने ती मदत घेतली नाही. त्याने 15 हजार रुपये नुकसान भरपाईची मागणी केली. त्यामुळे या विषयी पुन्हा तपासणी सुरु आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना आपल्या माध्यमातून काही कागदपत्रे दिली होती. शासनाने मदत जाहीर केली. तहसीलदारांनी जे चेक बँक ऑफ इंडियाला पाठविले त्या बाबतची कागदपत्रे मी आपणाकडे काल पाठविली. मी स्वत: त्या बँकेत जाऊन चौकशी केली. परंतु बँक ऑफ इंडियाकडून सांगितले गेले की, आमच्याकडे कोणतेही पैसे आलेले नाहीत. यामुळे 10 महिने उलटून सुध्दा 31 शेतकऱ्यांना 80 लाख रुपयांची मदत मिळाली नाही.

तसेच दुसरी बाब अशी की, काल मी सहकार विभागाच्या बाबतीत महत्त्वाचा विषय मांडला होता. अतिवृष्टीमुळे तसेच त्यापूर्वी गेल्या सात-आठ महिन्यांत 772 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अतिवृष्टीमुळे देखील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आपणास माहीत आहे. आत्महत्या केलेल्या लोकांच्या किती कुटुंबाना शासनाने 1 लाख रुपयांची मदत दिली आहे, या बाबतची माहिती मी मागितली होती. परंतु माननीय मंत्र्यांनी त्या बाबतचा कसलाही उल्लेख आपल्या उत्तरात केला नाही. या शिवाय मी असाही मुद्दा उपस्थित केला होता की, दुर्दैवाने डॉ.नरेंद्र दाभोलकरांची हत्या झाल्यानंतर भावनावश सरकारने त्यांच्या हत्येच्या दुसऱ्याच दिवशी अंधश्रध्दा निर्मूलनाबाबत अध्यादेश निर्गमित केला. त्या बाबत माझी तक्रार नाही. परंतु सावकारी पध्दतीला कंटाळून राज्यातील 10 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सावकारी प्रतिबंधक विधेयक विधिमंडळाने संमत करुन सुध्दा केंद्र सरकारने ते फेटाळले. या बाबत मी आंदोलन केले. शिवाय मी संबंधितांना पत्र सुध्दा लिहिले. माननीय मंत्री महोदय, आपण त्या मंत्रिमंडळात होता. सावकारी प्रतिबंधक विधेयकामध्ये दुरुस्ती असलेला अध्यादेश काढण्यात आला. परंतु अजूनपर्यंत त्या बाबतचे विधेयक सभागृहात मांडण्यात आलेले नाही. ते विधेयक सभागृहात मंजूर करुन आत्महत्या केलेल्या 10 हजार शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना दिलासा देणार काय ?

डॉ.पतंगराव कदम : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काही शेतकऱ्यांना चेक मिळाले नाहीत असे सांगितले. परंतु त्यांनी काल जी माहिती दिली ती माझ्यापर्यंत आली नाही. ती माहिती त्यांच्याकडून आता मिळाली तरी 8 दिवसांच्या आत या संदर्भातील पूर्ण चौकशी करुन, योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

नंतर श्री.कांबळे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही आमच्या भाषणात मांडलेल्या मुद्यांचा उल्लेखच झालेला नाही. मी फिरतो, माहिती आणून आपल्याला देतो, असे म्हटल्याबद्दल मी माननीय मंत्र्यांचे आभार मानतो. पण त्यांनी माहती दिल्यानंतर पुढे काय होणार ? सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीसाठी बांधकाम विभागाबाबत 900 कोटी रूपये जिल्हा परिषदेने आपल्याकडे दिले. आपण त्यातील 488 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. आपण 2338 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. गेल्या जुलै अधिवेशनात माननीय मुख्यमंत्र्यांनी 365 मृत्यू पावलेल्या व्यक्तींसाठी 9 कोटी 12 लाख 50 हजार इतकी आणि 50 टक्यांपेक्षा अधिक जमिनीचे नुकसान झालेल्या अशा 16.24 लाख हेक्टर जमिनीसाठी 810 कोटी 1 लाख 47 हजार रूपये दिले होते. घरांसाठी 150 कोटी रूपये दिले होते. अशी एकूण बेरीज केली तर सार्वजनिक मालमत्तेच्या संदर्भात 2521 कोटी रूपये आणि 2338 कोटी रूपये ते 3500 कोटी रूपयांची गरज निर्माण होते आणि असे असताना 2338 कोटी रूपयांची पुरवणी मागण्यांतून व्यवस्था केली, असल्याचे सांगितले. 1162 कोटी रूपये कमी आहेत. आपण 1700 कोटी रूपयांची घोषणा केली, त्यातील 750 कोटी रूपये तर गेल्या वर्षीचेच आहेत. आपण नवीन काय दिले आहे ? आम्ही 25 हजार रूपये हेक्टरी मागणी करीत आहोत, ते सोडा. पण तुम्ही 5 हजार रूपयांची घोषणा करता, मात्र तेही देत नाही. अमरावती विभागातील बुलढाणा येथे 25 हजार रूपयांचे वाटप झाले, असे सांगितले. माझ्याकडे ठोस माहिती आहे की, पैसे गेल्यानंतर ते कृषी विभागाने वाटायचे की महसूल विभागाने वाटायचे या वादामुळे पैसे 20 दिवस पडून होते. आपण या संदर्भात काय कार्यवाही करणार आहात ? पैसे कमी का गेले ? आपणाकडून देण्यात येणारे हे तुटपुंजे पॅकेज आम्हाला मान्य नाही. आपण यावर ठाम असाल तर आम्ही आपल्याला नागपूरच्या बाहेर पडू देणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांना धन्यवाद देणार आहे. विदर्भाचे प्रवेशद्वार बुलढाणा जिल्हा आहे. तो जीजाऊंचा जिल्हा आहे. तुम्ही त्या जिल्ह्याला 50 कोटी रूपये दिले. मात्र त्यातील फक्त 25 हजार रूपये वाटण्यात आले. जुलै महिन्यात अतिवृष्टी झाली. आता डिसेंबर आला तरी 25 हजार रूपयांच्या पुढे मदतीचा आकडा गेला नाही. आपणाला पैसे वाटायचे नव्हते तर 50 कोटी रूपये कशाला पाठविले ? तुम्ही पाठविलेला पैसा लिड बँकेतच 20-25 दिवस पडून राहिला, त्यांनी तो पैसा शेतकऱ्यांना वाटला नाही, स्वत: वापरला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आपण त्या लिड बँकेवर काय कारवाई करणार आहात ? जिल्हाधिकाऱ्याचे किंवा इतर अधिकाऱ्यांचे याकडे लक्ष नाही. पैसा येऊन पडलेला आहे. शेतकरी पैशांची वाट पाहत आहे. परंतु, आपण फक्त 25 हजार रूपयांचे पाटप केले. बुलढाणा जिल्ह्यातील जनतेच्या वतीने मी आमच्या माननीय पुनर्वसन मंत्र्यांचे अभिनंदन करतो. आपण अशा पध्दतीने आमच्या जिल्ह्याला वागवणार असाल तर ते योग्य नाही. आम्ही फक्त आपल्याला विदर्भाची माहिती मागितली होती. तुम्ही आम्हाला संपूर्ण महाराष्ट्राची माहिती दिली. आपण विदर्भात आहोत. येथे विदर्भाच्या मुद्यांवर चर्चा झाली. विदर्भातील अतिवृष्टीवर चर्चा झाली. मात्र आपण संपूर्ण महाराष्ट्राबद्दल मोघम उत्तर देऊन विदर्भातील जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, त्याबद्दल तुमचे अभिनंदन. मी तुमचे अभिनंदन यासाठी करीत आहे, कारण तुमचे शासन किती गतिमान आहे, हे आम्हाला आणि महाराष्ट्राच्या जनतेला या माध्यमातून दिसले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सरकारने घोषित केलेली मदत आम्हाला मान्य नाही. आमच्या मागणीप्रमाणे माननीय पुनर्वसन मंत्र्यांनी घोषणा केली पाहिजे, त्याशिवाय आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही. ही पध्दत आहे का ? आम्ही काल सर्व मुद्यांची सविस्तर मांडणी करून मागणी केली होती.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत वेलमध्ये येतात.)

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनासमोर जमून घोषणा देत असतात. )

**उप सभापती** : सभागृहामध्ये कामकाज करण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळे सभागृहाची बैठक मी 4 वाजून 5 मिनिटांपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 03.57 ते 04.05 पर्यंत स्थगित झाली.)

----

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड. अनिल परब)**

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे जे अपरिमित नुकसान झाले आहे त्यासंबंधी या सभागृहामध्ये प्रदीर्घ चर्चा करण्यात आली. अनेक सन्माननीय सदस्यांनी पोटतिडकीने वस्तुस्थिती सांगितली. पण सरकारने शेतकऱ्यांना काहीही दिले नाही. विदर्भातील शेतकऱ्यांच्या तोंडाला सरकारने पाने पुसलेली आहेत. शासनाने दिलेल्या पॅकेजला काही अर्थ नाही. चर्चा करुन काही मिळत नसेल तर आम्ही येथे कशाला बसायचे ? विदर्भाला सरकारने काय दिले ? माझी आपणास विनंती आहे की, आपण माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहामध्ये बोलावून घ्यावे....

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार दिनांक 13 डिसेंबर 2013 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक भरेल. या बैठकीत विरोधी पक्षाचा प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 7 मिनिटांनी,शुक्रवार, दिनांक 13.12.2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही